Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06
पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
वर्ष ३३, अंक ५२, ५ रुपये, शहर आवृत्ती
सहदैनिकासह पृष्ठे १४
पुणे, गुरुवार, ३० एप्रिल २०२०

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !


तापमान | कमाल ३९.८° सें | किमान २४.४° सें

**हवामानाचा अंदाज**
दुपारनंतर आकाश सामान्यतः ढगाळ.
सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता.

क्रीडा
**जागतिक बॉक्सिंगचे यजमानपद भारताने गमावले**



LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS




## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



...यामुळे जगाची प्रगती पूर्णपणे थांबलेली आहे! प्रगती म्हणजे प्रदूषण, झाडांची कत्तल, गोंगाट वगैरे!!

# हीरक महोत्सवानिमित्त राज्याच्या प्रगती आणि आव्हानांचा वेध

## 'लोकसत्ता'तर्फे वेबसंवादाची मैफल; उपक्रमाचा आरंभ उद्या शरद पवार यांच्यापासून

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्याच्या हीरक महोत्सवानिमित्त 'साठीचा गझल... महाराष्ट्राचा' हा वेबसंवादाचा अनोखा उपक्रम 'लोकसत्ता'तर्फे राबविण्यात येणार असून, त्याअंतर्गत राज्याच्या कामगिरीचा, पायाभूत सुविधांसह लोकोपयोगी धोरणांचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच भविष्यातील राज्याच्या विकासाच्या योजनांवर चर्चा होणार आहे. यानिमित्ताने वाचकांना विद्यमान मुख्यमंत्र्यांसह माजी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करता येईल. उद्याच्या महाराष्ट्रदिनी (शुक्रवार १ मे) या संवादपर्वाला शरद पवार यांच्यापासून आरंभ होणार आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक 'महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेण्ट कॉर्पोरेशन' (एमआयडीसी) आहे.

या संवादामधून आपापल्या काळात घेण्यात आलेल्या भूमिकांसह राज्याच्या एकूण प्रगतीचा आढावा (पान २ वर)

**होणार काय?**
या उपक्रमाचा आरंभ चार वेळा राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविलेले शरद पवार यांच्याशी वेबसंवादातून उद्या होईल. २ मे रोजी देवेंद्र फडणवीस, ३ मे रोजी सुशीलकुमार शिंदे, ४ मे रोजी पृथ्वीराज चव्हाण, ५ मे रोजी अशोक चव्हाण, ६ तारखेला नारायण राणे हे या उपक्रमांतर्गत संवाद साधतील. या उपक्रमाची सांगता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी गप्पांनी होईल.

MIDC प्रस्तुत
लोकसत्ता आयोजित साठीचा गझल... महाराष्ट्राचा

# ...चला... गप्पा मारू या!

*AliExpress या नावावरनं तसा काही फार अर्थबोध होणार नाही. करोनाची साथ आल्यापासून ही अलीएक्स्प्रेस भलतीच सुसाट धावतीये. आपल्या देशात ॲमेझॉन, फ्लिपकार्ट वगैरे धापा टाकतायत. सरकार एकदा म्हणतं त्यांना व्यवसायाची परवानगी देणार. मग म्हणतं नाही. या गोंधळात आपल्याकडे अनेक रुतून बसलेत. पण अलीएक्स्प्रेसचं मात्र तसं नाही.*

*खुद्द इंग्लंडबरोबर रशिया, स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड, पोर्तुगाल, टर्की, पोलंड, इस्रायल, झालंच तर इकडे आशियात जपान, कोरिया, थायलंड, व्हिएतनाम, सौदी अरेबिया अशा अनेक देशांत अलीएक्स्प्रेस चांगलीच लोकप्रिय झालीये. इतकी लोकप्रिय की अनेक नागरिक आता आपल्या पारंपरिक ॲमेझॉनला घटस्फोट देत या अलीएक्स्प्रेसचा हात धरू लागलेत. काय कारण असेल?*

*एक म्हणजे अलीएक्स्प्रेसवर सर्व काही स्वस्त आहे. ॲमेझॉन किंवा वॉलमार्टपेक्षाही स्वस्त. आणि स्वस्ताई ही अशी सुंदरी आहे की भले भले विवेकी विश्वामित्रसुद्धा तिच्या प्रेमात पडतात. आणि अर्थव्यवस्था रसातळाला जात असताना,*



**कोविडोस्कोप**

*नोकऱ्या नसताना आणि असल्या तर वेतन कपातीची टांगती तलवार डोक्यावर असताना चार पैसे वाचत असतील तर नाही कोण म्हणेल? त्यामुळे अलीएक्स्प्रेस सध्या पाश्चात्त्य जगात अतिलोकप्रिय होण्याचं हे एक कारण.*

*आणि दुसरं आणि पहिल्यापेक्षाही महत्त्वाचं कारण म्हणजे सध्या जगात अत्यावश्यक असलेल्या चीजवस्तू फक्त अलीएक्स्प्रेसवर मिळतात. उदाहरणार्थ मुखपट्ट्या. गावात अचानक करोनाची साथ आलीये आणि नेमका या मुखपट्ट्यांचा तुटवडा निर्माण झालाय. घरच्या घरी बनवायच्या तर शिलाई मशीन वगैरे नाही. मग अशा वेळी सोपा पर्याय म्हणजे अलीएक्स्प्रेस.*

*परत त्यात या मुखपट्ट्यांबाबत एकवेळ वेळ मारून नेता येईल. पण पर्सनलाइज्ड प्रोटेक्शन इक्विपमेंट्स,* (पान २ वर)

# मजुरांचा मार्ग मोकळा!

## आंतरराज्यीय प्रवासाला केंद्राची परवानगी; परराज्यांत अडकलेल्या यात्रेकरू, विद्यार्थ्यांनाही दिलासा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** टाळेबंदीचा दुसरा टप्पा संपण्यासाठी चार दिवस उरले असताना केंद्र सरकारने बुधवारी आंतरराज्यीय प्रवासाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यानुसार परराज्यांत अडकलेले मजूर, यात्रेकरू, विद्यार्थी, पर्यटकांना आपापल्या राज्यांत जाण्याची मुभा केंद्राने दिली. करोनाची लक्षणे

**करोनाचा कहर**

नसलेल्यांनाच ही मुभा देण्यात आली असून, याबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना आदेशपत्र पाठवले.

महाराष्ट्रासह विविध राज्यांत अडकलेल्या परराज्यांतील मजुरांच्या प्रश्न टाळेबंदीपासूनच चर्चेत आहे. टाळेबंदीमुळे मूळ गावी निघालेले लाखो मजूर अनेक राज्यांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्यात अडकून पडले. बस, रेल्वे आणि विमानसेवा बंद करण्यात आल्याने अन्यत्र शिकत असलेले विद्यार्थी, यात्रेकरू यांनाही घरी परतणे अशक्य झाले. संबंधित राज्यांतील प्रशासनाने स्थलांतरित मजुरांच्या जेवणाची सोय केली तरी, गावी परत जाण्यासाठी सुविधा पुरण्याची मागणी जोर धरू लागली होती. त्यामुळे या मजुरांसह परराज्यांत अडकलेल्यांना त्यांच्या गावी जाण्यास परवानगी द्यावी आणि त्यांच्या प्रवासाची सोय करावी, अशी मागणी राज्यांनी केंद्राकडे केली होती. सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या मजुरांना घरी का जाऊ दिले जात नाही, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयानेही केंद्राकडे केली होती.

अखेर केंद्रीय गृहमंत्रालयाने बुधवारी आंतरराज्यीय (पान ७ वर)




संपादकीय — राहिले रे दूर...
संपादकीय — बोलाचीच कढी?

स्थलांतरित मजुरांच्या प्रश्नावर 'लोकसत्ता'ने वेळोवेळी भाष्य केले आहे.

**संसर्ग टाळण्यासाठी उपाययोजना**
प्रवासापूर्वी प्रत्येक मजुराची चाचणी केली जाईल. करोनाची कोणतीही लक्षणे नसल्याची खात्री करूनच त्यांना आंतरराज्यीय प्रवासाची मुभा दिली जाईल. मूळ गावी पोहोचलेल्या मजुरांच्या आरोग्याची तपासणी स्थानिक आरोग्य प्रशासनाकडून करण्यात येईल. त्यानंतर त्यांचे घरातच विलगीकरण करण्यात येईल. गरज भासल्यास आरोग्यसेवा केंद्रांमध्ये विलगीकरणाची सुविधा देण्यात येणार आहे. मजुरांना आवश्यक कालावधीपर्यंत देखरेखीखाली ठेवले जाईल. त्यासाठी त्यांनी आरोग्य सेतू ॲपचा वापर करणे गरजेचे असेल.

# रोज किमान दोन तासांचे 'डिजिटल पथ्य' पाळा

## डॉ. शशांक जोशी यांचा आरोग्यमंत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**



लोकसत्ता ॥आरोग्यमान भव॥ वेब-संवाद

**पुणे :** तणावमुक्त जगण्यासाठी रोज किमान दोन तास स्मार्टफोन, संगणक, दूरचित्रवाणी यांसारख्या पडद्यांपासून लांब राहा; थोडक्यात 'डिजिटल पथ्या'चे पालन करा. त्याऐवजी वाचन, छंद, संगीत यांपैकी एखाद्या गोष्टीत मन गुंतवा, असा आरोग्यमंत्र ख्यातनाम मधुमेहतज्ज्ञ डॉ. शशांक जोशी यांनी 'लोकसत्ता'च्या वाचकांना दिला. कमी खा, वेळेवर खा, सावकाश खा, असा सल्ला त्यांनी मधुमेहींना दिला.

'लोकसत्ता आरोग्यमान भव' या कार्यक्रमात (पान २ वर)

# पुण्यात दिवसभरात १०४ नवे रुग्ण, तिघांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बुधवारी दिवसभरात पुणे, पिंपरी आणि परिसरात १०४ नव्या रुग्णांना करोनाची बाधा झाली आहे. त्यामुळे परिसरातील रुग्णांची संख्या १५९५ वर गेली आहे. दिवसभरात तीन रुग्णांचा मृत्यू झाला असून मृतांची एकूण संख्या ९० झाली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून बुधवारी रात्री याबाबत माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. पुणे शहरात ९३, पिंपरी चिंचवडमध्ये सात आणि पुणे ग्रामीणमध्ये एका नव्या रुग्णाची भर पडली आहे. पुणे छावणी परिसरात बुधवारी तीन नवे रुग्ण आढळून आले आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये ६५ वर्षीय महिलेचा तर पुण्यात ६५ आणि ७१ वर्षीय रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यांपैकी एक रुग्ण ससून रुग्णालयात दगावला. या सर्व रुग्णांना मधुमेहासह इतर गुंतागुंतीच्या आजारांची वैद्यकीय पार्श्वभूमी होती.

पुणे शहरातून (पान ७ वर)

## मुख्यमंत्र्यांची पंतप्रधानांशी चर्चा

**मुंबई :** विधान परिषदेवर नियुक्तीबाबत राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी नकारात्मक भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. राज्य मंत्रिमंडळाने दोनदा शिफारस करूनही राज्यपालांनी निर्णय घेतलेला नाही. राज्यपालांनी नियुक्तीस मान्यता दिली नाही तर राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण होऊ शकते. करोना संकटात राजकीय अस्थिरता परवडणारी नाही, हे मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांच्या निदर्शनास आणल्याचे समजते. दरम्यान, उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेवर नियुक्ती करावी, अशी मागणी करणारे पत्र काही राजकीय पक्षांनी राज्यपाल कोश्यारी यांना पाठवले आहे.

## राज्यात आणखी ३२ जणांचा मृत्यू

**मुंबई/नवी दिल्ली :** राज्यात गेल्या २४ तासांत करोनाने ३२ बळी घेतले. करोनाचा फैलाव झाल्यापासून राज्यातील २४ तासांतील मृतांचा हा सर्वांत मोठा आकडा आहे.
राज्यातील एकूण रुग्णसंख्या दहा हजारांच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. करोनाचे बुधवारी ५९७ नवे रुग्ण आढळल्याने बाधितांची एकूण संख्या ९,९१५ झाली. राज्यात आतापर्यंत १,५९३ रुग्ण करोनामुक्त झाले आहेत.
देशातील करोनाच्या बळींची संख्या हजारवर पोहोचली आहे. देशात करोनामुळे आतापर्यंत १,००८ जणांचा मृत्यू झाल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी सांगितले. देशातील करोनाबाधितांची एकूण संख्या ३१,७५७ झाली आहे. दरम्यान, पंधरा दिवसांत देशातील करोनाच्या अति संक्रमित ठिकाणांची संख्या घटली आहे.

# इरफान खान यांचे निधन

**खास प्रतिनिधी, लोकसत्ता**

नायकपदासाठी अत्यावश्यक चेहरेकुळापासून बलदंड देमारशाही थाट नसतानाही केवळ अभिनयाच्या ताकदीवर गेली अडीच-तीन दशके सामान्यांतील असामान्य व्यक्तिरेखांमध्ये प्राण फुंकत मनोरंजनाच्या छोट्या तसेच मोठ्या पडद्यावर तळपत राहणाऱ्या इरफान खान यांची प्राणज्योत बुधवारी सकाळी मालवली. कुठल्याही चौकटीत अडकून न पडता तद्दन व्यावसायिक चित्रपटांबरोबरच प्रायोगिक सिनेमांमध्ये आपले काम अविस्मरणीय करण्याच्या हातोटीमुळे आंतरराष्ट्रीय (पान २ वर)



१९६७ - २०२०

■ अग्रलेख ■
जसा होता तसा...

**चाहत्यांकडून हळहळ**
अभिनयाची कारकीर्द ऐन बहरात असताना झालेला आजार इरफान यांच्यासाठी मोठा धक्का ठरला. मात्र त्यावरही धीराने मात करत, आजाराचा सामना त्यांनी सुरू ठेवला होता. मार्च महिन्यात प्रदर्शित झालेला 'अंग्रेजी मीडियम' हा त्यांचा अखेरचा चित्रपट ठरला. कायमच लढवय्या, तरीही हसतमुख असलेल्या इरफान यांच्या जाण्याने त्यांनीच निर्माण केलेल्या अभिनयाच्या या सुंदर पर्वाचा अस्त झाला असल्याची हळहळ लाखो चाहत्यांकडून व्यक्त होत आहे.

## करोना काळात सिनेप्रेमींसाठी विनामूल्य मनोरंजनाची मेजवानी

# जगभरातील सर्व चित्रपट महोत्सव यंदा यूट्यूबवर


**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** जगभरातील टाळेबंदीमुळे मार्च-एप्रिल-मे महिन्यादरम्यान होणारे अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव रद्द करावे लागले होते, तर काही पुढे ढकलण्यात आले होते. मात्र करोनामुळे उद्भवलेली ही परिस्थिती पुढे आणखी काही महिने कायम राहणार असल्याचे लक्षात आल्यानंतर कान, टोरांटोसारख्या नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांनी एकत्र येत यूट्यूबच्या माध्यमातून दहा दिवसांच्या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

अशा प्रकारचा डिजिटल महोत्सव याआधी कधीच आयोजित करण्यात आलेला नव्हता, त्यामुळे हा महोत्सव खास आकर्षण ठरणार आहे. २९ मे ते ७ जून दरम्यान हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून यात ट्रिबेका, कान, व्हेनिस, बर्लिन, लंडन, सॅनसॅबेस्टियन, टोरांटो आणि टोकियोसारखे नामांकित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सहभागी होणार आहेत. भार 'जिओ मामि मुंबई फिल्म फेस्टिव्हल' या महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या महोत्सवातून जगभरातील लोक आज या संकटकाळात एकत्र आहेत, आम्हीही त्यांच्याबरोबर आहोत, या भावनेनेच आम्ही सहभागी होणार आहोत, अशी भावना मामि महोत्सवाच्या प्रवक्त्यांनी व्यक्त केली आहे. या डिजिटल महोत्सवात नेमके कोणते चित्रपट, कार्यक्रम पाहता येणार याचे तपशील येत्या काही आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. महोत्सवाच्या माध्यमातून करोनाशी लढण्यासाठी आर्थिक निधीही उभा करण्यात येणार असून त्यासाठी प्रेक्षकांना आवाहन करण्यात येणार आहे.

**होणार काय?**
'वुई आर वन : अ ग्लोबल फिल्म फेस्टिव्हल' हा दहा दिवसांचा डिजिटल महोत्सव यूट्यूब आणि ट्रिबेका एन्टरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने २९ मे ते ७ जून या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. ट्रिबेका एन्टरप्राईजेसकडून दरवर्षी न्यूयॉर्कमध्ये ट्रिबेका फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. यावर्षी कोणतेच चित्रपट महोत्सव होऊ शकणार नसल्याने या सगळ्या महोत्सवांतर्गत दाखवण्यात येणारे चित्रपट, लघुपट हे या दहा दिवसांच्या महोत्सवातून यूट्यूबवर विनामूल्य दाखवले जाणार आहेत.




लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

साठीचा गझल... महाराष्ट्राचा
वेब-संवाद १ मे पासून
महाराष्ट्राच्या साठाव्या वर्धापनदिनानिमित्त एक अनोखा उपक्रम...
वेब-संवाद महाराष्ट्राच्या आजवरच्या मुख्यमंत्र्यांशी


श्री. शरद पवार
शुक्रवार,
१ मे २०२०

श्री. पृथ्वीराज चव्हाण
सोमवार,
४ मे २०२०



श्री. देवेंद्र फडणवीस
शनिवार,
२ मे २०२०

श्री. अशोक चव्हाण
मंगळवार,
५ मे २०२०



श्री. सुशील कुमार शिंदे
रविवार,
३ मे २०२०

श्री. नारायण राणे
बुधवार,
६ मे २०२०


दररोज सायंकाळी ५ वाजता

MIDC प्रस्तुत
* नियम व अटी लागू. प्रवेश मर्यादित

त्यांना भेटण्यासाठी तुम्ही करायचं ते इतकंच...
- http://tiny.cc/Loksatta-Maharashtra60 या लिंक वर क्लिक करून तुम्हाला ज्या सत्रांमध्ये सहभागी व्हायचे असेल, त्या प्रमाणे नोंदणी करा.
- नोंदणी करून झाल्यावर आमच्याकडून तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल.
- याद्वारे १ मे पासून संध्याकाळी ५ वाजता या वेब-संवादात सहभागी होता येईल.
- अधिक माहितीसाठी http://www.loksatta.com या संकेतस्थळाला भेट द्या.

लोकसत्ता आयोजित
साठीचा गझल... महाराष्ट्राचा

STOP CORONA
VIRUS




## लॉकडाऊनचं लॉक काढणं

**आता फक्त तुमच्याच हातात..**
**त्यासाठी नियमांचं पालन करुया.. घरी थांबूया..**



मास्कचा वापर न चुकता करा.
ताप, खोकला, सर्दीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
शिंकताना रुमालाचा वापर करा.
वारंवार हात साबणाने धुवा.
आपल्या घरीच रहा बाहेर पडू नका.
सर्वां बरोबर सुरक्षित अंतर ठेवा.
होम क्वारनटाईनचा नियम पाळा.
कोरोना बाधित व्यक्तिचा संपर्क टाळा.
हस्तांदोलन करु नका.

**Supported by**

Gangotree Greenbuild
Green Living, Green Thinking

IDEAS THAT ROAR
Shubh
ADVERTISING & TECHNOLOGY
09921511119 | shubhcommunication.com

SurajInfo com
99700 86000

घरातच रहा.. सुरक्षित रहा..!
Keri Vacattion
A New Travel Story...
291, Shaniwar Peth, 1st Floor, New Guruprasad Apt. Near Moti Baug, Pune- 411030, (INDIA). Ph. +91 8669680680 +91 7030378080
+91 9881231695, kerivacattion@gmail.com, www.kerivacattion.com

MSC BANK

SPECIALIST IN ALL TYPES OF INTERNATIONAL AND DOMESTIC
MACH2 INTERNATIONAL
COURIER SERVICES
CONTACT : 9765805421 / 9503340134

# अडथळे ओलांडत आंबा ग्राहकांच्या दारात

सतीश कामत, लोकसत्ता

**रत्नागिरी :** करोना विषाणूच्या फैलावामुळे उद्‌भवलेल्या अभूतपूर्व परिस्थितीत आंबा विक्री करताना येणाऱ्या अडथळ्यांची शर्यत ओलांडत कोकणचा सुप्रसिद्ध हापूस आंबा मुंबई-पुण्यासह विविध भागांमध्ये ग्राहकांपर्यंत पोचवण्याचे बागायतदारांचे प्रयत्न चालू आहेत.

पुण्या-मुंबईच्या ग्राहकाला हा आंबा थेट विकण्यापेक्षा घाऊक बाजारपेठांमधील दलाल या बागायतदारांचे मुख्य आधार असतात. पण यंदा टाळेबंदीमुळे बाजारपेठांचे कामकाज नियमितपणे होऊ शकत नसल्याने ग्राहकापर्यंत थेट पोचण्याचा पर्याय त्यांना स्वीकारावा लागला. तेथेही टाळेबंदीचा मोठा अडसर आहेच. पण राज्याच्या कृषी खात्याने याबाबत मदतीचा हात पुढे केल्याने या मोठ्या शहरांमधील गृहनिर्माण संस्थांच्या दारापर्यंत पोचणे काही प्रमाणात शक्य झाले आहे. यातील दुःखात सुख म्हणजे, दरवर्षी आंब्याचे एकूण सरासरी उत्पादन सुमारे ३ लाख टन होते. या वर्षी एकंदरीत उत्पादनही उशिरा व जेमतेम सुमारे ३० ते ४० टक्के असल्यामुळे बागायतदारांवरील विक्रीचा ताण कमी आहे. या लढाईत पहिला टप्प्यातील आंबा आता संपुष्टात आला असल्यामुळे सध्या बाजारपेठेतील आवक घटली आहे. कोकणच्या तीन जिल्ह्यांमधून मिळून सध्या दररोज एकूण सुमारे ३५ हजार पेटी आंबा वाशीच्या घाऊक बाजारपेठेत जात आहे. आवक घटल्यामुळे तूर्त दरात थोडी वाढ झाली असली तरी गतवर्षाच्या तुलनेत तो कमीच आहे. सध्या ४ ते ५ डझनाच्या पेटीचा दर आंब्याच्या वजनानुसार एक हजार ते अडीच हजार रुपये आहे.

या परिस्थितीत कृषी आणि पणन विभागाकडून सातारा, पुणे, मुंबई, ठाणे, पनवेल या परिसरात थेट आंबा विक्रीला सुरुवात केली. साधारणपणे अडीचशे रुपये डझनने आंबा पाठविला गेला. राजापूर तालुक्यातून याला चांगला प्रतिसाद मिळाला. आंबा ग्राहकांच्या घरात जाऊ शकतो आणि वाहतूक यंत्रणाही सुरळीत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बागायतदारांनी विक्री सुरू केली. ग्राहकांकडूनही मागणी येऊ लागली. टाळेबंदीनंतर काही काळ ग्राहकांचा शोध घेण्याचे आव्हान होते; मात्र नंतर परिस्थिती सुधारली आणि डझनाचा दर साडेचारशे ते पाचशे रुपयांपर्यंत स्थिरावला.

मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई परिसरात आंबा विक्रीसाठी पाठविण्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे ४० हजार पेट्यांची विक्री ठिकठिकाणी झाली आहे. आंबा विक्रीचे पैसे शेतकऱ्याच्या खात्यात थेट जमा होण्याची पद्धत लाभदायक आहे. पण कृषी विभागाने दर ठेवल्यामुळे थोडे नुकसानही झाले.

सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या मुंबईला वाशी बाजार समितीतून हापूसचा पुरवठा केला जातो. मात्र करोनाच्या भीतीने काही दिवस बाजार समिती बंद ठेवलेली होती. तरीही काही व्यापाऱ्यांनी खासगी यंत्रणा राबवून मुंबईसह पुण्यात आंबा विक्री चालू ठेवली. त्याचा त्यांना फायदा झाला.



“ यंदा आंबा उत्पादन २५ टक्केच आहे. करोनामुळे सुरुवातीला हापूस ग्राहकांपर्यंत पोचवण्याची अडचण होत होती. सध्या ती कमी झाली असून ग्राहकांना थेट माल पोचवणे शक्य होत आहे; परंतु मागणी मोठ्या प्रमाणात येत असून तेवढा आंबा पुरवणे अशक्य आहे. करोनामुळे सुरुवातीला घसरलेला दर सध्या समाधानकारक आहे. तो काही काळ टिकून राहिला तर त्याचा फायदा बागायतदारांना होईल. पण यंदा मार्चमधील उत्पन्नावर आम्हाला पाणी सोडावे लागले. एकूण व्यवसायाच्या दृष्टीने तो मोठा तोटा ठरणार आहे.

तुकाराम घवाळी, सहसचिव, रत्नागिरी जिल्हा आंबा उत्पादक संघ

- अक्षय्य तृतीयेला दरवर्षी वाशी बाजारपेठेत सुमारे ७० हजार ते एक लाख पेटी आंबा जातो. मात्र यंदा मुहूर्ताला आंबा पेटीचे प्रमाण अत्यंत कमी राहिले. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी फक्त १२ हजार पेटी तर आधी एक दिवस ५० हजार पेटी आंबा रवाना झाला होता. दरवर्षीच्या तुलनेत माल कमी गेला होता.
- या वर्षी सुरुवातीला पेटीचा दर ६०० ते १७०० रुपये दर होता. आवक घटल्यानंतर तो एक हजार ते अडीच हजार रुपये झाला. पेटीमागे सर्वसाधारणपणे दोन ते अडीच हजारांचे नुकसान यंदा बागायतदारांना होत आहे. गतवर्षी सुरुवातीला ३ ते ८ हजार रुपयांपर्यंत पाच डझनच्या पेटीचा दर होता. अक्षय्य तृतीयेला तोच दर गतवर्षी सरासरी २ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत होता. यंदा मोठी तफावत आहे.
- सध्या वाशीची घाऊक बाजारपेठ वगळता पुणे, राजकोट, अहमदाबाद, सुरत, सांगली येथील बाजारपेठांमध्ये आंबा विक्रीसाठी परिस्थिती वाईट आहे. कोल्हापूरची बाजारपेठ सुरू असली तरी त्या ठिकाणी कच्चा आंबा फारसा विकला जात नाही. तेथे पिकलेल्या आंब्याला मागणी असते. शिवाय, करोनाचा प्रादुर्भाव जास्त असल्याने एकूणच आंबा जाण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.
- करोनामुळे हवाई वाहतूक बंद पडली असली तरी आंब्याच्या निर्यातदारांना जलवाहतुकीचा पर्याय खुला होता. त्याचा लाभ घेत पणन मंडळाच्या मदतीने आखाती भागातील संयुक्त अमिरात, कुवेतसह विविध देशांमध्ये हापूस पाठविण्यास सुरुवात झाली. अक्षय्य तृतीयेला एक डझनाचे सुमारे ४ लाख बॉक्स आखातात पाठवण्यात यश आले आहे. सध्या युरोप इंग्लंडला आंबा पाठवण्याची तयारी सुरू आहे. पहिल्या टप्प्यात खास विमानाने ५०० बॉक्स आंबा जाणार आहे; मात्र वाहतूक खर्चाचा भार दीड पट वाढणार आहे. पूर्वी प्रवासी विमानातून ही वाहतूक केली जाई. यंदा खासगी हवाई मालवाहतूक होणार असल्याने जाण्या-येण्याचे भाडे आकारले जाणार आहे.
- या वर्षीच्या अन्य असाधारण वैशिष्ट्यांप्रमाणेच यंदा आंबा हंगाम जेमतेम १५ मेपर्यंत चालेल, असा बागायतदारांचा आहे. त्यातच विक्रीचा मुख्य आधार असलेल्या पुणे आणि मुंबई या दोन प्रमुख शहरांतील करोनाचा सध्याचा फैलाव पाहता आगामी १५ दिवसांत तेथे बाजारपेठेची परिस्थिती फारशी बदलण्याची शक्यता खूप कमी आहे.



# जनावरांच्या बाजारालाही टाळेबंदीची झळ !

प्रदीप नणंदकर, लोकसत्ता

**लातूर :** देशभर टाळेबंदी सुरू झाली अन् स्वाभाविकपणे सर्व व्यवहार जसे बंद आहेत तसे ठिकठिकाणी आठवडी बाजार असलेले जनावरांचे बाजारही ठप्प झाले. यामुळे कोट्यवधी रुपयांची उलाढाल थांबली असून हजारो जणांचा रोजगारही गेला आहे. दरवर्षी कमी किमतीत जनावरे खरेदी करून ती तयार करून बाजारपेठेत विकणाऱ्यांचा वर्ग मोठा असून त्यातून त्यांची कमाईही चांगलीच असते. अशा लोकांचाही व्यवसाय या वर्षी बंद पडला आहे.

लातूर जिल्ह्यातील हाळीहंडरगुळी येथे भरणारा जनावरांचा बाजार हा देशातील प्रमुख बाजारांपैकी आहे. या बाजाराला शंभर वर्षांपेक्षाही अधिकचा इतिहास आहे. १७ एकरांवर दर शनिवारी हा बाजार सुरू होतो. रविवारी दिवसभर बाजार होतो व सोमवारी दुपारनंतर हा बाजार उठतो. या बाजारात बैल, गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या यांची मोठ्या प्रमाणावर उलाढाल होते. आठवडाभर या बाजाराची परिसरातील लोकांना आशा लागलेली असते. मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून या बाजारात जनावरे खरेदी करण्यासाठी व्यापारी येतात. ७० ते ८० हजार रुपयांची कमीत कमी बैलजोडी असते व दीड लाखापेक्षादेखील अधिक किमतीचे बैल या बाजारात मिळतात. ग्राहकाला जशा पद्धतीची जनावरे हवी आहेत त्या पद्धतीची जनावरे या बाजारपेठेत उपलब्ध असतात. काही शेतकरी दातही न काढलेले कोवळे पारडे खरेदी करतात. काही जण दोन दाती, काही जण चार दाती तर काही जण जुडलेले बैल खरेदी करतात. बैलांच्या बाजारात दलाल, हिरवा चारा विकणारे, जनावरांना पाणी पाजणारे, मेका, कासरे व दोरखंड विकणारे, खरेदी केलेली जनावरे संबंधितांच्या गावापर्यंत पोहोचवण्याचे काम करणारे वाहतूकदार अशी मोठी संख्या असते. हाळीहंडरगुळीच्या आठवड्याच्या बाजारातील उलाढाल ही पाच कोटींपेक्षा अधिकची असते.

अहमदपूर तालुक्यातील मावलगाव येथील शरद पाटील या प्रगतिशील शेतकऱ्याला यासंबंधी विचारले असता ते म्हणाले, शेतकरी मेहनत करून पैसे कमावतात. तयार नसलेली जनावरे कमी किमतीत घेऊन त्यांचे पाच, सहा महिने भरणपोषण करून दुप्पट किमतीत जनावरे विकण्याचा व्यवसाय करणारे जिल्ह्यात हजारपेक्षा अधिक लोक असतील. या साऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. खरेदी केलेल्या जनावरांना पुढच्या दिवाळीपर्यंत सांभाळण्याची जबाबदारी वाढली आहे.

- लातूर जिल्ह्यातील देवणी येथील बाजार हाही मोठा आहे. बुधवार व गुरुवार असे दोन दिवस हा बाजार भरतो. आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक प्रांतातील खरेदीदार या बाजारपेठेत येतात. देवणी वंशाच्या जनावरांना देशभर मागणी आहे. खासकरून गाय व बैल त्यामुळे या बाजाराचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. जिल्ह्यातील रेणापूर, नळेगाव या दोन ठिकाणचा बाजारही मोठा असतो. नळेगावमधील बाजार पाच एकरांवर भरतो तर रेणापूरचा बाजार सात एकराच्या आवारात भरतो.
- उस्मानाबादचा बाजार, बीड जिल्ह्यातील नेकनूरचा बाजार, सोलापूर जिल्ह्यातील सांगोल्याचा बाजार, नगर जिल्ह्यातील श्रीगोंद्याचा बाजार व सांगली जिल्ह्यातील मिरजेचा बाजार हे जनावरांच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहेत. करोनामुळे सर्वच ठिकाणचा बाजार ठप्प झाला आहे.
- साधारणपणे दिवाळी झाल्यानंतर बाजारात जनावरांची संख्या वाढू लागते व एप्रिल, मे महिन्यात मोठ्या प्रमाणात बाजार भरतो व त्यामुळे उलाढालही मोठी होते. महिना उलटून गेला पण बाजार बंद असल्याने या बाजारावर अवलंबून असणाऱ्या सर्वांचेच धाबे दणाणले आहे. जूननंतर बाजार बंद होतो.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा
१०

९% व्याजदर
टीजेएसबी सहयोग
कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींवर मात करण्याकरिता विद्यमान ग्राहकांसाठी
१ कोटी पर्यंत मुदत कर्ज योजना*
अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या https://tjsbbank.co.in/Sahayog
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
www.tjsbbank.co.in | टोल फ्री : 1800 223 466
*अटी लागू | *कर्ज सर्वस्वी बँकेच्या निर्णयानुसार

# भविष्यातील अर्थव्यवहाराचे सूत्रधार

भविष्यात बँकिंग व्यवहार गरजेचे राहतील, बँका नव्हे, असे वक्तव्य, मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांनी नुकतेच केले आहे. हेच वक्तव्य त्यांनी २५ वर्षांपूर्वीही केले होते. तेव्हा त्यांना हसण्यावारी नेण्यात आले. मात्र गेल्या २५ वर्षांत माहिती तंत्रज्ञानाने घेतलेली झेप पाहून बिल गेट्स यांचे म्हणणे वास्तवात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यांच्या वक्तव्याचा विस्तार केला तर असे म्हणतात येईल की व्यवहार आवश्यक आहेत, दलाल नाहीत. ताळेबंद आवश्यक आहे पण अकाऊंटन्सीची गरज नाही. पैशाचे व्यवहार आवश्यकच आहेत पण पैसा नाही. ब्लॉकचेन तंत्राच्या आगमनाने ही बाब वास्तवात येण्याची स्थिती दिसू लागली आहे. पैसा किंवा वित्तीय व्यवहारांमध्ये बिटकॉइन या तंत्राच्या आगमनाने पारंपरिक वित्तीय व्यवस्था बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वित्तीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आधुनिक तंत्रज्ञान घट्टरीत्या जाऊन बसले आहे.

पॉलिसी बाजार, मोबिकविक, इनक्रेड, मनीट्रॅप या वित्तीय व्यवस्थेतील नव्या स्टार्टअप कंपन्यांनी पैशाच्या व्यवहाराला ऑनलाइन पद्धतीची जोड देऊन नवे वळण आणि दिशा दिली आहे. वित्तीय क्षेत्रात त्यामुळे नव्या करिअरच्या संधी निर्माण होत आहेत. फिनटेकसारख्या तंत्र कौशल्यास हस्तगत करणाऱ्या उमेदवारांसाठी वेगवेगळ्या करिअर संधी दार ठोठावू लागल्या आहेत.

**नवे तंत्र, नवी संधी :**

दलाल स्ट्रीटवरील गोंगाट आणि वित्तीय गोंधळ हा नव्या संगणकीय तंत्र आणि कौशल्यामुळे जवळपास संपल्यात जमा आहे. अमेरिकेतील वॉलस्ट्रीटवरील ७० टक्के आणि भारतातील दलाल स्ट्रीलवरील ५० टक्के व्यवहार हे संगणकाच्या साहाय्याने केले जातात. सेक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्स्जेंच बोर्ड ऑफ इंडिया-सेबीच्या, निरीक्षणानुसार गेल्या पाच वर्षांत ६ हजारांहून अधिक ब्रोकर्स आणि २५ हजारांहून अधिक सबब्रोकर्सना आपले दुकान बंद करावे लागले आहे. बरेच ग्राहक हे ऑनलाइन स्टॉक व्यवहार करू लागले आहेत. काही कंपन्या जवळपास शून्य कमिशन घेऊन शेअरची खरेदी-विक्री करण्यासाठी सेवा सल्ला द्यायला लागल्या आहेत. या घटकांमध्ये पारंपरिक दलालांच्या व्यवसायावर टाच आली आहे.

तंत्रज्ञानाच्या या त्सुनामी पारंपरिक अकाऊंटन्सी वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. हिशोबाची ताळमेळ करणाऱ्या सॉफ्टवेअर्समुळे पारंपरिक हिशोब, खातेवही, लेखांकन, जमाखर्च, पावत्या या घटकांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देण्यात आलेले अकाऊंटिंग सॉफ्टवेअर हे बँकेतील ताळमेळाच्या प्रकरणाची हाताळणी, जमाखर्चाच्या पावत्यांची वर्गवारी करणे, धोक्याचे विश्लेषण, मानवी चुका टाळून गैरव्यहारास आळा घालणे अशी कामे करण्यास सक्षम झाले आहेत.

**ब्लॉकचेन तंत्रज्ञान :**

ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे बँकर्स व बँकिंग व्यवस्थेला विकसित राष्ट्रांमध्ये तडे जाऊ लागले आहेत. जगातील कोणत्याही प्रदेशातील व्यक्तीसोबत सुरक्षितरीत्या ब्लॉकचेन तंत्राद्वारे व्यवहार करणे सुलभ झाले आहे. जगात पसरलेल्या संगणकीय जाळ्यामुळे या व्यवहारातील ब्लॉक हे टप्प्याटप्प्यांवर तपासले जात असल्याने हा व्यवहार सुरक्षित समजला जातो. या व्यवहाराच्या माध्यमातून कोणत्याही बँकेच्या मध्यस्थीशिवाय संपत्तीचे हस्तांतरण, उद्योजकांना कर्ज वितरण सुलभ झाले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे जुन्या पारंपरिक वित्तीय कार्यशैलीच्या पद्धती कालबाह्य होत आहेत. तंत्रज्ञानामुळे एकच क्रिया वारंवार करण्याची गरज संपुष्टात आली आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन व्यूहात्मक विचारसरणीचा विकास करणे शक्य झाले आहे. एटीएम, पैशाचे व्यवहार करणारे अ‍ॅप्स, ब्लॉकचेन आणि संगणकीय स्टॉक्स यामुळे वित्तीय मनुष्यबळ हा अधिक महत्त्वाच्या बाबींवर व व्यूहनीतीवर लक्ष केंद्रित करू शकतो. अधिकाधिक नफा कसा मिळवता येईल, अधिकाधिक ग्राहकांना कसे आकर्षित करता येतील या अनुषंगाने कार्यपद्धतीचा विकास आणि अंमलबजावणी करता येणे शक्य होऊ शकते.

**करिअर संधी :** वरील बाबी लक्षात घेता पुढील काही करिअर संधी भविष्यात निर्माण होऊ शकतात-

★ **स्ट्रॅटेजिक फायनान्शिअल ॲनालिस्ट-** कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड दिलेल्या सॉफ्टवेअरने तयार केलेल्या वित्तीय ताळेबंदाचे विश्लेषण करून व्यवसायासाठी आवश्यक ठरू शकणाऱ्या सक्षम बाजूचे निर्धारण करणे आणि संभाव्य आव्हानांची मांडणी करणे ही कामे या तज्ज्ञास करावी लागू शकतात.

★ **टेक्नॉलॉजी किंवा डिजिटल मॅनेजर्स-** नव्या तंत्रज्ञानाचा कंपनीच्या फायद्यासाठी अधिकाधिक वापर करणे, कंपनीच्या डिजिटल रूपांतरणाची संपूर्ण काळजी घेणे, ऑनलाइन ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा प्रदान करणे, ही कामे या मनुष्यबळास करावी लागतात.

★ **ॲप डेव्हलपर्स-** हे सॉफ्टवेअर तंत्रज्ञ ग्राहकांना उपयुक्त ठरतील अशी, कर्ज घेणे सुलभ करणारे ॲप, शेअर-खरेदी विक्रीचा सल्ला देणारे ॲप, गुंतवणुकीच्या संधीबाबत सल्ला देणाऱ्या ॲप्सची संकल्पना विकसित करणे, त्याचे डिझाइन करणे आणि ते प्रत्यक्षात अस्तित्वात आणणे यासाठी हे मनुष्यबळ कार्यरत असते.

★ **सायबर सिक्युरिटी प्रोफेशनल्स-** वित्तीय सॉफ्टवेअरमध्ये घडणाऱ्या भानगडींचा शोध घेण्याचे तंत्र आणि कौशल्य या तज्ज्ञांनी प्राप्त केले असते.

★ **फायनान्शिअल सर्व्हिस सेल्स पीपल-** आर्टिफिशिअल बुद्धिमत्तेच्या तांत्रिक क्रांतीच्या काळात या तज्ज्ञांना चांगली मागणी राहू शकते. मानवी मनाच्या अंतरंगात शिरून त्याला अधिकाधिक गुंतवणूक करण्यास वा पैसा खर्च करण्यास सांगण्याचे कसब हे अद्याप कृत्रिम बुद्धिमत्तेला जमलेले नाही. त्यामुळे ग्राहकांना संवाद व समजावण्याच्या कौशल्याचा वापर करणाऱ्या मनुष्यबळाची मागणी पुढील काळात वाढू शकते.

★ **पोर्टफोलिओ मॅनेजर्स-** उच्च नक्त मूल्य असणाऱ्या किंवा हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स किंवा कंपन्या यांना, धोके स्वीकारण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन गुंतवणुकीचे विविध मार्ग सुचवणे आणि त्यांच्या गुंतवणुकीची संपूर्ण काळजी घेणे ही कामे या तज्ज्ञास करावी लागतात. शेअर खरेदी-विक्री व्यवहारात असणारे दलाल आणि गुंतवणूक सल्लागार यांचे हे आधुनिक अवतार होत.

★ **इन्व्हेस्टमेंट बँकर्स-** कंपन्यांना व्यवसायवृद्धीसाठी लागणारी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी साहाय्य करणे, कंपनीकडे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी नावीन्यपूर्ण बाबींचा वापर करणे ही कामे या तज्ज्ञास करावी लागतात. कंपनीला गरज असणाऱ्या भविष्यवेधी गुंतवणूकदाराचा शोध घेऊन त्याला कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास बाध्य करण्याचे कार्यही हा तज्ज्ञ करतो. एखाद्या मध्यम श्रेणीच्या कंपनीला मोठ्या कंपनीतील विलीनीकरणासाठी मदत करतो. वित्तीय करारमदार करण्याची क्षमता-तंत्र आणि कौशल्यप्राप्त उमेदवारांसाठी हे क्षेत्र विविधांगी संधी उपलब्ध करून देते.

★ **डेटा सायंटिस्ट-** कंपनीचा अधिकाधिक फायदा होण्यासाठी समोर येणाऱ्या सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करणे आणि त्यातून अचूक निष्कर्ष काढणे ही कामे या तज्ज्ञांस करावी लागतात. ग्राहकांच्या हितासाठी हे तज्ज्ञ वेगवेगळ्या शेअर्सचा प्रवास भविष्यात कसा होऊ शकतो, याची भविष्यवाणी सांख्यिकी विश्लेषणाच्या मदतीने करू शकतात. ऑनलाइन पोर्टल्सवरून व्यवहाराचे विश्लेषण करून कोणती कंपनी अथवा उत्पादनास अधिक जाहिरातींची गरज आहे, याचा निष्कर्ष हे तज्ज्ञ काढू शकतात.

★ **ब्लॉकचेन डेव्हलपर्स-** दुबई, जॉर्जिया, इस्टोनिया, मॉरिशस अशांसारख्या देशांनी क्रिप्टोकरन्सी म्हणजेच संगणकीय चलनाचा अंगीकार केला आहे. यामुळे या देशात आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना व्यवहार करणे सुलभ झाले आहे. नजीकच्या काळात जगातील आणखी काही देश क्रिप्टोकरन्सीच्या चलनाकडे वळू शकतात, त्यामुळे या क्षेत्रातील तज्ज्ञांची गरजही वाढणार आहे.

वित्तीय क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी उपरोक्त बाबी ध्यानात ठेवावयास हव्यात. नव्या करिअर संधी निर्माण झाल्या आहेत. आधुनिक संगणकीय तंत्र आणि कौशल्य प्राप्त केले तर या संधी मिळणे सुलभ जाऊ शकते. भविष्यातील अर्थव्यवहाराचे सूत्रधार बनण्याची संधी नव्या तंत्रकौशल्यामुळे मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**शिष्यवृत्ती :**

**यूसीडी मायकेल स्मुरफिट गॅज्युएट स्कूल स्कॉलरशिप**

आयर्लंड देशातील डब्लिन येथे असलेल्या या बिझिनेस स्कूलमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळू शकते. या बिझिनेस स्कूलचा अभ्यासक्रम एम.एससी. या नावाने ओळखला जातो. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थ्याला जीमॅट- ग्रॅज्युएट मॅनेजमेंट ॲप्टिट्यूट टेस्टमध्ये ६५० वा त्यापेक्षा अधिक गुण मिळायला हवेत. या शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सूट दिली जाते. संपर्क- https://www.smurfitschool.ie/admissions/scholarships/

लेखन : सुरेश वांदिले

## नविद अंतुले यांचे निधन



**अलिबाग :** माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांचे पुत्र नविद अंतुले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने मुंबईत निधन झाले. सैफी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांना मंगळवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतच अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकारणापासून अलिप्त असलेल्या नविद यांनी बॅरिस्टर अंतुले यांच्या निधनानंतर सक्रिय राजकारणात प्रवेश केला होता. मात्र राजकीय वाटचालीसाठी त्यांनी काँग्रेसऐवजी शिवसेनेची निवड केली. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.

लोकसभा निवडणुकीत शिवसेना नेते अनंत गीते यांच्या प्रचारात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. दिलखुलास व्यक्तिमत्त्वामुळे ते तरुण पिढीत लोकप्रिय होते. त्यांच्या अकाली निधनाने म्हसळा आणि आंबेत परिसरात शोककळा पसरली आहे. सर्वपक्षीय नेत्यांनी त्यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त केला.

### किमान दोन-तीन दिवसांसाठी रेल्वे सुरू करण्याचा आग्रह

# कामगारांना रस्ते मार्गे पाठविण्यात अडचणी!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** टाळेबंदीमुळे गेल्या महिनाभरापासून राज्यात विविध ठिकाणी अडकून पडलेल्या परराज्यातील मजुरांना त्यांच्या मूळ राज्यात पाठविण्याची, तसेच अन्य राज्यांत अडकलेल्या महाराष्ट्रातील लोकांना परत आणण्याची परवानगी केंद्र सरकारने दिली असली तरी तीन लाख कामगारांना त्यांच्या राज्यात कसे पाठवायचे असा प्रश्न सरकारसमोर उभा राहिला आहे.

राज्यात प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, ओडिशा, झारखंड आदी राज्यांतील कामगार अडकून पडले असून त्यांचा आपल्या राज्यात जाण्याचा आग्रह आहे. बसमधून एवढ्या मजुरांना पाठविणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरू शकते. त्यामुळे किमान दोन-तीन दिवसांसाठी लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या सुरू करण्याचा आग्रह राज्याकडून केंद्र सरकारला केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात २५ मार्चपासून सुरू असलेल्या टाळेबंदीत परराज्यातून प्रामुख्याने गुजरात, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, ओरिसा आणि कर्नाटक राज्यांतून आलेले कामगार व विविध उद्योगांतून काम करणारे श्रमिक, नागरिक असे ५ लाख ४४ हजार जण अडकून पडले आहेत. राज्यात विविध ठिकाणी अडकून पडलेल्या या स्थलांतरित कामगारांची चार हजार ३४६ निवारा केंद्रांमध्ये व्यवस्था करण्यात आली असून तेथे त्यांना दोन वेळेचे भोजन व सकाळचा नाश्ता दिला जातो. शिवाय त्यांच्यासाठी डॉक्टरही नियुक्त करण्यात आले आहेत. मात्र त्यापैकी जवळपास अडीच ते तीन लाख नागरिकांना आपापल्या राज्यात परत जायचे असून तसा आग्रह त्यांनी सातत्याने धरला आहे.

मुंबई महानगर आणि पुणे महानगर तसेच नाशिक, औरंगाबादमधील करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे उद्योग पुन्हा कधी सुरू होतील आणि आपली नोकरी राहील की नाही याची शाश्वती नसल्याने तसेच करोनाच्या धास्तीने हे कामगार आपल्या राज्यात परतण्यासाठी आसुसलेले असून काही ठिकाणी तर टाळेबंदी तोडून आपल्या राज्यात परतण्याचा प्रयत्न कामगारांनी केल्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे राज्यांची तयारी असेल तर या कामगारांना सुरक्षितपणे तुमच्या राज्यात पोहोचविण्यास तयार आहोत, असा प्रस्ताव राज्य सरकारने गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आदी राज्यांना दिला होता.

सर्वच राज्यांच्या आग्रहानंतर केंद्राने या कामगार, पर्यटकांच्या स्थलांतरास परवानगी दिली आहे. अन्य राज्यांत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटक, मजूर तसेच नागरिकांची संख्या सुमारे २५ ते ३० हजारच्या घरात आहे.



**१० हजार एसटी बस सज्ज :** परराज्यातील कामगार, मजुरांना परत पाठविण्यासाठी राज्याचा आराखडा उद्या निश्चित केला जाईल. या दृष्टीने नियोजन सुरू करण्यात आले आहे. राज्याच्या विविध भागांत १० हजार एसटी बस सज्ज ठेवल्या आहेत. मात्र, करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी त्या बसमध्ये २० ते २५ प्रवासीच बसवले जातील. राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर संबंधित प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी या बसचा वापर केला जाईल. त्याचबरोबर खासगी बसचालकांशीही चर्चा केली आहे. मात्र, सरकारचा आराखडा ठरल्यावर त्यानुसार आम्ही प्रवासी पाठवण्याचे व कोटासारख्या शहरात अडकलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी परत आणण्याचे काम करू, असे परिवहनमंत्री अनिल परब यांनी सांगितले.

**राज्याची भूमिका :** अन्य राज्यांत परतणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने त्यांना कसे पाठवायचे असा प्रश्न सरकारसमोर आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यांनी आपल्या नागरिकांना घेऊन जावे किंवा केंद्र सरकारने रेल्वे गाड्यांची व्यवस्था करावी असा आग्रह धरला जाणार असल्याचेही सूत्रांनी सांगितले. बसने एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाठविणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरेल. कारण एका बसमध्ये जास्त प्रवासी घेता येणार नाहीत. परिणामी बसची संख्या जास्त लागेल. यावर उपाय म्हणून रेल्वे गाड्या सोडाव्यात, अशी राज्याची भूमिका आहे.

# ...चला... गप्पा मारूया!

*(पान १ वरून) म्हणजे सध्याचा चलनी शब्द म्हणजे पीपीई किट्सचं काय? हे म्हणजे जगणं आणि मरणं यातलं अंतर वाढवणारे तीन थर. ते अंगावर चढवले की जीव गुदमरतो, पाणीही पिता येत नाही... वगैरे जरी खरं असलं तरी या पीपीईस करोना विषाणू भेदू शकत नाही. त्यामुळे डॉक्टर्स, परिचारिका, पोलीस वगैरेंसाठी हे फार महत्त्वाचे असतात. पण महत्त्वाच्या गोष्टींची नेहमीच टंचाई असते. आणि या पीपीई किट्सची तर जगात टंचाई आहे. थोड्या वेळापूर्वी रशियाचे सर्वशक्तिमान अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनीही या पीपीई टंचाईविषयी नाराजी व्यक्त केली.*

*आणि ही अलीएक्स्प्रेस पीपीई किट्ससुद्धा विनासायास पुरवते. मार्च महिन्यात जगात करोनाचा आगडोंब उसळल्यापासून या अलीएक्स्प्रेसद्वारे किती पीपीई साधनं जगभरात विकली गेली असावीत?*

*अलीएक्स्प्रेसनं १५० देशांत चार कोटींपेक्षा अधिक पीपीई किट्स आणि त्या प्रकारची साधनं विकलीयेत. याखेरीज खुद्द जागतिक आरोग्य संघटनेला १० कोटी ११ लाख किट्स देण्याची घोषणाही अलीएक्स्प्रेसनं केलीये. स्पेन आणि इटली हे युरोपातील सर्वाधिक करोनाबाधित देश. या देशांत त्यामुळे अलीएक्स्प्रेस चांगलीच लोकप्रिय झालीये. या देशातून अलीएक्स्प्रेस वापरणाऱ्यांच्या संख्येत त्यामुळे २५ टक्क्यांनी वाढ झाल्याचं आकडेवारीतून दिसतंय.*

*साहजिकच अलीएक्स्प्रेसतर्फे या आणि अशा युरोपीय देशांत आपल्या मोठमोठ्या जाहिराती केल्या जातायत. त्या देशातली वर्तमानपत्रं, इलेक्ट्रॉनिक माध्यमं, समाजमाध्यमं अशा अनेक मार्गांनी अलीएक्स्प्रेस लोकांपर्यंत पोचतीये. तिची उपयुक्तता अनेकांना पटू लागलीये.*

*पण प्रश्न असा की जगात अन्य कोणाला काहीही जमत नसताना या एकट्या अलीएक्स्प्रेसला हे कसं काय जमतं? आणि मुख्य म्हणजे इतका स्वस्त दर सगळ्यासाठी देणं त्यांना कसं परवडतं? प्रश्न फार महत्त्वाचा आहे आणि त्याचं उत्तर त्याहून अधिक.*

*चीन हे त्याचं उत्तर. अलीएक्स्प्रेसनं आपल्या सगळ्या गरजांसाठी चिनी उत्पादकांना बांधून ठेवलंय. चीन जगात सर्वात स्वस्त उत्पादनांसाठी प्रसिद्ध आहेच. त्यामागे त्या देशाचं व्यापार धोरण, भव्य आणि अत्यल्प मोबदल्यात उत्पादनं तयार करणारी व्यवस्था अशी अनेक कारणं आहेत. त्याची चर्चा करण्याचं हे स्थळ नव्हे. पण याच कारणांमुळे जगातल्या जवळपास सर्व बलाढ्य कंपन्या चीनमध्ये आपले कारखाने काढतात. भारतातल्या एका लोकप्रिय घड्याळ निर्मात्यांनी आपला कारखाना गुजरातमधून चीनला हलवल्याचं माहीत असेलच. तर ही सर्व यंत्रणा अलीएक्स्प्रेसच्या मागे आहे.*

*आणि सगळ्यापेक्षाही महत्त्वाचा आहे तो जॅक मा आणि त्याची अलिबाबा ही कंपनी. अलीएक्स्प्रेस ही अलीबाबा या कंपनीची उपकंपनी आहे. करोनाकाळचा सर्वाधिक फायदा अलीबाबाला झाल्याचं अनेक पाहण्यांतून दिसतंय. लवकरच ही कंपनी जगातल्या सर्वाधिक बलाढ्य कंपन्यांत गणली जाईल.*

*ही खरी कमाल. आजाराची साथ पसरली चीनमध्ये आणि या साथीचा सर्वात मोठा नफेकरीही चीनच.*

*संकटातली नाही तर संकट हीच संधी असं चीन वागतोय आणि आपण 'संकटातील संधी' या विषयावर गप्पा मारू या...*

**– गिरीश कुबेर**
@girishkuber

## अर्थकारणाचे अभ्यासक डॉ. माधव दातार यांचे निधन

**मुंबई :** अर्थकारणाचे अभ्यासक, विश्लेषक, लेखक डॉ. माधव दातार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नवी मुंबई येथील निवासस्थानी बुधवारी निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

डॉ. दातार यांनी मुंबई विद्यापीठातून पीएच.डी. केले होते. आयडीबीआय बँकेतून मुख्य महाव्यवस्थापक पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते. वृत्तपत्रे, नियतकालिके, संकेतस्थळे यांसाठी अर्थकारण, समाजकारण, इतिहास, समकालीन आर्थिक प्रश्नांचा समाजावर होणारा परिणाम यांबाबत सातत्याने लेखन केले. परिस्थिती, धोरणांतील त्रुटी यांवर परखड भाष्य हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते.

'अर्थचित्रे', '१८५७ चे स्वातंत्र्य युद्ध', 'अच्छे दिन, एक प्रतीक्षा', 'महाराष्ट्र एक संकल्पना आणि मागोवा', 'फ्यूचर ऑफ इंडियन बँकिंग सेक्टर' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा त्यांचा ब्लॉग प्रसिद्ध आहे. 'समाजप्रबोधन पत्रिके'च्या संपादक मंडळातही दातार कार्यरत होते. 'लोकसत्ता'तही त्यांनी विपुल लिखाण केले.

## मुक्ता राजाध्यक्ष यांचे निधन

**मुंबई :** ज्येष्ठ नाट्य समीक्षिका मुक्ता राजाध्यक्ष यांचे बुधवारी कर्करोगाने निधन झाले. त्या ६३ वर्षांच्या होत्या.

मुक्ता यांची दीर्घकाळ कर्करोगाशी झुंज सुरू होती. एका खासगी रुग्णालयात मंगळवारी संध्याकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात आई साहित्यिका विजया राजाध्यक्ष, बहीण राधा, बंधू निरंजन आणि भावजयी सायली असा परिवार आहे. मुक्ता यांनी प्रायोगिक रंगभूमीबद्दल इंग्रजीत विपुल लेखन केले.

एनसीपीएसारख्या सांस्कृतिक संस्थांसोबत त्यांनी विविध प्रकल्पांवर काम केले. 'पार्थ फाइंडर' या पुस्तकाच्या त्या सहलेखिका होत्या.

# विकास मंडळांना मुदतवाढ द्या!

## राज्यपालांचे सरकारला निर्देश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** विविध विभागांमधील प्रादेशिक असमतोल कायम असल्याने आज, गुरुवारी मुदत संपत असलेल्या विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या विकास मंडळांना मुदतवाढ द्यावी, असे पत्रच राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठविले आहे.

राज्य शासनाने या पत्राला बुधवारी रात्रीपर्यंत उत्तर दिले नाही. राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यात सध्या वितुष्ट निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूने ताणले जात आहे.

घटनेच्या ३७१ (२) कलमानुसार विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या विकास मंडळांची मुदत गुरुवारी संपत आहे. या विकास मंडळांना लगेचच मुदतवाढ द्यायची नाही, अशी सत्ताधाऱ्यांची खेळी आहे. मंडळांची मुदत गुरुवारी संपत असली तरी मुदतवाढ देण्याबाबत राज्य सरकारच्या पातळीवर हालचाल झालेली नाही. राज्यपालांच्या पत्राला राज्य सरकारने प्रतिसादही दिलेला नाही. विकास मंडळांची मुदत संपली तरी लगेचच मुदतवाढ देण्याची आवश्यकता नाही. कालांतराने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेता येऊ शकतो, असे राज्य शासनातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री ठाकरे यांची विधान परिषदेवर नियुक्ती करावी, अशी दोनदा शिफारस करूनही राज्यपालांनी अद्याप निर्णय घेतलेला नाही. मंगळवारी मंत्र्यांचे शिष्टमंडळ भेटले असता राज्यपालांनी काहीच ठोस आश्वासन दिले नाही. यातूनच राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री अशी दरी निर्माण झाली असतानाच विकास मंडळांच्या मुदतवाढीसाठी राज्यपालांच्या पत्राची दखलच घेण्याचे सरकारने टाळले आहे.

## मुंबईत रुग्णसंख्या दुपटीचा कालावधी १० दिवसांवर

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** शहरात करोना रुग्णांच्या वाढीचा वेग मंदावत असल्याचा निष्कर्ष केंद्र शासननियुक्त समितीने काढला आहे. या निष्कर्षानुसार आधी ८.३ दिवस असा असलेला रुग्णसंख्या दुप्पट होण्याचा कालावधी १७ ते २७ एप्रिल दरम्यान दहा दिवसांवर गेला आहे. देश पातळीवर तो ९.५ दिवस आहे. तर राज्याचा कालावधी ८.९ दिवस इतका आहे.

केंद्रीय समितीने रुग्णसंख्या अधिक असलेल्या आठ विभागांमध्ये उपाययोजनांची पाहणी केली. हाजीअली ते वरळी, वरळी ते धारावी, चर्नी रोड ते धारावी, जे.जे. रुग्णालय ते चिंचपोकळी या विभागांसह विलेपार्ले ते ओशिवरा, सांताक्रूझ ते जोगेश्वरी (पूर्व), सांताक्रूझ ते धारावी आणि चुनाभट्टी ते पवई या समूह विभागातील १७ ते २७ एप्रिल या काळातील रुग्णसंख्येचे विश्लेषण समितीने केले आहे.

शहरातील बाधित रुग्णांचा मृत्यूदर हा राज्याच्या मृत्यू दरापेक्षा कमी असल्याचे निरीक्षणही नोंदविले आहे. राज्याचा मृत्यूदर दर शंभर बाधित रुग्णांमागे सरासरी ४.३ आहे. तर मुंबईत तो सरासरी ३.९ टक्के झाला आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील बाधित रुग्णांचा मृत्युदर सरासरी ६.३ टक्के एवढा होता.

## दिनदर्शिका

**गुरुवार, ३० एप्रिल २०२०**
भारतीय सौर १० वैशाख शके १९४२
मिती वैशाख शुक्ल - सप्तमी : १४ : ४० पर्यंत
नक्षत्र : पुष्य : २५ : ५३ पर्यंत
चंद्र - कर्क

**मेष :** संघर्ष टाळा.
**वृषभ :** संवाद घडेल.
**मिथुन :** आर्थिक प्रश्न सुटेल.
**कर्क :** आरोग्य उत्तम राहील.
**सिंह :** उधारीचे व्यवहार टाळा.
**कन्या :** सहकार्य मिळेल.
**तूळ :** जबाबदारी वाढेल.
**वृश्चिक :** यश मिळेल.
**धनू :** आरोग्य जपा.
**मकर :** आतुरता वाढेल.
**कुंभ :** सहनशीलता ठेवा.
**मीन :** मुलांचे कौतुक कराल.

**शुभ राशी : मिथुन, वृश्चिक**

## नेटक्लिप्स

लो | लोकसत्ता.COM

- पंजाब विद्यापीठानं वसतिगृह बनवलं आयसोलेशन वॉर्ड
- गुजरात पोलिसांनी उभारला आदर्श भाजी बाजार

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा...

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - बोलाचीच कढी?
- मोदी सरकारचा मोठा निर्णय : इतर राज्यांत अडकलेले विद्यार्थी, कामगारांना जाता येणार घरी
- अभिनेता इरफान खानचं मुंबईत निधन
- अन्यथा खासगी रुग्णालयांवर कठोर कारवाई करणार, राजेश टोपे यांचा इशारा

# रोज किमान दोन तासांचे 'डिजिटल पथ्य' पाळा

*(पान १ वरून)* संपादक गिरीश कुबेर आणि सहायक संपादक मुकुंद संगोराम यांनी बुधवारी 'मधुमेहाचे आव्हान आणि करोना काळ' या विषयावर डॉ. शशांक जोशी यांच्याशी वेबसंवाद साधला. यावेळी डॉ. जोशी यांनी मधुमेहींच्या निरोगी आयुष्यासाठी महत्त्वाचे कानमंत्र वाचकांना दिले. जगाच्या कानाकोपऱ्यातील 'लोकसत्ता'चे वाचक या वेबसंवादात सहभागी झाले होते.

डॉ. जोशी म्हणाले, चौरस आहार, आठ तासांची शांत झोप, व्यायाम आणि तणावविरहित जगणे हा सर्वांसाठीच महत्त्वाचा मूलमंत्र आहे. त्याबरोबरच व्यसनांचा त्याग करणे आणि साखरेवर नियंत्रण ठेवणे ही पथ्ये मधुमेही व्यक्तींनी पाळली तर करोनासारख्या आजारावर ते सहज मात करू शकतात. ठरलेल्या वेळी खा, कमी आणि सावकाश खा. आहारातील कर्बोदके कमी करा आणि प्रथिने वाढवा. व्यायामासाठी बाहेर जाणे शक्य नाही, त्यामुळे घरच्या घरी सूर्यनमस्कार, उठाबशा यांसारखे व्यायाम करा. जगात दर सात सेकंदाला मधुमेहाच्या एका रुग्णाचा मृत्यू होतो, हे प्रमाण करोनापेक्षा कितीतरी अधिक गंभीर आहे. त्याचा प्रतिबंध करण्यासाठी सर्वात आधी आपल्या जीवनशैलीतच बदल करणे आवश्यक आहे. यावेळी वाचकांच्या प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. जोशी म्हणाले, आहार म्हणजेच 'डाएट' हा आजच्या जगण्यातील परवलीचा शब्द आहे. मधुमेही रुग्णांनी आपल्या डॉक्टरांशी सल्लामसलत केल्याशिवाय कोणतीही आहारपद्धती अवलंबू नये. करोनासारख्या साथीच्या काळात मधुमेह नसलेल्यांनीही किटोसारख्या आहार प्रयोगांपासून दूर राहावे. आपल्या कुटुंबात वर्षानुवर्षे घेतला जाणारा आहार हा आदर्श मानावा. स्वीटनरचा मर्यादित वापर करण्यास हरकत नाही, मात्र त्यापासून पक्वान्ने करून खाऊ नयेत. लहान मुले आणि गर्भवती महिलांनी स्वीटनरचा वापर टाळावा. फळे खावीत का, ही शंका रुग्ण विचारतात. सीताफळ, रामफळ, चिकू, आंबा, केळे वगळता रोज एक फळ खाण्यास हरकत नसल्याचे डॉ. जोशी यांनी स्पष्ट केले.

**भारतीय अधिक भावनाप्रधान!**

परदेशी नागरिकांच्या तुलनेत भारतीय, विशेषतः मराठी आणि बंगाली माणसे अत्यंत संवेदनशील, भावनाप्रधान आणि हळवी असतात. मधुमेही रुग्णांमध्येदेखील लगेच चिडचिडे होणे, भावनिक होणे, अशी लक्षणे दिसतात. बंदचा काळ त्यांच्यासाठी अवघड असणे स्वाभाविक आहे, मात्र आवडीच्या गोष्टींमध्ये मन रमवले असता त्याचा सकारात्मक परिणाम नक्की दिसेल, असे डॉ. जोशी म्हणाले.

**'रसांपेक्षा चहा घ्यावा'**

सकाळी फिरायला गेल्यानंतर अनेक जण कारल्याचा रस, कडुनिंबाचा रस, दुधी भोपळ्याचा रस घेतात. हे ज्यूस म्हणजे काही जादूचा काढा नाही. हे रस करताना त्यामध्ये शुद्ध पाणी वापरले जाते का याची तपासणी केली जात नाही. त्यामुळे असे रस घेण्यापेक्षा घरामध्ये आलं किंवा सुंठ टाकून केलेला चहा घेणे चांगले आणि पाचक ठरेल.

### डॉ. शशांक जोशी म्हणाले...

आंब्याच्या दोनच फोडी खा. मात्र, त्यानंतर १० ते १५ मिनिटे शतपावली करून फळ खाण्यातून मिळालेली ऊर्जा आपण जाळू शकतो.

- मधुमेही रुग्णाने दुपारी झोप घेणे प्रकृतीला योग्य नाही. झोपेत घोरत असाल तर वैद्यकीय तपासणी करून घेणे उचित ठरेल.
- चहामध्ये कृत्रिम शर्करा (शुगर फ्री) टाकायला हरकत नाही. मात्र, लाडू आणि जिलेबीमध्ये तसे करू नका.
- भारतीय डायबेटिक असोसिएशन मधुमेह असलेल्या व्यक्तीस अल्कोहोल घेण्याची परवानगी देत नाही.
- मधुमेही व्यक्तींमध्ये असलेला चिडचिडेपणा कमी करण्यासाठी ध्यानधारणा आणि विपश्यना करणे योग्य ठरेल.
- गुळामध्ये ग्लायकोमिक्स इंडेक्स कमी असले, तरी गूळ हा साखरेला पर्याय ठरू शकत नाही. साखरसम्राटांच्या महाराष्ट्रात साखरेवर गुळाची मात होणे अवघड आहे.

### भुकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे करा...

मधुमेह असलेल्या व्यक्तीस भूक मारणे अवघड जाते. भुकेवर नियंत्रण ठेवताना खूप भूक लागते तेव्हा कमी उष्मांक असलेले पदार्थ घ्यावेत. पाणी, लिंबू-पाणी, ताक, दही किंवा मुरमुरे (चुरमुरे) घ्यावे. त्यामुळे भुकेवर नियंत्रण ठेवणे शक्य होते. जेवणामध्ये दोन पोळ्या किंवा एक भाकरी आणि थोडासा भात घ्यावा. प्रथिनांसाठी डाळ खाणे महत्त्वाचे आहे.

## खरीप हंगामासाठी खते, बियाणे शेतकऱ्यांच्या बांधावर

**मुंबई :** करोनाच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामासाठी राज्यातील शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके त्यांच्या शेताच्या बांधापर्यंत पोहोचविण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे.

त्यासाठी कृषी सेवा केंद्र आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून ३१ मेपूर्वी या साहित्याचा पुरवठा शेतकऱ्यांना होईल असे नियोजन करण्याचे आणि त्यासाठी कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गावपातळीवर समन्वयक म्हणून काम पाहण्याचे आदेश कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी दिले आहेत.

राज्यातील खरीप हंगामाच्या तयारीच्या दृष्टीने कृषीमंत्र्यांनी सर्व जिल्ह्यांच्या आढावा बैठका दूरचित्रसंवादाद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) घेतल्या. या वेळी बियाणे, खते, कीटकनाशके शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला.

## हीरक महोत्सवानिमित्त राज्याच्या प्रगती आणि आव्हानांचा वेध

*(पान १ वरून)* माजी मुख्यमंत्री घेणार आहेत. साठ वर्षांत महाराष्ट्राने साधलेला विकास व भविष्यात कोणते उपाय योजण्याची आवश्यकता आहे यावरही प्रकाश टाकण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशीही राज्याच्या स्थितीबाबत चर्चा करता येईल.

**सहभागी होण्यासाठी...**

झूम ॲपच्या माध्यमातून वाचकांना या वेबसंवादात सहभागी होता येईल. या नेत्यांना प्रश्न विचारण्यासाठी http://tiny.cc/Loksatta-Maharashtra60 या लिंकवर क्लिक करून सहभागी व्हायचे आहे. या लिंकवर नोंदणी केल्यावर तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल. या संदेशात देण्यात येणाऱ्या लिंकवर क्लिक करून सहभाग घ्यायचा आहे.

# इरफान खान यांचे निधन

*(पान १ वरून)* सिनेमांमध्ये भारतीय प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य त्यांना मिळाले होते.

गेली दोन वर्षं दुर्धर आजाराशी सामना करीत असलेल्या इरफान यांची प्रकृती मंगळवारी बिघडल्याने त्यांना कोकिळाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र बुधवारी सकाळी उपचार सुरू असतानाच त्यांचे निधन झाले.

२०१८ मध्ये इरफान यांना न्यूरोएन्डोक्राईन ट्युमर हा दुर्धर आजार झाला असल्याचे निदान झाले होते. त्यानंतर लंडनमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. वर्ष-दीड वर्षांच्या उपचारांनंतर इरफान मुंबईत परतले, मात्र त्यांच्या प्रकृतीत पूर्णपणे सुधारणा झाली नव्हती. नुकतेच इरफान यांच्या आईचे जयपूर येथे निधन झाले होते. यानंतर तीनच दिवसांत इरफान यांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

आजारातून उठल्यानंतर त्यांनी 'अंग्रेजी मीडियम'सारखा चित्रपटही पूर्ण केला होता. ते पुन्हा चित्रपटातून दिसतील, अशी आशा सगळ्यांच्या मनात निर्माण झाली असतानाच त्यांचे हे अचानक जाणे अनेकांना चटका लावून गेले आहे. इरफान खान यांची कारकीर्द अनेक चढउतारांनी भरलेली आहे. त्यांनी सुरुवातीच्या काळात दूरदर्शनवरील 'भारत एक खोज', 'चाणक्य', 'बनेगी अपनी बात', 'चंद्रकांता', 'स्टार बेस्टसेलर' अशा मालिकांमधून काम केले. १९८८ साली मीरा नायर यांच्या 'सलाम बॉम्बे' चित्रपटातून पहिली संधी मिळाली; मात्र पहिल्याच भूमिकेला कात्री लागल्याने निराश झालेल्या इरफान यांच्या मनात अभिनय सोडून देण्याचा विचारही डोकावून गेला होता. २००१ साली त्यांच्या अभिनय कारकिर्दीला कलाटणी मिळाली. आसिफ कपाडिया या ब्रिटिश दिग्दर्शकाच्या 'द वॉरिअर' या चित्रपटात त्यांना मुख्य भूमिका मिळाली. त्यानंतर हिंदीत 'हासिल', 'मकबूल'सारखे वेगवेगळे चित्रपट त्यांच्या वाट्याला आले. 'पानसिंग तोमर' या चित्रपटाने त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळवून दिला. 'द लंचबॉक्स', 'पिकू', 'तलवार' या चित्रपटातील त्यांच्या भूमिकांचे कौतुक झाले. एकीकडे हिंदीत त्यांची चित्रपट कारकीर्द बहरत असतानाच हॉलीवूडमध्येही द नेमसेक, द अमेझिंग स्पायडरमॅन, लाइफ ऑफ पाय, ज्युरासिक वर्ल्ड, इन्फर्नो अशा मुख्य धारेतील चित्रपटातून त्यांनी केलेल्या भूमिकांमुळे आंतरराष्ट्रीय कलाकार म्हणूनही त्यांची ख्याती झाली.

## सिनेविश्वातून हळहळ व्यक्त...



इरफान खान यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. दर्जेदार अभिनयासाठी ते कायम लक्षात राहतील. त्यांचे कुटुंबीय, मित्र यांच्या दुःखात सामील आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.
■ **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

अभिनेता इरफान खान यांचे जाणे ही सर्वात दुःखद घटना आहे. तो एक उत्तम नट आणि उत्तम सहकारी होता. जागतिक चित्रपटसृष्टीला त्याने मोलाचे योगदान दिले. त्याच्या निधनाने अभिनय क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. आम्ही त्याच्या कुटुबीयांच्या दुःखात सहभागी आहोत.
■ **अमिताभ बच्चन**, ज्येष्ठ अभिनेते

माझ्या मित्रा, तू अनेक अभिनेत्यांसाठी प्रेरणादायी होतास. समस्त चित्रपटसृष्टीला तुझी उणीव जाणवेल.

*पैमाना हे कोई,*
*मैखाना कहे है,*
*दुनिया तेरी आखों को भी,*
*क्या क्या ना कहे.*

■ **शाहरुख खान**, अभिनेता

प्रिय मित्रा, तू शेवटपर्यंत लढलास. तुझा नेहमीच अभिमान आहे. आपण पुन्हा भेटूच. सुतापा आणि बाबीलच्या दुःखात आम्ही सामील आहोत. सुतापा, तूही त्याला शेवटपर्यंत साथ दिलीस. त्याच्या आत्म्यास शांती लाभो.
■ **शुजित सरकार**, दिग्दर्शक

तुम्ही नाही आहात, यावर विश्वास ठेवणे कठीण होत आहे. तुमचे चित्रपट पाहून तुमची आठवण येत राहील. चित्रपटसृष्टीत तुम्ही सर्वोत्कृष्ट आहात.
■ **तापसी पन्नू**, अभिनेत्री

ज्या पद्धतीने ते आपल्या आजाराशी लढले त्याची कल्पनाही करणे आपल्याला शक्य नाही. इतक्या आजारपणातही त्यांनी आमच्याबरोबर 'अंग्रेजी मीडियम' चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले. नेहमीच हसतमुख असणाऱ्या इरफान यांनी त्यांच्या वेदना, त्यांचे प्रश्न कधीच आम्हाला जाणवू दिले नाहीत.
■ **दीपक दोब्रियाल**, अभिनेता

हिंदी चित्रपटातील हिरोची तथाकथित चौकट मोडण्याचे काम त्यांनी केले. सतत परिश्रमावर विश्वास ठेवणाऱ्या इरफान यांचा सहजअभिनय अनेक हुशार, नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी होता. मी जेव्हा जेव्हा त्यांना 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'च्या कार्यक्रमांना बोलवायचो तेव्हा कुठलेही आढेवेढे न घेता ते हजर व्हायचे. 'वामन भाई यह लो हाजिर है, बताईए क्या करना है...' हे त्यांचे वाक्य मी कधीही विसरणार नाही. तुम्ही तुमच्या अभिनयातून कायम आमच्याबरोबर राहाल.
■ **वामन केंद्रे**, दिग्दर्शक

इरफानला कॅमेऱ्यासमोर अभिनय करताना पाहणे, ही दिग्दर्शकासाठी सुखद गोष्ट होती. त्याने अभिनयाचा दर्जा अतिशय वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला होता. अभिनय करताना संवादफेक, त्याचा वावर, सहजता या वैशिष्ट्यांमुळे तो इतर कलाकारांपेक्षा वेगळा ठरतो.
■ **अभिनय देव**, दिग्दर्शक

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### उत्पन्न घटलेले असताना निधी कसा उभा करायचा?

**'बोलाचीच कढी?'** हा अग्रलेख (२९ एप्रिल) वाचला. उद्योगधंदे व रोजगाराचा मुद्दा महत्त्वाचा आहेच, पण तो राज्यांनी परिस्थितीनुसार घ्यायचा आहे. कारण बहुतेक उद्योगधंदे करोना संसर्गाच्या 'रेड झोन'मध्ये आहेत, तसेच त्याकरता वाहतूक सुरू करावी लागेल. याबाबत काय उपाय करता येतील, हे कोणी सुचवत नाही. दुसरा मुद्दा गरीब वर्ग आणि उद्योगांना लागणाऱ्या पैशाचा. अनेकांनी याकरता जीडीपीच्या पाच टक्के निधी हवा असे म्हटले. पण उत्पन्न घटलेले असताना तो निधी कसा उभा करायचा? सरकारने ठेवींवरील व्याजदर कमी करून काही पैसे उभे केलेत. पण हा पैसा बहुतेक मध्यमवर्गीयांच्या खिशातून जाणार हे उघड आहे. वास्तविक कर्जरोखे, कंपन्यांनी वाटलेल्या लाभांशावर कंपन्यांकडून कोविड कर, ५० लाख वा एक कोटींहून अधिक उत्पन्नावर अतिरिक्त आयकर, खर्चात कपात (सातव्या वेतन आयोगानुसार पगार घेणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचा ग्रेडपे पाच टक्के कमी करता येईल; कारण माथूर समितीने हे नमूद केले आहे की, सरकारी कर्मचाऱ्यांना समकक्ष खासगी कर्मचाऱ्यांपेक्षा जवळपास दुप्पट पगार मिळतो) असे अनेक उपाय योजता येतील. पण इच्छाशक्ती नसल्याने फक्त संभाव्य खर्च (महागाई भत्ता आदी) पुढे ढकलले आहेत. हे पुरेसे नाही. जीडीपी घटल्याने ज्या छोट्या उद्योगांवर परिणाम होणार आहे, त्यांनाही मदत करणे गरजेचे आहे.

– **विनायक खरे,** नागपूर

### बोलाच्या कढीला अव्यवहारेषु निर्णयांची फोडणी

**'बोलाचीच कढी?'** हा अग्रलेख (२९ एप्रिल) वाचला. सध्या करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेली टाळेबंदी आणि स्थलांतरित मजूर या विषयांवर सर्वत्र अभूतपूर्व गोंधळ सुरू आहे. अग्रलेखात म्हटल्याप्रमाणे स्थलांतरित मजुरांना त्यांच्या मूळ गावी जाऊ देण्याच्या मुद्द्यावर पंतप्रधान-मुख्यमंत्री चर्चेत उत्तर मिळाले नसले तरी, त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर हे केंद्राला कोणत्याही परिस्थितीत द्यावेच लागेल. परंतु महत्त्वाच्या प्रश्नांवर मौन बाळगणे ही या केंद्र सरकारची जुनीच वृत्ती आहे. याचे प्रत्यंतर २०१६च्या नोटाबंदीच्या निर्णयानंतरही आले आहे. त्या निर्णयामुळे सर्वसामान्य लोकांची, छोटे उद्योजक व शेतकरी- त्यातही या गरीब व हातावर पोट असलेल्या मजुरांची जी काही अभूतपूर्व परवड झाली. त्या वेळेस उपस्थित झालेल्या प्रश्नांबाबत केंद्र सरकारने आजतागायत मौन बाळगले आहे.

नुसतीच 'बोलाची कढी' तिला 'अव्यवहारेषु निर्णयांची फोडणी' आणि 'बोलाचाच भात' हीच सध्या केंद्र सरकारच्या राज्यकारभाराची भाषा झाली आहे असे वाटते.

– **व्ही. एस. मोरे,** डोंबिवली (जि. ठाणे)

### स्थलांतरितांबद्दलच्या मौनाचा अर्थ काय लावायचा?

**'बोलाचीच कढी?'** हे संपादकीय वाचले. हजारो स्थलांतरित कामगार आपापल्या गावी जाण्यासाठी हजारो किलोमीटर आजही चालत जात आहेत. खरे तर या एक महिन्याच्या काळात जे आपल्या गावी जाऊ इच्छितात, त्यांना ऑनलाइन नोंदणीचे आवाहन करून त्यांची माहिती गोळा करण्याचे काम विनासायास करता आले असते. त्यामुळे सरकार आपल्यासाठी काही तरी करते आहे अशी भावनाही त्यांच्या मनात निर्माण झाली असती आणि उपलब्ध माहितीचा वापर करून त्याप्रमाणे नियोजन करता आले असते. यामुळे अशा स्थलांतरितांचा विनाकारण बोजा तरी त्या-त्या राज्यांवर वाढला नसता. असे स्थलांतरित आपापल्या गावी जाऊन किमान शेतीत तरी काम करू शकले असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेचे चक्र काही प्रमाणात सुरू राहिले असते. मात्र हे झाले नाही. टाळेबंदीच्या एक महिन्यानंतरदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी स्थलांतरितांच्या प्रश्नाबाबत सोयीस्कर मौन पाळून आहेत. याचा अर्थ सामान्यजनांनी काय लावायचा?

– **धनराज खरटमल,** मुलुंड पश्चिम (मुंबई)

### माणुसकीहीन अलिप्तता क्लेषदायक...

**स्थलांतरित मजुरांना** त्यांच्या मूळ गावी पाठविण्याचा प्रश्न सध्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. करोनाच्या अरिष्टावर मात करण्यासाठी या मजुरांना मूळ गावी रवाना करणे हाच जणू एकमेव उपाय आहे असे भासविले जात आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात या असंघटित मजुरांचे योगदान मोठे आहे, हे सोयीस्करपणे नजरेआड केले जात आहे. या मजुरांच्या श्रमाच्या बळावरच आपल्या येथील उद्योग-व्यवसाय देशात अव्वलस्थानी आहेत, याची जाणीव शासनालाही नाही आणि उद्योजकानांही नाही. आपल्या मूळ गावी परतण्यासाठी कुटुंबकबिल्यासह उन्हातान्हात अनवाणी मार्गस्थ होणारे हे तांडे पाहून एकाही उद्योजकाने काही प्रतिक्रिया व्यक्त केल्याचे वाचनात नाही. ही माणुसकीहीन अलिप्तता पराकोटीची क्लेषदायक आहे. करोनाचे संकट कायमचे नाही. कालांतराने उद्योगचक्र पुन्हा वेग घेणारच आहे. त्या वेळी या मनुष्यबळाची निकड महत्त्वाची असेल. अर्थव्यवस्था पुनरुज्जीवित करण्यासाठी या श्रमशक्तीला पुन्हा एकदा बळ देणे अपरिहार्य ठरणार आहे. करोनानंतरच्या समस्यांचा विचार दृष्टीसमोर ठेवून या स्थलांतरित मजुरांची उपेक्षा करणे कितपत सयुक्तिक ठरेल याचा विचार आजच करणे इष्ट होईल.

– **सतीश कुलकर्णी मालेगावकर,** नांदेड

### वैयक्तिक फायद्यासाठी सार्वजनिक पैसा वापरणे गैर

**'अनुत्पादक होते** म्हणून गुंतवणूक धोरण निंद्य ठरत नाही' या शीर्षकाचे वाचकपत्र (लोकमानस, २९ एप्रिल) वाचले. या मुद्द्याशी सहमत होता येत नाही. फ्रँकलिन टेम्पल्टनचे संतोष कामत यांनी केलेली गुंतवणूक चुकीची आहे. मुळातच गुंतवणूकदारांकडून पैसे घेतो तेव्हा त्याचे योग्य नियोजन करणे ही फंड व्यवस्थापकाची जबाबदारी असते. वैयक्तिक गुंतवणूकदार स्वतः अशा चुकीच्या पद्धतीने गुंतवणूक करतो तेव्हा ती त्याची वैयक्तिक जबाबदारी असते. इथे मुद्दा सार्वजनिक आहे. वैयक्तिक फायद्यासाठी सार्वजनिक पैसा वापरणे गैर आहे. तसा अधिकार कामत यांना कुणी दिला? सर्वसामान्य माणूस विश्वासाने फंडाकडे आपला पैसा सुपूर्द करतो. काही तरी परतफेड मिळावी हा उद्देश त्यामागे असतो. त्यामुळे वरील प्रकरणात त्याचा विश्वासघात झाला नाही काय?

– **राजन बुटाला,** डोंबिवली (जि. ठाणे)

### माफ केलेल्या कर्जांचे पूर्ण सत्य सरकारने मांडावे

**'निर्ढावलेल्यांची कर्जे** बँकांकडून माफ!' हे वृत्त (लोकसत्ता, २९ एप्रिल) वाचले. माहिती अधिकारांतर्गत विचारलेल्या प्रश्नाला रिझर्व्ह बँकेने दिलेल्या उत्तरात- ५० बड्या उद्योजकांनी थकबाकीसह बुडविलेली सुमारे ६८,६०७ कोटी रुपयांची कर्जे निर्लेखित केली असल्याची माहिती धक्कादायक आहे. या उद्योजकांना दिलेल्या एकूण कर्जांपैकी किती रकमेची कर्जे वसूल झाली, याची माहिती जनतेपुढे येणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणांच्या चौकशीचे पुढे काय झाले, यासंबंधीच्या माहितीवर सरकारकडून खुलासा आलेला नाही. काँग्रेसच्या राहुल गांधींनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासंबंधी विचारलेल्या प्रश्नाला सरकारकडून उत्तर मिळाले नव्हते. बुडीत कर्जांसंबंधी माहिती जाहीर होताच काँग्रेसच्या नेत्यांकडून सरकारवर जाहीर आरोप केले जात आहेत. म्हणूनच मोदी सरकारकडून रिझर्व्ह बँकेने माफ केलेल्या कर्जासंबंधी अधिकृत माहितीचे पूर्ण सत्य जनतेसमोर मांडले जावे.

– **स्नेहा राज,** गोरेगाव (मुंबई)

### कर्जमाफीची माहिती आणि लोकशाहीची थट्टा

**कर्जबुडव्या ५०** कर्जदारांची तब्बल ६८,६०७ कोटी रुपयांची कर्जे ३० सप्टेंबर २०१९ अखेर माफ झाली. आणि ही बाब जनतेला माहितीच्या अधिकारात साकेत गोखले यांनी रिझर्व्ह बँकेला प्रश्न उपस्थित केल्यावर कळते, यापेक्षा लोकशाहीची थट्टा ती काय असावी? आता विजय मल्यापासून मेहुल चोक्सीपर्यंतच्या बड्या कर्जबुडव्यांना कर्जमाफी दिल्यावर जनतेने कोणाकडे पाहावे?

– **नितीन गांगल,** रसायनी

### संकटकाळात टीका करण्याचे कारण नाही...

**'राष्ट्रासाठी कसोटीचा** काळ' या केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल 'निशंक' यांच्या लेखावरील (२८ एप्रिल) 'कौतुक,अप्रूप... अन् भुसा भरलेले भोत' या शीर्षकाचे वाचकपत्र (लोकमानस, २९ एप्रिल) वाचले. सध्याच्या करोना संकटाच्या कालावधीत पंतप्रधान मोदी ज्या आश्वासक वृत्तीने आणि धीराने पावले उचलित आहेत आणि आपले मनोगत व्यक्त करीत आहेत, त्याबद्दल त्यांच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने चांगले उद्गार काढले तर त्याबद्दल असूया वाटण्याचे, टीका करण्यासाठी सरसावण्याचे काही कारण नाही. या संकटकाळात सकारात्मक धोरण सर्वांकडून ठेवले जावे ही अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरू नये.

– **अ‍ॅड. सुरेश पटवर्धन,** कल्याण (जि. ठाणे)

### अशा वेळी मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणणे अयोग्य

**'ऐन करोनाकाळात** राजभवन-मंत्रालय संघर्ष' ही बातमी (लोकसत्ता, २९ एप्रिल) वाचली. राज्यपालपद केंद्राच्या मेहरबानीनेच मिळत असल्याने त्याचा वापर हा नेहमीच रबरी शिक्क्यासारखाच होत आलेला आहे. राज्यपाल कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची राज्यपालनियुक्त आमदार म्हणून नियुक्ती करण्यासाठी चालवलेली टाळाटाळ ही तेच अधोरेखित करते. करोनासारख्या संकटाशी महाराष्ट्र लढत असताना क्षुद्र राजकारणासाठी मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणणे कितपत योग्य आहे, याचा विचार राज्यपालांनी करावयास हवा. पण त्यांना 'आदेशानुसार'च वागणे भाग पडत असावे. अर्थात सर्व कायदेशीर पूर्तता करून मंत्रिमंडळाने उद्धव ठाकरेंच्या नियुक्तीसाठी केलेला ठराव स्वीकारणे राज्यपालांना नैतिकदृष्ट्या व कायदेशीरदृष्ट्या भाग आहे. घटनात्मक अधिकारांचा (गैर)वापर करून ठाकरे सरकारला पायउतार करता येईल आणि आपल्याला पुन्हा सत्तेवर मांड ठोकता येईल या भ्रमात भाजपचे नेते वावरत असतील, तर त्यांचे घर उन्हात आहे की काय ते तपासायला हवे!

– **मुकुंद परदेशी,** धुळे

# बहुमताचे कोडे...

**'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानावर आधारित 'बिटकॉइन'च्या चलनवलनात कोणतीही केंद्रीय संस्था नाही, कोणा एकाकडेच खास अधिकारही नाहीत. तरीही आर्थिक व्यवहारांची ही साखळी बहुमताने सुरळीत कशी पार पडते, हे कोडे आकळण्यासाठी क्रूर राजा आणि त्याच्या राजधानीला घेरून असणाऱ्या चार सेनापतींच्या गोष्टीत डोकावायला हवे...**



**साखळीचे स्वातंत्र्य**


**गौरव सोमवंशी**

**एक विमान,** अंतराळात जाणारे रॉकेट आणि एक अणुऊर्जा केंद्र मनात आणून पाहा. या तिन्हींत तुम्हाला दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवतील : एक म्हणजे, काहीही कारणाने यात तांत्रिक बिघाड झाल्यास मोठी आपत्ती उद्भवेल. दुसरे, हे तिन्ही अनेक छोट्या-मोठ्या प्रणालींनी बनले आहेत; त्यामधील काही स्वतंत्रपणे काम करतील, तर काही पूर्णपणे दुसऱ्या प्रणाली वा तंत्रांवर अवलंबून असतील. म्हणजेच त्यातील कोणतीही एक प्रणाली वा तंत्र बिघडले तर सगळेच बंद पडेल. यावरून ध्यानात येईल की, आदर्श संरचना ती असते, ज्यात काही घटकांत बिघाड झाला तरी इतर कामे नियमितपणे सुरू राहतात.

हाच विचार 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानावर आधारित 'बिटकॉइन'च्या संदर्भात करू या... बिटकॉइनमध्ये कोणतीही केंद्रीय संस्था नाही. कोणा एकाकडे काही खास अधिकारही दिलेले नाहीत. बिटकॉइनमध्ये प्रत्येक गोष्ट बहुमताने ठरते, कारण अधिकारांबाबत सर्वच समान आहेत. मात्र असे असले तरी, ज्यांना तांत्रिक गोष्टींची जाण आहे असे काही लोक यात स्वार्थासाठी चुकीच्या कृती करायलाही टपून बसलेले आहेतच. त्यामुळे त्यापैकी कोणी येऊन काही खोडी करणारच नाही हे खात्रीने कसे सांगायचे? अशा परिस्थितीत प्रस्थापित चलनाला समर्थ पर्याय म्हणून जागतिक पातळीवर आर्थिक व्यवहार कसे करायचे?

यासंदर्भात आपण मागील लेखात क्रूर राजा आणि त्याच्या राजधानीला घेरून असणाऱ्या सेनापतींचे उदाहरण पाहिले. हेच उदाहरण १९८२ मध्ये लेस्ली लॅम्पोर्ट यांच्याकडून आणि पुढे २००८ मध्ये सातोशी नाकामोटोनेही विचारात घेतले होते. बहुमत मिळवताना असत्य, अफवा किंवा चुका कशा टाळायच्या, हे या उदाहरणातून कळेल.

त्यासाठी मागील लेखातील कोडे पुन्हा पाहू. आठवते का कोडे? त्या कोड्यात एका क्रूर राजाची राजधानी आहे. त्याला चार (कोणताही आकडा चालेल, आपण चार घेऊ या) सेनापतींनी आपल्या सैन्यासमवेत चारही बाजूंनी घेरले आहे. त्यांना राजधानीला सामोरे जाताना दोनच पर्याय आहेत : पलायन किंवा आक्रमण. कमीत कमी तीन सैन्यांनी तरी एकाच निर्णयावर बहुमत मिळवून काम करायला हवे, म्हणजे तीन किंवा चारही सैन्यांनी एकच काही तरी ठरवावे आणि त्याप्रमाणे वागावे. जर का अर्ध्यांनी पलायन आणि अर्ध्यांनी आक्रमण (दोन आक्रमणे आणि दोन पलायने) केले, तर ते ठेचले जातील. ते एकमेकांशी दूतांमार्फत बोलू शकतात, पण दूतांना एकीकडून दुसरीकडे क्रूर राजाच्या राजधानीतूनच पाठवावे लागतील, कारण बाहेरून मार्ग नाही. राजधानीतून जाताना दूत पकडले गेल्यास संदेशसुद्धा बदलला जाऊ शकतो. पण हे कोडे इथे थोडे अवघड झाले आहे. कारण चारांपैकी कोणी तरी एक सेनापती हा अगोदरच क्रूर राजाला फितूर झाला आहे. नक्की कोणता सेनापती ते कळायला मार्ग नाही. हा फितूर झालेला सेनापती एका सेनापतीला 'चला, आक्रमण करू' आणि दुसऱ्या कोणा सेनापतीला 'चला, पलायन करू' असे काहीही सांगू शकतो. त्याचे म्हणणे जर सैन्यांनी ऐकले तर अर्धे आक्रमण करतील व अर्धे पलायन करतील आणि यामुळे अंती क्रूर राजा जिंकेल. तर हे निःसंदिग्ध बहुमत कसे मिळवायचे?



यासाठी आपल्याला गणित... विशेषतः कूटशास्त्राची (क्रिप्टोग्राफी) मदत घ्यावी लागेल. समजा, प्रत्येक सेनापती संदेशात नुसते 'पलायन करा' किंवा 'आक्रमण करा' इतकेच न पाठवता, त्याला अशा पद्धतीने गुंडाळून पाठवेल की प्रत्येक वेळा संदेश इकडून तिकडे पाठवला जाईल तेव्हा या संदेशांची मिळून एक साखळी व्हायला हवी. कशी? तर समजा, प्रत्येक सैन्याने अगोदरच ठरवले आहे की गणिताचे कोडे आपण एकाच वेळी सोडवत जाऊ. हे कोडे कसे असेल? तर या गणिताच्या कोड्यामध्ये आपण सेनापतीचा संदेशसुद्धा एक इनपुट म्हणून ठेवू शकू. दुसरे म्हणजे हे कोडे सोडवायला कठीण असले पाहिजे. उदाहरणार्थ सुडोकू किंवा शब्दकोड्यासारखे. शब्दकोडे नीट सोडवायला कधी कधी तासभर किंवा त्याहूनही अधिक वेळ लागू शकतो. पण एकदा का कोणी ते सोडवले, की ते बरोबर सोडवले आहे की नाही हे कळायला फारसा वेळ लागत नाही. तुमच्यासमोर जर 'आक्रमण करा' या संदेशाला मिसळून बनवलेले एक शब्दकोडे कोणी सोडवून ठेवले, तर तुम्हाला हे नक्की कळेल की कोणी तरी यामध्ये वेळ आणि ऊर्जा लावली आहे.

आता त्या चार सेनापतींकडे येऊ. यातील कोणी एक अगोदरच फितूर झाला आहे. तो कोण हे आपल्याला माहीत नाहीये. आता ते बहुमताचे (पलायन वा आक्रमणाचे) कोडे सोडवायला घेऊ. पहिला सेनापती 'आक्रमण करा' या संदेशाला शब्दकोड्यात मिसळून, स्वतःच सोडवून ते इतर तीन सेनापतींकडे पाठवतो. यास आपण 'आक्रमण करा + कोडे १ चे उत्तर' असे म्हणू या. इतर तीन सेनापतींकडे हा संदेश पोहोचतो, ज्यामध्ये 'आक्रमण करा + कोडे १ चे उत्तर' असते. आता इतर तीन सेनापती एकच काम करतात. ते आलेल्या कोड्याच्या उत्तराला ('आक्रमण करा + कोडे १चे उत्तर') एका नवीन मोठ्या कोड्यात सामावून घेत आणखी मोठे कोडे बनवतात आणि स्वतः सोडवतात. संदेश पोटात सामावून घेतलेले हे सोडवलेले कोडे ('आक्रमण करा + कोडे १चे उत्तर + कोडे २ चे उत्तर') सेनापती आपल्या दूताकरवी पुढे इतर तिघांकडे पाठवेल. सुडोकू किंवा शब्दकोडे जसे कोणी हुशार असेल तो/ती नेहमी अगोदर सोडवेल, अशी इथे परिस्थिती नाही. प्रत्येक सेनापती तितकाच हुशार आहे आणि म्हणून चार सेनापतींना प्रत्येक वेळी कोडे सोडवायची सारखीच शक्यता आणि संधी असते.

आपण पाहिल्याप्रमाणे, हे विशिष्ट प्रकारचे कोडे आहे- जे सोडवायला वेळ लागतो, पण ते बरोबर आहे की चूक हे लगेच ओळखता येते. त्यामुळे इतर सेनापतींना मिळालेले सोडवलेले कोडे बरोबर आहे की चूक हे पटकन कळते. मग हे इतर तीन सेनापती पुन्हा 'आक्रमण करा + कोडे १ चे उत्तर + कोडे २ चे उत्तर' यास एका नवीन कोड्यात इनपुट बनवून आणखी मोठे कोडे बनवतात आणि स्वतः सोडवू लागतात. ज्याला कोणाला उत्तर सापडते तो इतरांना ते पाठवतो आणि मग इतर मंडळी आलेले उत्तर एका क्षणात पडताळून परत इतर तिघांमध्ये पाठवतात. असे करत करत आपल्याकडे एक साखळी तयार होते, जी अशी दिसते - 'आक्रमण करा + कोडे १चे उत्तर + कोडे २चे उत्तर + कोडे ३चे उत्तर +...'!

समजा, आता तो फितूर झालेला सेनापती खोडी करायची ठरवतो. मध्येच तो 'पलायन करा' असे बोलतो आणि या संदेशाला कोड्यात टाकून, ते सोडवून पुढे पाठवतो. मात्र असे केल्याने काहीही फरक पडणार नाही. कारण 'पलायन करा' या खोट्या माहितीची साखळीच बनणार नाही. कारण बहुसंख्य सेनापती हे 'आक्रमण करा' या संदेशाला मागे-पुढे करून कोडे सोडवीत आहेत. फितूर झालेल्या सेनापतीने सर्वांच्या आधी कोडे सोडवून ते पुढे पाठवून नवीन साखळी बनवू पाहण्याचा प्रयत्न केला तरी, खोट्या माहितीवर आधारित साखळी बनवण्यासाठी त्या सेनापतीला प्रत्येक वेळी ते कोडे सर्वांच्या आधी सोडवावे लागेल आणि मोठे करत करत नवनवीन उत्तरांची साखळी बनवावी लागेल. पण हे प्रत्येक वेळी शक्य आहे का? त्याच्याविरुद्ध तीन सेनापती हे 'आक्रमण करा' या संदेशाला धरून साखळी बनवणार असतील, तर काही काळ लोटल्यानंतर जी जास्त लांब साखळी असेल ती हमखास 'आक्रमण करा' या संदेशाचीच असेल.

म्हणजे फितूर झालेला सेनापती हा बहुमत खराब करू शकत नाही. तसेच तो राजासुद्धा स्वतः अशी साखळी बनवू शकत नाही, कारण हे कोडे सोडवण्याची शक्यता प्रत्येकाला सारखीच असल्यामुळे त्याने काही जरी केले तरी काही काळ लोटल्यानंतर सर्वात जास्त लांब साखळी ही 'आक्रमण करा' या संदेशाचीच असेल. म्हणून काही काळ जाऊ देणे गरजेचे असते. या लांब साखळीकडे पाहून कोणीही म्हणू शकते की, बहुमत हे 'आक्रमण करा' यावर आहे. कारण प्रत्येकाला कोडे सोडवण्याची समान संधी असल्यामुळे काही काळ लोटल्यानंतर बहुमताचेच खरे ठरेल. याला 'ब्लॉकचेन'च्या परिभाषेत 'प्रूफ ऑफ वर्क' असे म्हणतात. ही संकल्पना बिटकॉइनचा पाया आहे. सातोशी नाकामोटोने इथे बहुमत नक्की कोणाचे खरे आहे हे ओळखण्यासाठी ही युक्ती केली होती. 'बहुमत मिळवायची कार्यप्रणाली' (कन्सेन्सस अल्गोरिदम) या संकल्पनेत हे मोडते.

आपल्या कोड्यातला राजा, चार सेनापती, त्यातील एकाचे फितूर होणे या सगळ्यांचा तंत्रज्ञानाशी संबंध कसा, ते आपण पुढे पाहूच...

**लेखक ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या उपयोजन क्षेत्रात कार्यरत आहेत. ईमेल :** gaurav@emertech.io

---

**मनोवेध**

## आघातानंतरचा तणाव



**भीतिदायक घटनेचा** परिणाम सहा महिने उलटूनही शरीर-मनावर राहणे, या आजाराला 'आघातोत्तर तणाव' (पोस्ट-ट्रॉमाटिक स्ट्रेस डिसॉर्डर) म्हणतात. व्हिएतनाम युद्धात सहभागी झालेल्या अनेक सैनिकांना हा त्रास होऊ लागल्यानंतर (वाचा : 'इन्व्हिजिबल', लेखक- विल्यम ब्लेलॉक) त्याचा अभ्यास होऊन १९८० मध्ये मानसिक विकार म्हणून त्याचा स्वीकार झाला.

या आजारात चार प्रकारची लक्षणे दिसतात. त्या घटनेची पुनःपुन्हा आठवण होणे, ती घटना पुन्हा घडते आहे असे वाटणे, तशी स्वप्ने पडणे आणि त्या घटनेशी निगडित कोणतीही वस्तू किंवा व्यक्ती दिसली तरी खूप भीती वाटणे ही पहिल्या प्रकारची लक्षणे असतात. त्यामुळे त्या घटनेविषयी बोलणे, तेथे पुन्हा जाणे टाळले जाते. तिसऱ्या प्रकारची लक्षणे औदासीन्य स्वरूपाची असतात. कशातच मन लागत नाही, पूर्वी आवडणाऱ्या गोष्टी किंवा कृती नकोशा वाटतात. सतत निराशेचे, एकटेपणाचे विचार मनात असतात. चौथ्या प्रकारची लक्षणे वर्तनात दिसतात. झोप येत नाही, व्यसनाधीनता वाढते, एकटे राहणे शक्य होत नाही, ती व्यक्ती छोट्याशा कारणानेही दचकते, अचानक चिडते, रडते. आत्महत्येचा प्रयत्न करते. अशा व्यक्तींना अचानक भीतीचा झटका येतो. त्या वेळी छातीत वेदना, धडधड, घाम फुटणे, उलटी, शौचास होणे अशी शारीरिक लक्षणेही दिसतात.

महापूर, भूकंप, चक्रीवादळ होऊन गेलेल्या भागात अनेकांना असा त्रास होतो. प्रिय व्यक्तीचा मृत्यू, लैंगिक छळ, अपघात, मारहाण, आर्थिक नुकसान अशा वैयक्तिक आघातांनंतरही असा त्रास होऊ शकतो. प्रत्यक्ष स्वतःवर असा आघात झालेला नसतानाही, तशा प्रकारची दृक्मुद्रणे किंवा बातम्या पुनःपुन्हा पाहिल्यामुळेही असा त्रास होऊ लागतो. आघाताची भयानक स्मृती शरीर-मनात कोरली जाते. तिला सतत प्रतिक्रिया देत राहिल्याने भावनिक मेंदू- अमिग्डला अति संवेदनशील होतो. त्यामुळे ही व्याधी होते. ती खूपच त्रासदायक असेल तर औषधे घ्यावी लागतात, पण त्याबरोबर अमिग्डलाची अति संवेदनशीलताही कमी करणे महत्त्वाचे असते. या स्मृतींना न घाबरता सामोरे जाणे हा या आजाराच्या मानसोपचारांतील महत्त्वाचा भाग. समुपदेशनातून रुग्णाला आधार देत, त्याला साक्षीध्यानाचा सराव करण्यास प्रवृत्त केल्याने हा त्रास कमी होऊ शकतो. त्रास लपवून न ठेवता मानसोपचार घ्यायला हवेत.

– **डॉ. यश वेलणकर**

yashwel@gmail.com

---

**तत्त्वबोध**

## अभिनव यज्ञ!

**अध्यात्माचा जो** अभ्यास आहे तो 'स्व-स्थ' होण्यासाठी आहे. अर्थात, आपलं जे मूळ स्वरूप आहे त्यात स्थित होणं, हे साधनेचं ध्येय आहे. आपलं मूळ स्वरूप काय आहे? तर निर्लिप्त, निर्भेळ, निरावलंबी आनंद! मूळ स्वरूप तसं असूनही 'मी' आणि 'माझे'च्या आवरणालाच सर्वस्व मानून जगण्याची सवय अनंत जन्मांपासून रुजल्यानं माझं जगणं सुख-दुःखमिश्रित झालं आहे. सुखासाठी परावलंबी झालं आहे. सुखप्राप्तीसाठी कोणत्याही थराला जाण्याची प्रवृत्ती असल्यानं अनेकदा इतरांच्या दुःखालाही कारणीभूत ठरत आहे. अर्थात, सुख मिळवताना इतरांना त्रास झाला तरी मला त्याचं दुःख होत नाही. या वृत्तीमध्ये आत्माभ्यासानं बदल होत जातो, खरी स्वस्थता येते. मग हा आत्माभ्यास किंवा हे अध्यात्म एक प्रकारे समाजाचंच हित साधत नाही का? पण तरीही काही संत-सत्पुरुषांनीही लोकसेवेच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे प्रयत्न केले. साधनेला अशा सेवाकर्मांची जोड दिली. त्यापैकी एक ठळक नाव म्हणजे तुकडोजी महाराज! आजच्या अनारोग्याच्या वैश्विक संकटामुळे जो-तो 'स्थानबद्ध' झाला आहे. हे संकट दूर होईल तेव्हा समाजजीवनात फार मोठे आर्थिक बदल घडतील, असं मत मांडलं जात आहे. अशा वेळी एकमेकांच्या पाठीशी उभं राहण्याचा तुकडोजी महाराजांनी मांडलेला विचार अनुसरावा लागणार आहे. १९५६ च्या सुमारास तुकडोजी महाराजांनी एक अभिनव यज्ञ सुरू केला, तो म्हणजे- 'समयदान यज्ञ'! या यज्ञाची कल्पना मांडताना ते म्हणाले की, *''सोन्या-चांदीहून आज वेळ मोलाचा आहे. त्यामुळे आज मी दान मागायला आलो आहे ते तुमच्या एका तासाच्या वेळेचे!''* या भाषणात तुकडोजी महाराजांनी समर्थ रामदासांच्या ओव्यांचा दाखला दिला. समर्थही म्हणत की, **''जे आपणासी ठावे। ते ते हळूहळू शिकवावे। शहाणे करूनी सोडावे। सकळ जन।।''** तेव्हा इतरांना स्वतःच्या पायावर समर्थपणे उभं राहता यावं, यासाठी आपल्या थोड्या वेळेचा आणि क्षमतांचा विनियोग केला पाहिजे. हा एक तास द्यायचा म्हणजे काय करायचं? तुकडोजी महाराज म्हणाले की, *''दिवसाच्या चोवीस तासांपैकी एक तास आपल्या बांधवांसाठी द्या. जे आपल्यापाशी आहे ते दुसऱ्याला शिकवा. कोणी व्यायाम शिकवावा, कोणी उद्योग शिकवावा, कोणी कला शिकवावी, कोणी आरोग्याची काळजी शिकवावी, कुणाला गाणं शिकवावं, कुणाला अक्षरओळख शिकवावी!''* हा 'यज्ञ' सफल झाला तर प्रत्येक माणूस वर्षाचे किमान तीनशे तास देशासाठी देईल. यामुळे समाजातील अज्ञान, बेरोजगारी कमी व्हायला मदत होईल. समाज अधिक समर्थ होईल, हा तुकडोजी महाराजांचा हेतू होता. खरंच या 'यज्ञा'साठी कुठली संस्था काढायला नको, कुठले मंत्र पाठ करायला नकोत, हवनसामग्री जमा करायला नको. फक्त आपला दिवसभरातला थोडा वेळ द्यायचा आहे. त्यासाठी कुठे जायला नको की शोधाशोध करायला नको. नुसतं आपल्या अवतीभोवती डोळे उघडून पाहिलं ना, तरी सहज लोकांच्या गरजा दिसतील. आपल्याकडची कला, ज्ञान, गुण कुणाला द्यावा, ते दिसेल. अगदी आपल्या नात्यागोत्यांतही अशा व्यक्ती दिसतील. आजचं वैश्विक संकट ओसरल्यावर तर समाजाची घडी पुन्हा बसवताना अशा 'समयदान यज्ञां'ची गावा-गावांत नितांत गरज भासणार आहे. त्या यज्ञानं आपलं अंतःकरणही तृप्त होणार आहे आणि समाजपुरुषही 'तथास्तु' असा आशीर्वाद देणार आहे.


– **चैतन्य प्रेम**

---

**कुतूहल**

## राष्ट्रीय जल पुरस्कार

**पृथ्वीवर पाण्याचे** प्रमाण ७१ टक्के असूनही त्यातील केवळ तीन टक्के पाणी पिण्यायोग्य आहे. निरोगी आरोग्यासाठी हे उपलब्ध पाणी शुद्ध असणे आवश्यक आहे. पाणी हे जीवनाच्या महत्त्वपूर्ण घटकांपैकी एक असल्यामुळे पाण्याचा वापर गरजेइतकाच करून पाणी वाचवणे आणि त्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. परंतु लोकसंख्यावाढीबरोबरच वाढती अन्नगरज, फोफावणारे शहरीकरण व औद्योगिकीकरणाच्या वेगाने उपलब्ध जलसंपत्तीवर प्रचंड ताण आला आहे.




दर वर्षी पाणीटंचाई जाणवत असतेच, परंतु पाणीटंचाईच्या कालावधीतही वाढ होत चालली आहे. याचा संबंध जागतिक तापमानवाढ आणि बदलते हवामान यांच्याशी जोडला जातो. कारण या बदलांमुळे मोसमी पावसाचे नियमित चक्र काहीसे विस्कळीत झाले आहे. त्यामुळे जलसाठे पुरेसे भरत नाहीत. हा हवामान बदल प्रामुख्याने वातावरणात कार्बन डायऑक्साइडच्या वाढत्या प्रमाणामुळे होतो आहे. सध्या ज्या गतीने आपण कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित करीत आहोत, त्या गतीने येत्या काही वर्षांत कित्येक अब्ज टन कार्बन डायऑक्साइड वातावरणात टाकलेला असेल. हे प्रमाण लक्षात घेतले, तर भविष्यात जागतिक तापमानवाढीचे आणि पर्जन्यमान घटण्याचे महाभयानक संकट साऱ्या जगावर कोसळणार आहे. तसा इशारा 'नेचर' या प्रसिद्ध विज्ञानविषयक नियतकालिकात देण्यात आला आहे. म्हणूनच शाश्वत विकासासाठी पाण्याची योग्य पद्धतीने साठवणूक, जपणूक आणि व्यवस्थापन आवश्यक आहे. हे करण्यासाठी केवळ राज्यकारभार चालवणारे सरकार आणि त्यांच्या योजना यांवरच अवलंबून राहणे अपेक्षित नाही. यामध्ये सामूहिक सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, पाण्याच्या संवर्धनात आणि संरक्षणात जनजागृती होऊन या राष्ट्रीय कार्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून गैरसरकारी संस्था (स्वयंसेवी संस्था), ग्रामपंचायती, शहरी स्थानिक संस्था, जल वापरकर्ता संघटना, कॉर्पोरेट क्षेत्र, व्यक्ती, आदींसाठी केंद्र सरकारच्या जलसंपदा व नदी विकास मंत्रालयातर्फे 'भूजल वाढ पुरस्कार' आणि 'राष्ट्रीय जल पुरस्कार' २००७ पासून सुरू करण्यात आले. 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' आणि कृत्रिम 'रिचार्ज'द्वारे भूजल वाढीच्या नवीन पद्धतींचा अवलंब करणे, पाण्याच्या वापराची कार्यक्षमता वाढवणे, पाण्यावर पुनर्प्रक्रिया व पुनर्वापर करणे आणि पाण्याची कमतरता असणाऱ्या भागात लोकांच्या सहभागाद्वारे जनजागृती करणे या दृष्टीने विधायक कार्य करणाऱ्यांना या पुरस्कारांनी सन्मानित केले जाते.

– **मनीष चंद्रशेखर वाघ**

**मराठी विज्ञान परिषद,**
**वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई २२**
office@mavipamumbai.org

लोकसत्ता [पुणे]
१० गुरुवार, ३० एप्रिल २०२० WWW.LOKSATTA.COM

अमृत कलश
1, 2 BHK बजेट फ्लॅट्स
कॅनाल रोड, शिक्रापूर

अमृतकलशचा 'अमृतकलश' प्रोजेक्ट म्हणजे राहण्यासाठी बजेट होम किंवा सेकंड होम आणि विकेंड होमसाठी उत्तम गुंतवणूकीची सोनेरी संधी. १००% टक्के पर्यंत कर्ज उपलब्ध, बुकींग फक्त रु. ११,०००/-, पझेशन पर्यंत इएमआय नाही.
तर मग आजच ऑनलाईन बुकिंग करा. दिवाळीत पझेशनला सुरुवात होणार.
१ बीएचके रु. १० लाखांपासून, २ बीएचके रु. १५ लाखांपासून
(प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत रु. २,६७,०००/- सबसिडी उपलब्ध.)
घरातच राहून करा, नव्या घराची खरेदी!

साईट : अमृत कलश, गट नं. १२५९, कॅनाल रोड, शिक्रापूर, पुणे - ४१२२०८ Email : amrutkalashproperties@gmail.com | संपर्क: 9822175006
प्रोजेक्ट महारेरा रजिस्टर व पीएमआरडीए सॅक्शन

# नदीपात्राची स्वच्छता मार्गी

## राडारोडा काढण्याचे काम करण्यास महामेट्रोला परवानगी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे नदीपात्रात पडलेला राडारोडा काढण्यासाठीचे काम करण्यास महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला मान्यता देण्यात आली आहे. येत्या पंधरा जूनपर्यंत नदीपात्रातील कामाचा राडारोडा हटविण्याच्या दृष्टीने महामेट्रोकडून नियोजन करण्यात आले आहे. डेक्कन जिमखाना परिसर, हॅरीस ब्रिज, बंडगार्डन येथील नदीपात्रातील काम सुरू होणार असून मेट्रोच्या कास्टिंग यार्डमध्येही काही कामे करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

करोना विषाणूचा संसर्ग सुरू असल्यामुळे शहरात सरसकट बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे मेट्रोची कामेही ठप्प झाली होती. जलसंपदा विभागाने महामेट्रोला नदीपात्रातील राडारोडा काढण्यासंदर्भात पत्र दिले होते. या पत्रानुसार महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांकडे परवानगी मागितली होती. करोना संसर्ग वाढत असल्यामुळे कठोर निर्बंध लादण्यात आल्यामुळे ही परवानगी देण्यता आली नव्हती. सध्या राज्य सरकारने निश्चित केलेली सरसकट बंदीची मुदत गुरुवारी संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर महामेट्रोलाही काम करण्यास परवानी दिली आहे.



मेट्रोसंदर्भातील कामे करण्यास मान्यता मिळाल्यानंतर कर्वे रस्ता आणि पौड रस्ता परिसरातील मेट्रो खांबांच्या पायाची काही किरकोळ स्वरूपाची राहिलेली कामे करण्यास सुरुवात झाली आहे.

हॅरीस ब्रिज, बंडगार्डन, डेक्कन परिसरातील नदीपात्रातील राडारोडा उचलण्याची आणि किरकोळ कामे करण्यात येणार आहेत. त्याबाबतची परवानगी मिळाली आहे. कास्टिंग यार्डातही सामाजिक अंतराचा निकष पाळून काही कामे सुरू होतील. तर वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेतील खांबांच्या फौउंडेशनची कामेही करण्यात येणार आहेत. त्याबाबतचे नियोजन सुरू करण्यात आले आहे. संपूर्ण मार्गिकेची कामे करण्यास सध्या मान्यता नाही. केवळ नदीपात्रातील कामांसाठी मान्यता मिळाली आहे, अशी माहिती महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे प्रकल्प संचालक अतुल गाडगीळ यांनी दिली.

मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दोन मार्गिकांची कामे सध्या सुरू आहेत. यातील वनाज ते रामवाडी या उन्नत मेट्रो मार्गिकेचा काही भाग नदीपात्रातून जाणार आहे. डेक्कन परिसर, काँग्रेस भवन परिसर आणि मुळा-मुठा संगम या परिसरात नदीपात्रात मेट्रोकडून भराव टाकण्यात आला आहे. तसेच कामाचा राडारोडाही नदीपात्रात तसाच टाकण्यात आला आहे. तो काढून टाकावा, यासाठी मेट्रोला जलसंपदा विभागाकडून सातत्याने बजाविण्यात आले होते. मात्र त्यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात येत नव्हती.

या दरम्यान, नदीपात्रातील अनधिकृत भराव, बांधकामे, अतिक्रमणे आणि नदीपात्रातील राडारोड्याची व्यवस्थित विल्हेवाट न लावल्यामुळे नदी-नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळे निर्माण होत असून पूरवहन क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. त्यासंदर्भात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे (नॅशनल ग्रीन ट्रॅब्युनल- एनजीटी) पर्यावरण प्रेमी सारंग यादवाडकर यांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, जलसंपदा यांना नदीपात्रातील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे आदेश एनजीटीने दिले होते. त्यानुसार जलसंपदाने महामेट्रोला राडारोडा काढण्यासंदर्भातील पत्र दिले होते. राडारोडा पावसाळ्यापूर्वी न काढल्यास आणि पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी महामेट्रो जबाबदार राहील, असेही या पत्रात नमूद करण्यात आले होते.

### केवळ नदीपात्रातच कामे

नदीपात्रातील राडारोडा काढण्याच्या कामाला मान्यता मिळाली आहे. १५ जूनपर्यंत राडोराडा काढण्यात येईल. केंद्र सरकारच्या सरसकट बंदीचा कालावधी संपल्यानंतर मेट्रो मार्गिकेच्या कामांचे नियोजन करण्यात येणार आहे. तूर्तास मार्गिकेची मोठी कामे होणार नाहीत. मात्र कास्टिंग यार्डमध्ये किरकोळ स्वरूपाची कामे पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती ही मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# करोनाबाधितांसाठी आता एकात्मिक उपचार पद्धती

## आयुष मंत्रालयाची संशोधन योजना

करोनाचा कहर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोनाबाधितांवर उपचार करताना आयुषमधील उपचार पद्धतींचा वापर करून एकात्मिक उपचार पद्धत वापरण्यात येणार आहे. त्यासाठी आयुष मंत्रालयाने लघु मुदतीची संशोधन योजना जाहीर केली असून, त्या माध्यमातून आयुष पद्धतींचा वापर करून करोनाबाधितांवरील परिणाम तपासण्यात येणार आहे.

करोना संसर्ग रोखण्यासाठी आयुष मंत्रालयाने नियुक्त केलेल्या टास्क फोर्सच्या शिफारसीनुसार ही संशोधन योजना राबवण्यात येत आहे. टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी या योजनेबाबतची माहिती दिली. 'देशभरातील करोनाबाधितांवर सध्या ॲलोपॅथी औषधांचा वापर करून उपचार करण्यात येत आहेत. मात्र, आयुषमधील आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध, नॅचरोपॅथी अशा प्रचलित उपचार पद्धतींचाही वापर करण्याची गरज आहे. चीनमध्ये करोनाबाधितांवर पारंपरिक चिनी उपचार पद्धतींचाही वापर करण्यात आला होता. त्याचे संशोधन विविध संशोधन पत्रिकांमधून प्रसिद्ध झाले आहे. त्याच धर्तीवर आयुषमधील औषधे आणि उपचार पद्धतींचा वापर करून करोनाबाधितांवर काय परिणाम होतात, हे तपासण्यासाठी एकात्मिक उपचार पद्धतीची गरज आहे. त्यासाठी ही संशोधन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत करोनाबाधितांवरील उपचारांसाठीचे आंतरराष्ट्रीय निकष पाळून आयुष उपचार पद्धतीचा वापर केला जाणार आहे,' असे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले.

'संशोधन योजनेमध्ये आयुषमधील पद्धतींचा वापर करताना संबंधित रुग्णालयातील डॉक्टरांनी रुग्णाला त्याची कल्पना द्यावी. उपचार पद्धतींचा वापर करून त्याच्या नोंदी ठेवाव्यात. त्यातून करोना रोखण्यासाठी संशोधनास चालना मिळेल. तसेच एकात्मिक उपचार पद्धती विकसित होऊ शकेल, रुग्णांना उपचार पद्धतीचे पर्याय उपलब्ध होऊ शकतील. तसेच आयुष डॉक्टरांना ॲलोपॅथी रुग्णालयात काम करण्यासाठी मिळणारे प्रशिक्षण त्यांच्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे सर्वच दृष्टीने ही संशोधन योजना महत्त्वाची ठरणार आहे,' असे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले.



### अर्ज करण्यासाठी १ मे ही अंतिम मुदत

संशोधन योजनेमध्ये आयुष मंत्रालयाकडून दहा लाखांचा निधी दिला जाणार आहे. त्यासाठी या योजनेत अर्ज करण्यासाठी १ मे ही अंतिम मुदत आहे. योजनेची माहिती https://main.ayush.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.



करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर काही रेल्वे गाड्या शहरातून पाठविण्याचे नियोजन झाल्यास त्या दृष्टीने सध्या पुणे रेल्वे स्थानकावर तयारी करण्यात येत आहे. तिकीट आरक्षण केंद्र किंवा स्थानकात प्रवेश करताना प्रवाशांमध्ये सुरक्षित अंतर ठेवण्याच्या दृष्टीने स्थानकाच्या परिसरामध्ये रेल्वे सुरक्षा दलाच्या माध्यमातून लोखंडी कठडे उभे करण्यात येत आहेत.
(छायाचित्र- अरुल होरायझन)

# पुण्यात तापमानवाढीसह पावसाळी स्थिती

## जिल्ह्याच्या काही भागात पावसाची हजेरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे शहर आणि परिसरामध्ये सध्या दिवसाचे कमाल आणि रात्रीच्या किमान तापमानामध्ये वाढ झाल्याने उकाडाही वाढला आहे. त्याबरोबरीने शहरात सध्या पावसाळी स्थिती निर्माण झाली आहे. बुधवारी (२९ एप्रिल) जिल्ह्याच्या काही भागात पावसाने हजेरी लावली. मावळ परिसरात आणि प्रामुख्याने लोणावळ्यात गारपीटही झाली. पुढील दोन दिवस शहरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे विविध ठिकाणी सध्या पाऊस हजेरी लावतो आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुणे शहर आणि जिल्ह्यामध्ये पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार बुधवारी दुपारनंतर शहराच्या बहुतांश भागात आकाशाची स्थिती ढगाळ झाली होती. उपनगरांमध्ये काही ठिकाणी पावसाचा शिडकावा झाला. जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह तुरळक ठिकाणी पाऊस पडला. लोणावळा शहर आणि आसपासच्या परिसरामध्ये काही वेळ जोरदार पाऊस झाला. सोसाट्याच्या वाऱ्यासह गारपीटही झाली.

पुणे शहर आणि परिसरातील दिवसाचे कमाल तापमान तीन दिवस सरासरीच्या आसपास होते. बुधवारी त्यात काही प्रमाणात वाढ होऊन ते सरासरीच्या पुढे गेले आहे. बुधवारी शहरात ३९.८ अंश सेल्सिअस कमाल, तर २४.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. तापमानातील ही वाढ पुढील चार ते पाच दिवस कायम राहणार आहे. पुणे वेधशाळेने दिलेल्या अंदाजानुसार १ मे पर्यंत शहरात आकाश सामान्यतः ढगाळ राहून मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊसाची शक्यता आहे. त्यानंतर एक दिवस आकाशाची स्थिती ढगाळ राहील. ३ मे नंतर आकाश निरभ्र होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### रात्रीच्या उकाड्यात पुन्हा वाढ

शहरात ढगाळ वातावरणाने रात्रीच्या उकाड्यात पुन्हा वाढ झाली आहे. त्यामुळे रात्री घरात पंखे किंवा वातानुकूलित यंत्रणा पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याशिवाय पर्याय नाही. सध्या दिवसाचे तापमान चाळीस अंश सेल्सिअसच्या आसपास असून, पुढील आठवडाभर त्यात वाढ कायम राहून ते चाळीस अंशांच्या जवळपास स्थिर राहणार आहे. रात्रीचे किमान तापमान सध्या २४ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. हे तापमान सरासरीच्या तुलनेत तब्बल ३.२ अंश सेल्सिअसने अधिक आहे. परिणामी रात्री कमालीचा उकाडा आहे.

# पुणे जिल्ह्यात अत्यावश्यक ४६०, तर अन्य ५६ उद्योग सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे जिल्ह्यात अन्न, दूध, औषध निर्माण, सॅनिटायझर, वैद्यकीय साहित्य निर्मिती आणि या उद्योगांसाठी आवश्यक कच्चा माल तयार करणारे अत्यावश्यक सेवेतील ४६० उद्योग सुरू आहेत. तर, अत्यावश्यक सेवेत नसलेले इतर ५६ उद्योग सुरू झाले आहेत. जिल्ह्यातील कुरकुंभ, जेजुरी, पाटस आणि इंदापूर या ठिकाणचे उद्योग सुरू करण्यास उद्योग विभागाने परवानगी दिली आहे. त्यामध्ये लघु व मोठ्या उद्योगांचा समावेश आहे.

टाळेबंदी लागू झाल्यानंतर शहरासह जिल्ह्यातील सर्व उद्योग, व्यवसाय बंद करण्यात आले होते. मात्र, १७ एप्रिल रोजी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र सोडून इतर ठिकाणचे उद्योग, व्यवसाय सुरू करण्याला परवानगी देण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले होते. त्यानुसार अत्यावश्यक उद्योगांबरोबरच इतर औद्योगिक पट्ट्यातील उद्योग, व्यवसाय सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला होता.

पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रांसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातीलही उद्योग सुरू न करण्याबाबत खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निर्देश दिले. परिणामी परवानगी दिलेले ९८८ उद्योग, व्यवसाय सुरू होऊ शकले नाहीत. मात्र, जिल्ह्यातील करोना प्रादुर्भाव नसलेल्या कुरकुंभ, जेजुरी, पाटस आणि इंदापूर या ठिकाणचे अत्यावश्यक सेवा सोडून इतर उद्योग, व्यवसाय सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक सदाशिव सुरवसे यांनी दिली.

> “ पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र, हवेली तालुका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रातील उद्योग सुरु न करण्याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात अत्यावश्यक सेवेतील प्रकल्प सुरु झाले आहेत.
> – सदाशिव सुरवसे, उद्योग सहसंचालक, पुणे विभाग

टाळेबंदीमुळे फरफट सुरुच; वेतन आणि रजांबाबत व्यवस्थापनाशी संवाद

# कामगार, कर्मचाऱ्यांना साहाय्य करण्यासाठी कामगार आयुक्तालयाकडून पाठपुरावा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** चहुबाजूने विस्तारलेल्या पुण्यात शिक्षण, व्यवसाय, नोकरीनिमित्त येणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. सध्या टाळेबंदीमुळे या घटकांची मोठ्या प्रमाणात फरपट सुरू असून संबंधितांच्या तक्रारींचा निपटारा करण्याचे मोठे काम कामगार विभागाकडून करण्यात येत आहे. अन्नधान्य पुरवणे, भोजन, निवारा अशा विविध सेवा देत असतानाच माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि रजांबाबत व्यवस्थापनाशी संवाद साधण्यात येत आहे.

टाळेबंदी लागू झाल्यानंतर सर्वाधिक फटका बांधकाम मजूर, नाक्यावरचे असंघटित कामगार, कारखान्यातील कामगार, ऊसतोड कामगार, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बसला आहे. काही कामगारांच्या भोजनाचा प्रश्न निर्माण झाला, काहींना शिधा मिळत नव्हता, काही कामगारांचे वेतन झालेले नाही, तर काहींना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. कामगारांच्या या तक्रारींचा निपटारा करण्याचे काम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मदतीने अतिरिक्त कामगार आयुक्तालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे अधिकारी, कर्मचारी करत आहेत.

शहरासह जिल्ह्यातील बांधकामांच्या ठिकाणी अडकलेल्या मजूर, कामगारांची व्यवस्था करण्यासाठी जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय आणि कामगार आयुक्तालयात नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले असून हे दोन्ही एकमेकांना जोडलेले आहेत. कामगारांबाबतच्या तक्रारी आल्यानंतर संबंधित ठिकाणच्या क्षेत्र अधिकाऱ्याकडे माहिती दिली जाते. स्वयंसेवी संस्था आणि तहसीलदारांकडून संबंधित कामगार, मजुरांना धान्य वाटप केले जात आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रात मिळून सध्या २८५ बांधकामांच्या ठिकाणी ३९ हजार कामगार, मजूर आहेत.

अतिरिक्त कामगार आयुक्तालयाकडे माहिती तंत्रज्ञान कर्मचाऱ्यांसह बांधकाम व असंघटित मजुरांच्या आठशेपेक्षा जास्त तक्रारी आल्या आहेत. तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने मजुरांच्या मुलांसाठी दुधाची व्यवस्था, मजुरांचे वेतन, माहिती तंत्रज्ञान कंपन्यांशी संपर्क साधून कर्मचाऱ्यांची रजा, वेतनावर परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे अशी कामे सध्या आयुक्तालयाकडून सुरू आहेत, अशी माहिती कामगार उपआयुक्त विकास पनवेलकर यांनी दिली. कामगार विभागाने प्रत्येक विभागनिहाय नियंत्रण कक्ष स्थापन केले असून या कक्षांतर्फे विभागाच्या संकेतस्थळावर येणाऱ्या तक्रारींचा निपटारा केला जात आहे. त्यामध्ये अन्नधान्य, वेतन न मिळण्याच्या सर्वाधिक तक्रारी आहेत. टाळेबंदीमुळे सर्व काम ठप्प असल्याने वेतनाच्या तक्रारी या पुढील काळात वाढण्याची शक्यता विभागाने वर्तवली आहे.






> “ 'आम्हाला आमच्या मूळ गावी जायचे आहे', अशा प्रकारच्या तक्रारी देखील येतात. अशाप्रसंगी त्यांना समजावणे, समुपदेशन करण्याचे काम सुरु आहे. दररोज बांधकाम मजुरांच्या भोजन, शिध्याची व्यवस्था करणे, कामगारांच्या वेतनासाठी बांधकाम व्यावसायिक, कारखाना मालकांकडे पाठपुरावा करणे, माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी संवाद साधून कर्मचाऱ्यांचे पगार, त्यांच्या रजांवर गदा येणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.
> – विकास पनवेलकर, कामगार उपआयुक्त, पुणे विभाग

epaper.loksatta.com

## संक्षिप्त

### मजुरांना किराणा वाटप

शहर आणि आजूबाजूच्या परिसरात काम करणाऱ्या मजूर आणि त्यांच्या कुटुंबीयांना पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स फोरमतर्फे मदत म्हणून किराणा मालाचे वाटप करण्यात आले. पुणे आणि शिरूर परिसरातील शंभर कुटुंबांसाठीची ही मदत उपविभागीय अधिकारी संतोषकुमार देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्सचे मंगेश काटे, लॉइट्स दास, कॅनेस्टेड फूड्सचे मिलिंद दातार, कीर्ती दातार, रोटरी क्लब लोकमान्यनगरच्या टीना रात्रा, लायन्स क्लब आकुर्डीचे हिरामण गवई यांनी राबविलेल्या या उपक्रमासाठी लायन्स आणि रोटरी क्लबचे सहकार्य मिळाले.

### महात्मा बसवेश्वर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

महाराष्ट्र वीरशैव सभा आणि बसव सेवा प्रतिष्ठानतर्फे महात्मा बसवेश्वर यांच्या ९१५ व्या जयंतीनिमित्त बाजीराव रस्त्यावरील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. मोजक्या सदस्यांच्या उपस्थितीत सुरक्षित अंतराच्या नियमांचे पालन करून अत्यंत साधेपणाने जयंती साजरी करण्यात आली. महाराष्ट्र वीरशैव सभेचे प्रांत सरचिटणीस चंद्रशेखर होनराव, पंढरीनाथ लांडगे, स्वप्नील खडके, बसव सेवा प्रतिष्ठानचे नरसिंग मुळे आणि महानगरपालिका अधिकारी आशिष महाडकर या वेळी उपस्थित होते.

### पोलिसांना सॅनिटायझर

करोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी अत्यावश्यक सेवा म्हणून अहोरात्र रस्त्यावर काम करणाऱ्या खडक पोलीस ठाण्यातील पोलिसांना स्ट्रोक्स फाउंडेशनतर्फे सुरक्षेसाठी सॅनिटायझर आणि उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या जारची सोय करण्यात आली. फाउंडेशनचे अध्यक्ष चेतन पानसरे आणि खजिना विहिर मंडळाचे अध्यक्ष ओम कासार यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. पोलिसांकरिता सॅनिटायझर आणि पिण्याच्या पाण्याचे जार विपुल म्हैसुरकर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले.

### डॉक्टरांना संरक्षक साधनांची मदत

एस अ‍ॅण्ड जे बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेडचे रंगराव सावरे आणि अनिल जिन्दे यांनी महापालिकेच्या नायडू रुग्णालयातील डॉक्टरांसाठी शंभर संरक्षक साधने (पीपीई किट) आणि एक हजार लिटर सॅनिटायझर उपलब्ध करून दिले आहे. करोना विषाणू संसर्ग प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत महापालिकेने आर्थिक आणि वैद्यकीय उपकरणे देण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार व्यक्ती, संस्था, संघटना, बँका, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, मंडळांनी वैद्यकीय उपकरणांबरोबरच आर्थिक मदत सुरू केली आहे. महापालिकेच्या या आवाहनानुसार एस अ‍ॅण्ड जे बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेडचे रंगराव सावरे आणि अनिल जिन्दे यांनी ही मदत केली आहे. महापालिका आयुक्त शेखर गायकवाड, सहआयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख ज्ञानेश्वर मोळक या वेळी उपस्थित होते. एस अ‍ॅण्ड जे बिल्डकॉन हे महापालिकेचे मान्यताप्राप्त ठेकेदार असून मोठे पूल आणि रस्ते विकसनाची कामे त्यांनी केली आहेत.

# तात्पुरत्या निवासाला अत्यल्प प्रतिसाद

## ४३ नागरिकांकडून सेवेसाठी महापालिकेकडे नोंदणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शहराच्या दाट लोकवस्ती आणि झोपडपट्टी परिसरातील नागरिकांसाठी नजीकच्या शाळेत सुरू करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवास व्यवस्थेला अल्प प्रतिसाद मिळत आहे. महापालिका प्रशासनाकडून ही सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर केवळ ४३ जणांनी तात्पुरत्या निवाऱ्यासाठी नोंदणी केल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय, बिबवेवाडी, कसबा-विश्रामबाग वाडा, ढोले-पाटील रस्ता, येरवडा-कळस-धानोरी या क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत असलेल्या झोपडपट्टी वसाहती आणि दाट लोकसंख्येमुळे करोना संसर्गाचे रुग्ण वाढत आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत दाट लोकसंख्येच्या भागातील नागरिकांना पर्यायी तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्याची तयारी महापालिके कडून सुरू करण्यात आली आहे.



महापालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या तात्पुरत्या निवारा सुविधेला अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

करोनाचा कहर

या परिसरात सामाजिक अंतराच्या निकषांचे पालन होत नसल्यामुळे दिवसा आणि रात्री आवश्यकतेनुसार तात्पुरत्या निवासाची सुविधा देण्यासाठी महापालिकेने आठ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सत्तर शाळा ताब्यात घेतल्या आहेत. त्यापैकी नवी पेठेतील धर्मवीर संभाजी महाराज प्राथमिक विद्यालयात आणि सदाशिव पेठेतील एका शाळेत मिळून ४३ नागरिकांनी तात्पुरत्या निवाससस्थानासाठी नोंदणी के ली आहे. महापालिका शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी मनीषा राऊत यांनी त्याबाबतची माहिती दिली आहे. मध्यवर्ती भागातील करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी ही उपाययोजना के ली जात असली, तरी त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे.

# अवैध धंदे करणाऱ्यांकडून पाण्याच्या बाटल्यांमधून गावठी दारूची विक्री

## पोलिसांच्या छाप्यात दुसरी घटना उघड

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे:** टाळेबंदीत मद्य, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास मनाई करण्यात आल्यानंतर बेकायदा गावठी दारू विक्रेत्यांकडून पाण्याच्या बाटल्यांमधून दारूची विक्री करण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गुन्हे शाखेतील सामाजिक सुरक्षा विभागाने कात्रज भागात केलेल्या कारवाईत एका महिलेच्या घरातून गावठी दारू भरलेल्या पाण्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

कात्रज भागातील आंबेगाव खुर्द परिसरात एक महिला घरातून गावठी दारूची विक्री करत असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागातील उपनिरीक्षक श्रीधर खडके यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घरावर छापा टाकला. महिलेच्या घराची पाहणी करण्यात आली तेव्हा पाण्याच्या बाटल्या आढळून आल्या. पाहणीत वीस लिटर पाण्याच्या बाटलीत गावठी दारू भरल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी महिलेच्या घरातून १०० लिटर गावठी दारू, दारू भरलेल्या पिशव्या, रोकड असा मुद्देमाल जप्त केला. सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वैशाली चांदगुडे, हवालदार राजेंद्र कुमावत, मोहिते, अण्णा माने, इरफान पठाण, अश्विनी केकाण, मनीषा पुकाळे, नीलम शिंदे, संतोष भांडवलकर आदींनी ही कारवाई केली.

दोन दिवसांपूर्वी हडपसर भागात पाण्याच्या बाटल्यांमधून गावठी दारूची विक्री करणाऱ्या दोघांना पकडण्यात आले होते. टाळेबंदीत अवैध धंदे करणाऱ्यांवर पोलिसांनी करडी नजर ठेवली आहे.

# संगम घाटावर युवकाचा खून

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** संगम घाट परिसरात झोपलेल्या युवकाचा खून करण्यात आल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. खुनामागचे कारण समजू शकले नाही.

मंगेश विष्णू कांबळे (वय २५, रा. जुना बाजार वसाहत, मंगळवार पेठ) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांबळे काही काम करत नाही. तो घरीही फारसा जायचा नाही. संगम घाटावर दररोज रात्री तो झोपायचा. मंगळवारी रात्री तो घाटावर झोपायला गेला होता. बुधवारी सकाळी कांबळे घाटावर बेशुद्धावस्थेत पडल्याची माहिती नागरिकांनी बंडगार्डन पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. तेव्हा कांबळेच्या डोक्यावर दुखापत झाल्याचे उघड झाले. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. कांबळेच्या खुनामागचे कारण समजू शकले नाही. त्याच्या कोणाशी वाद होता का? या दृष्टीने तपास सुरू आहे. बंडगार्डन पोलिसांकडून हल्लेखारांचा माग काढण्यात येत आहे. दरम्यान, टाळेबंदीत आठवड्यापूर्वी पुणे स्टेशन भागात येरवडा कारागृहातून जामिनावर सुटलेल्या चोरट्याचा खून करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली होती. त्यानंतर शहरात खुनाची दुसरी घटना घडली आहे.

# शिवणे भागात मोटारीतून सिगारेटची वाहतूक; चौघे अटकेत

## तीन मोटारीसह साडेचौदा लाखांचा मुद्देमाल जप्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवणे भागात मोटारीतून तंबाखूजन्य पदार्थ तसेच सिगारेटची वाहतूक करणाऱ्या चौघांना गुन्हे शाखेने पकडले. या कारवाईत पोलिसांनी तीन मोटारी, सिगारेट असा १४ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

रोहित सीताराम प्रजापती (वय २३), विजय सीताराम प्रजापती (वय २९), पंकज शिवनारायण प्रजापती (वय २२, तिघे रा. महालक्ष्मी कॉम्प्लेक्स, शिवणे, शिंदे पुलाजवळ) आणि मुकेश पारसमल छाजेड (वय ४०, रा. वीर लहूजी सोसायटी, सहकारनगर क्रमांक १) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. प्रजापती शिवणे, उत्तमनगर, वारजे भागातील काही दुकानदारांना टाळेबंदीत सिगारेट,तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट एकमधील पोलीस नाईक सचिन जाधव यांना मिळाली. प्रजापती तीन वेगवेगळ्या मोटारीतून तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट घेऊन निघाले होते. पोलिसांनी महालक्ष्मी कॉम्प्लेक्सच्या परिसरात सापळा लावून प्रजापती यांना पकडले. प्रजापती यांच्याकडे चौकशी करण्यात आली. तेव्हा सहकारनगर भागातील मुकेश छाजेड याने सिगारेटची खोकी विक्रीसाठी दिल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर पोलिसांनी छाजेडला ताब्यात घेतले.

अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक आयुक्त डॉ.शिवाजी पवार, विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण वाईकर, उत्तम बुदगुडे, सचिन जाधव, तुषार माळवदकर, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन यांनी ही कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी तीन मोटारींसह सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ असा १४ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# शिकार प्रकरणी बारामतीत दोघे अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** टाळेबंदी लागू झाल्यानंतर बारामतीतील उंडवडी भागात सशाची शिकार केल्याची घटना उघडकीस आली आहे. वन विभागाने कारवाई करून दोन युवकांना अटक केली.

किरण कुचेकर, दीपक कुचेकर (दोघे रा.उंडवडी, बारामती) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दोघांविरोधात वन्य प्राणी संरक्षण कायदा १९७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. उंडवडी भागातील शेतात कुचेकर यांनी सशाची शिकार केल्याची माहिती ग्रामस्थांनी वनविभागाला दिली. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने दोघांना ताब्यात घेऊन त्यांना अटक केली. कुचेकर यांना वनविभागाच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यापूर्वी त्यांनी अशा प्रकारे वन्यजीवांची शिकार केली का? तसेच वन्यप्राण्यांची अन्य कोणाला विक्री केली का? या दृष्टीने तपास केला जाणार आहे. बारामती वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल पी. जी.जराड, वनरक्षक मीनाक्षी गुरव, ए. बी.पाचपुते यांनी ही कारवाई केली.

# अटी-शर्ती निश्चित करून केशकर्तनालये उघडण्याची परवानगी द्या

## ग्राहकांची गैरसोय; दुकान चालकांचे लाखोंचे नुकसान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** करोना विषाणूंचा संसर्ग टाळण्यासाठी लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे उद्योगनगरीतील केशकर्तनालय चालकांचे गेल्या सव्वा महिन्यात कंबरडे मोडले आहे. प्रत्येकाला लाखोंचे नुकसान सहन करावे लागते आहे. या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांचे हाल सुरू असून नियमित ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात लहान-मोठी मिळून हजारोंच्या संख्येने केशनकर्तनालय आहेत. तेथे मोठ्या संख्येने कामगार असून बहुतांश परराज्यातील आहेत. या सर्वांचे हातावर पोट आहे. दिवसभर जितके काम होईल, त्याप्रमाणात त्यांना पैसे मिळतात. गेल्या सव्वा महिन्यापासून टाळेबंदीमुळे सगळीच केशनकर्तनालये बंद आहेत. त्यामुळे ग्राहक येत नाहीत. परिणामी,



कामगारांना कोणतेही काम मिळणे बंद झाले आहे. आता त्यांच्याकडील साठवलेले पैसेही संपत आल्याने ते हवालदिल आहेत. टाळेबंदी असल्याने मूळ गावी जाता येत नाही, इथेही बाहेर पडता येत नाही. जेवणाचेही हाल होत आहेत.

चालक वर्गाला जागेचे भाडे, वीजबिल, पगार, साहित्य खर्च असे

> नागरिकांच्या दृष्टीने ही आवश्यक सेवा आहे, त्यावर अनेकांचे अर्थाजन अवलंबून आहे. बराच काळ दुकाने बंद राहिल्याने अनेकांचे नुकसान होत असून ग्राहकांची गैरसोय होत आहे. यासंदर्भात, आवश्यक ती नियमावली जरूर करावी, अटी-शर्ती लावाव्यात. मात्र, दुकाने उघडण्याची परवानगी द्यावी. आमच्या संघटनेने या मागण्यांबाबतचे निवेदन सरकारला दिले आहे.
>
> – विशाल आहिरे, व्यावसायिक

अनेक खर्च आहेत. दुकान बंद राहिल्याने उत्पन्नाचे मार्ग बंद आहेत. याव्यतिरिक्त, दाढी तसेच केस कापण्यासाठी नियमितपणे येणाऱ्यांची दुकाने बंद असल्याने मोठी गैरसोय होत आहे.

# मोशी सोसायटी फेडरेशनचा पालिका आयुक्तांशी संवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवड शहरात करोना विषाणूचा प्रादुर्भाव होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, चिखली-मोशी-चऱ्होली हाऊसिंग फेडरेशनच्या वतीने महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या वेबसंवादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार महेश लांडगे, पोलीस उपायुक्त स्मिता पाटील आदी यावेळी उपस्थित होते. नागरिकांनी टाळेबंदीचे पूर्णपणे पालन करावे, प्रशासनाच्या सूचना अमलात आणाव्यात, असे आवाहन आयुक्त हर्डीकर यांनी केले. नागरिक भयभीत झाले असल्याने लक्षणे असूनही तपासणीसाठी येत नाहीत, अशी खंत आमदार लांडगे यांनी व्यक्त केली. संचारबंदीचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपायुक्त पाटील यांनी या वेळी दिला.

# शिवाजीनगर एसटी आगारात बसमधील बॅटऱ्यांची चोरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवाजीनगर एसटी आगारात लावण्यात आलेल्या बसमधील दोन बॅटऱ्या चोरट्यांनी लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला.

आगार व्यवस्थापक अनिल भिसे (वय ५४, रा. सोलेस पार्क, मुंढवा) यांनी या संदर्भात खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. शिवाजीनगर भागात मेट्रोचे काम सुरू असल्याने महिनाभरापूर्वी एसटी स्थानक तसेच आगाराचे स्थलांतर पुणे-मुंबई रस्त्यावरील वाकडेवाडी भागात करण्यात आले. वाकडेवाडी आगारात शिरलेल्या चोरट्यांनी बसमधील दोन बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

चोरलेल्या बॅटरीची किंमत १० हजार रुपये असल्याचे आगार व्यवस्थापक भिसे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार सोपान ठोकळ तपास करत आहेत.

# करोनाशी लढताना नृत्य कलाकारांची साद

## जागतिक नृत्यदिनानिमित्त ‘नाद-रूप’ची विशेष डिजिटल प्रस्तुती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाच्या संकटावर मात करताना सकारात्मकतेचा संदेश देण्यासाठी ज्येष्ठ कथक नृत्यगुरू शमा भाटे आणि त्यांच्या शिष्यांनी जागतिक नृत्यदिनाचे औचित्य साधत एक विशेष प्रस्तुती डिजिटल माध्यमातून सादर केली आहे. ‘नाद-रूप’ संस्थेच्या या विशेष सादरीकरणात करोनाशी लढताना, टाळेबंदी पाळण्यासाठी घ्यावयाची काळजी अत्यंत कलात्मक, आकर्षक आणि रंजक पद्धतीने मांडत ‘शुभं भवतु’चा प्रतिध्वनी नृत्य कलाकारांच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

जगाला विळखा घालून बसलेल्या या ‘करोना’तून सुटण्यासाठी संचारबंदीचे नियम काटेकोररीत्या पाळणे आवश्यक आहे. ही शिक्षा नसून संधी आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न करत असल्याचे शमा भाटे यांनी सांगितले. सक्तीने घरी बसण्याच्या या काळात अनेक सकारात्मक, सर्जनशील गोष्टी करता येऊ शकतात. आपण एकत्रितरीत्या लढा देत ही लढाई नक्कीच जिंकू असाच संदेश आम्ही या कलाकृतीतून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकच जण आपापल्या परीने या लढाईत आपले योगदान देत आहे. आम्ही सुरक्षित अंतर, हात धुणे, मास्क वापरणे हे संदेश कलात्मकतेने दिले आहेत. दिल्लीच्या डॉ. अर्शिया सेठी यांच्या इंग्रजी कवितेच्या आधारे ही कलाकृती रंगते. यात माझ्या आठ शिष्यांनी सादरीकरण केले आहे. सादरीकरण प्रत्येकीने आपल्या घरी रेकॉर्ड केले. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संकलन करून ही संपूर्ण कलाकृती सादर करण्यात आली आहे. टाळ्यांचे ताल, पढंत यावर हे सादरीकरण होत आहे. त्यामुळे कमीत कमी संगीतावर आधारित नृत्यकलाकृती हे एक वैशिष्ट्य आहे, असेही त्यांनी सांगितले. या कलाविष्कारात अमीरा, अवनी, शिल्पा, रागिणी, शिवानी, भार्गवी, नीरजा, ईशा यांनी नृत्य सादरीकरण केले असून अमीरा पाटणकर यांचे सहकार्य लाभले आहे. कविता अभिवाचन शिल्पा भिडे आणि निखील रवी परमार यांनी केले आहे. चैतन्य आडकर यांचे संगीत असून ध्वनिमुद्रण ईशान देवस्थळी यांचे तर संकलन अपूर्व साठे यांनी केले आहे. हे सादरीकरण यू-ट्यूब वाहिनीसाठी https://youtu.be/Pz5u4jWG8sk या लिंकवर भेट द्यावी, असे भाटे यांनी सांगितले.

# आमदार गाडगीळ यांच्याकडून महापालिकेला सात लाखांची वैद्यकीय उपकरणे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** काँग्रेसचे विधानपरिषदेचे आमदार अनंत गाडगीळ यांनी महापालिका कर्मचाऱ्यांसाठी सात लाख रुपयांची वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिली आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीनंतर ही वैद्यकीय उपकरणे परदेशातून तातडीने मागविण्यात आली असून घरोघरी जाऊन तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी त्याचा वापर करण्यात येणार आहे.

करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महापालिके कडून घरोघरी जाऊन सर्वेक्षण के ले जात आहे. महापालिके चे कर्मचारी हे जोखमीचे काम करत आहेत. अतिसंसर्ग असलेल्या भागात कर्मचारी जात असल्यामुळे त्यांना इनफ्रारेड थर्मामीटरची आवश्यकता होती. काँग्रेसचे महापालिके तील गटनेता अरविंद शिंदे यांनी ही अडचणी आमदार अनंत गाडगीळ यांच्या कानावर घातली होती. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत जिल्हाधिकारी तसेच जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन अनंत गाडगीळ यांनी परदेशातून त्वरित थर्मामीटर उपलब्ध करून घेतले. हे थर्मामीटर कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती अनंत गाडगीळ यांनी दिली.

दरम्यान, आरोग्य सेवेच्या सक्षमीकरणासाठी आमदार निधीतून आतापर्यंत सव्वा ते दीड कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य करण्यात आले असून शहरातील ससूनसह अन्य रुग्णालयांसाठी अद्ययावत वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिल्याचेही आमदार गाडगीळ यांनी सांगितले.

भोसरीतील उद्योजकाचा उपक्रम

# पोलिसांच्या वाहनांचे विनामूल्य निर्जंतुकीकरण



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** पोलिसांच्या वाहनांचे विनामूल्य निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता करून देण्याचा उपक्रम भोसरीतील एका लघुउद्योजकाने राबवला आहे.

अरुणकुमार कापसे असे या उद्योजकाचे नाव आहे. भोसरीतील सद्गुरुनगर येथील सत्यम कार वॉशिंग सेंटर त्यांच्या मालकीचे आहे. २४ एप्रिलपासून त्यांनी ते विनामूल्य खुले केले आहे.

पोलिसांना वेळेअभावी त्यांच्या वाहनांकडे लक्ष देता येत नाही. सध्याच्या संकटकाळात त्यांना करोनाचा संसर्ग होऊ नये, याची खबरदारी म्हणून पोलीस व पत्रकारांच्या सर्व प्रकारच्या वाहनांचे निर्जंतुकीकरण करून देण्याचा उपक्रम सुरू केल्याचे कापसे यांनी सांगितले.

याबाबतची माहिती त्यांनी समाजमाध्यमातून सर्वांना दिली होती. त्यानंतर, अनेकांनी या सेवेचा लाभ घेण्यास सुरुवात केली. या संदर्भात पोलिसांनी ९८२२४०४००० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन कापसे यांनी केले आहे.

पोलीस खात्यात माझे बरेच मित्र आहेत. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून ही संकल्पना पुढे आल्याचे त्यांनी सांगितले.

# लिपिक कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना संसर्ग रोखण्यासाठीच्या कामात कार्यरत असलेल्या लिपिक कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शासकीय निमशासकीय लिपिक संवर्गीय हक्क परिषदेकडून करण्यात आली आहे. त्या बाबतचे निवेदन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देण्यात आले आहे.

करोना संसर्ग रोखण्यासाठी विलगीकरण कक्ष आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी विविध ठिकाणी शासकीय-निमशासकीय लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात आले आहे. मात्र, डॉक्टर, परिचारिका, पोलीस अशा घटकांप्रमाणे लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना विमा योजनेत समाविष्ट करण्यात आलेले नाही. करोना रोखण्याच्या कामात योगदान देणाऱ्या लिपिक कर्मचाऱ्यांना संसर्ग होण्याचा शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांनाही विमा योजनेत समाविष्ट करण्याची मागणी संस्थेचे अध्यक्ष विजय बोरसे, कार्याध्यक्ष सूर्यकांत इंगळे, राज्य संघटक शिवाजी खांडेकर यांनी केली आहे.

> **शहीद दर्जा द्यावा**
>
> करोना रोखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या डॉक्टर आणि अन्य कर्मचारी धैर्याने सेवा देत आहेत. या दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्यास त्यांना शहीद दर्जा द्यावा, त्यांच्या कुटुंबीयांना सर्व सुविधा पुरवाव्यात, अशीही संघटनेकडून मागणी करण्यात आली आहे.

# यूपीएससी : मुख्य परीक्षा

## यूपीएससीची तयारी


तुकाराम जाधव



**विद्यार्थी मित्रांनो,** करोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक वेगवेगळ्या परीक्षांची वेळापत्रके बदलत आहेत. ३१ मे रोजी होणाऱ्या यूपीएससीच्या पूर्वपरीक्षेतही बदल होऊ शकतो, अर्थात याविषयीची  अधिकृत माहिती आयोग योग्य वेळी जाहीर करेलच; तथापि या परीक्षेचे वेळापत्रक पुढे-मागे झाले तरी पूर्वपरीक्षा पार पडेल आणि त्यानंतर मुख्य परीक्षा पार पडेल. त्यामुळे आजच्या लेखापासून आपण यूपीएससीच्या मुख्य परीक्षेची तयारी कशी करावी, याविषयी यापुढील काही लेखांमधून जाणून घेणार आहोत.

यूपीएससी परीक्षेतील पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीनही टप्प्यांसाठी अभ्यासक्रमातील विषयांचे पद्धतशीरपणे केलेले 'आकलन' ही मूलभूत बाब ठरते, यात शंका नाही; तथापि या परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यात आकलन क्षमतेबरोबरच दुसरी एखादी विशिष्ट क्षमता व कौशल्य अत्यावश्यक ठरते. त्या दृष्टीने विचार करता यूपीएससी मुख्य परीक्षेत लेखनक्षमतेचा विकास केवळ आवश्यकच नाही तर निर्णायकही ठरतो.

केंद्र लोकसेवा आयोगाने म्हटल्याप्रमाणे मुख्य परीक्षा ही संपूर्णतः लेखी स्वरूपाची परीक्षा आहे. विद्यार्थ्याचे पात्र होणे अथवा अपात्र ठरणे हे मुख्य परीक्षेतील गुण आणि मुलाखतीत प्राप्त केलेले गुण यावरच ठरते. मुख्य परीक्षेसाठी १७५०, तर मुलाखतीसाठी २७५ गुण निर्धारित केले आहेत. स्वाभाविकच, मुख्य परीक्षा हा अनन्यसाधारण व निर्णायक टप्पा आहे, यात दुमत असण्याचे कारण नाही. त्यामुळे या टप्प्यासाठी आवश्यक लेखनक्षमतेचा विकास करणे अत्यंत जरुरीचे ठरते. मुख्य परीक्षेचे स्वरूप नेमकेपणाने लक्षात येण्यासाठी तिच्या महत्त्वपूर्ण आयामांचा व वैशिष्ट्यांचा परामर्श घेणे उपयुक्त ठरेल.





मुख्य परीक्षेतील प्रत्येक प्रश्नासाठी गुणमर्यादा नमूद केलेली असते. संबंधित प्रश्न किती गुणांसाठी आहे, यानुसारच उत्तर लिहिणे श्रेयस्कर ठरते. एखाद्या घटकाविषयी आपल्याकडे असणारी अतिरिक्त माहिती उत्तरात लिहिणे कटाक्षाने टाळावे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किती शब्दमर्यादेत लिहायचे आहे, हेदेखील प्रश्नपत्रिकेत नमूद केलेले असते. या शब्दमर्यादेचे भान ठेवूनच उत्तराचा आकार ठरवावा लागतो.

मुख्य परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न विविध स्वरूपाचे असतात. स्पष्ट करा, वर्णन करा, उलगडून दाखवा, भाष्य करा, टिपणी करा, परीक्षण करा, मूल्यमापन करा, मीमांसा करा, चिकित्सक चर्चा करा, तुम्हास मान्य आहे का, भवितव्य सांगा, उपाययोजनांचा आढावा घ्या. इ. अशा विविध तऱ्हांनी प्रश्न विचारले जातात. त्यामुळे उत्तर लिहिताना संबंधित प्रश्न काळजीपूर्वक वाचून, त्याची मागणी लक्षात घेऊन त्याच्याशी सुसंगत प्रतिपादन तयार करावे लागते. त्यासाठी प्रश्नातील मध्यवर्ती शब्द काय आहे, त्याचा रोख काय आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. अर्थात, यामध्ये प्रश्न योग्य रीतीने समजून घेण्याची आकलनशक्ती जशी महत्त्वाची ठरते, तसेच त्यानुसार लेखन करण्याची क्षमतादेखील अत्यावश्यक ठरते.

निबंधाच्या स्वतंत्र पेपरमध्ये दोन विषयांवर निबंध लिहायचे असतात. या पेपरसाठी आवश्यक लेखनशैली प्रायः वर्णन - स्पष्टीकरण विश्लेषणात्मक असते. तांत्रिकतेला यात फारसा वाव नसतो. त्यामुळे निबंधाची रचना प्रस्तावनेपासून मुख्य गाभा ते समारोपापर्यंत परिच्छेदाच्या स्वरूपात करून आपल्या प्रतिपादनात सुसूत्रता, सुसंगती, सलगता या बाबींची हमी द्यावी लागते.

मुख्य परीक्षेतील वैकल्पिक विषयावरील प्रश्नांची उत्तरेदेखील प्रायः निबंधवजा लिहिणे अभिप्रेत असते. म्हणजेच प्रत्येक उत्तर मुद्द्यांच्या स्वरूपात, तांत्रिकपणे लिहिणे अपेक्षित नसते. त्यातील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे निबंधाप्रमाणे परिच्छेदाच्या स्वरूपात सुरुवातीपासून समारोपापर्यंत सलगता व सुसंगती राखत विकसित करावी लागतात. अर्थात काही वैकल्पिक विषयांमध्ये मुद्द्यांच्या स्वरूपातील उत्तराची अपेक्षा असते. मात्र, वैकल्पिक विषयातील सर्वच प्रश्नांची उत्तरे सामान्य अध्ययनाप्रमाणे मुद्द्यांच्या स्वरूपात लिहिणे गरजेचे नसते.

सामान्य अध्ययनाच्या चार पेपर्सपैकी पहिले तीन पेपर निराळ्या स्वरूपाचे (ज्यात विषय, त्याचा अभ्यासक्रम, त्यावर आधारित प्रश्न अशी एक चौकट असते.) असतात आणि 'नैतिकता, सचोटी आणि दृष्टिकोन' हा चौथा पेपर बऱ्याच अंशी भिन्न असतो. पहिल्या तीन पेपरमध्ये अनुक्रमे २५, २० आणि २०, तर चौथ्या पेपरमध्ये १४ प्रश्न विचारले जातात. चौथ्या पेपरमध्ये प्रश्नांची संख्या कमी असते. कारण या पेपरचा अभ्यासक्रम आणि त्यावर विचारले जाणारे प्रश्न विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेचा पुरेपूर कस पाहणारे असतात. विद्यार्थी अभ्यासक्रमातील संकल्पना आणि विचार यांचे उपयोजन करू शकतो का? आजच्या स्थितीत त्यांचे महत्त्व प्रस्थापित करू शकतो का? परिस्थितीजन्य प्रश्नांची उत्तरे देऊ शकतो का? विविध प्रसंग आणि प्रकरणात कसा निर्णय घेतो? अशा विविध प्रकारे विद्यार्थ्यांची विचारशक्ती तपासली जाते. म्हणूनच सामान्य अध्ययनाचा चौथा पेपर हा विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आजपर्यंत कसे घडले आहे, याचे मूल्यमापन करू पाहतो. त्यामुळे या पेपरमधील उत्तरे निराळ्या पद्धतीने लिहावी लागतात.

एकंदर मुख्य परीक्षेचा विचार करता प्रश्नांसाठी निर्धारित गुण, शब्दमर्यादा आणि प्रश्नांचे स्वरूप या बाबी लक्षात घेऊन तीन तासांत संपूर्ण पेपर सोडवणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी लेखनाचे कसब विकसित करावे लागते.

## करिअर मंत्र

डॉ. श्रीराम गीत

**मी ११ वी कला शाखेत आहे. मला दहावीला ८० टक्के होते.  इतिहास व नागरिकशास्त्र हे माझ्या आवडीचे विषय आहेत. दोन्ही विषयांत एमएचा विचार आहे. त्यातून नोकरीच्या संधी कोणत्या? रेल्वे परीक्षांचा विचार आहे. सोबत एक जागतिक भाषा शिकण्याचा विचार आहे. त्या बाबतीतही मार्गदर्शन करावे.**

**– किशोर थोरात**




किशोर, तू आखलेले नियोजन छानच आहे. सध्या फक्त अकरावी, बारावी व तेरावीला असलेल्या सहा विषयांचा समग्र अभ्यास करून ७५ टक्के मार्क दरवर्षी टिकवणे यावर लक्ष केंद्रित करावेस. पदवीच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी रेल्वे परीक्षा, बँकेच्या परीक्षा, राज्यसेवा पूर्वपरीक्षा या संदर्भात फार तर एक तास वाचन सुरू करावेस. सध्या त्या संदर्भात व मुख्यतः नोकरीसंदर्भात विचार करणे चुकीचे ठरेल. एमए संपेपर्यंत अजून किमान सहा वर्षे आहेत. त्या वेळी तुला नक्की कशी नोकरी मिळू शकेल, हे नेमके भविष्य सांगणारी व्यक्ती मला तरी माहिती नाही. मात्र जागतिक भाषा शिकण्याची योग्य वेळ तुलाच निवडायची आहे. ती शिकताना लागणारा तीन ते चार वर्षांचा काळ हा पदवीच्या अभ्यासाला मारक न ठरता पूरक ठरला तरच त्याचा उपयोग होईल. भाषा शिक्षणाच्या ओघात पदवीकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्याची उदाहरणेच जास्त दिसतात, म्हणून हा उल्लेख आवर्जून करत आहे. तुला नागरिकशास्त्र आवडते असे लिहिले आहेस म्हणून तुलाच एक साधासा प्रश्न विचारतो. भारतातील साऱ्या राज्यांत मिळून किती ठिकाणी विधान परिषदा सध्या अस्तित्वात आहेत? असे का? या प्रश्नाचे उत्तर जरा शोधून बघ.

## नोकरीची संधी

सुहास पाटील
suhassitaram@yahoo.com







**जगजीवनराम हॉस्पिटल, वेस्टर्न रेल्वे, मुंबई सेंट्रल – मुंबई.**

**कॉन्ट्रॅक्ट मेडिकल प्रॅक्टिशनर्स आणि 'पॅरा मेडिकल' कॅटेगरीतील ग्रुप 'सी'च्या एकूण ७६ पदांची ३ महिन्यांसाठी कोविड विलगीकरण कक्षात काम करण्यासाठी करार पद्धतीने भरती.**

**१) नर्सिंग अधीक्षक** – ३५ पदे. (अजा-५, अज-२, इमाव-९, ईडब्ल्यूएस-३, खुला-१६)

पात्रता - ३ वर्षे कालावधीचा जनरल नर्सिंग अ‍ॅण्ड मिडवायफरी कोर्स उत्तीर्ण किंवा बी.एस्सी. (नर्सिंग) उमेदवाराकडे १५ बेडपेक्षा अधिक बेड असलेल्या हॉस्पिटलच्या क्रिटिकल युनिटमध्ये काम करण्याचा अनुभव.

**वयोमर्यादा** – (दि. २८ एप्रिल २०२० रोजी) २० ते ४० वर्षे.

**वेतन दरमहा** रु. ४४,९००/. अधिक इतर भत्ते.

**२) लॅब असिस्टंट** – ५ पदे ( इमाव-१, खुला-४)

**पात्रता** – १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण आणि डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी

**वयोमर्यादा** – ( दि. २८ एप्रिल २०२० रोजी) १८-३३ वर्षे.

**वेतन दरमहा** रु. २१,७००/- आणि इतर भत्ते.

**३) रेडिओग्राफर** – ५ पदे (इमाव-१, खुला-४)

**पात्रता** – १२ वी फिजिक्स, केमिस्ट्री विषयांसह उत्तीर्ण आणि रेडिओग्राफी (एक्स-रे टेक्निशियन/ रेडिओ डायग्नोसिस टेक्नॉलॉजीमधील २ वर्षांचा डिप्लोमा (या डिप्लोमासह सायन्स पदवीधरांना प्राधान्य)

**वयोमर्यादा** – दि. २८ एप्रिल २०२० रोजी १८-३३ वर्षे

**वेतन – दरमहा** रु. २९,२००/-  अधिक इतर भत्ते.

**४) क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट** – ५ पदे (इमाव-१, खुला-४)

**पात्रता**– क्लिनिकल सायकॉलॉजी/ सोशल सायकॉलॉजी या विषयातील पदव्युत्तर पदवी.

**वयोमर्यादा** – दि. २८ एप्रिल २०२० रोजी १८-३३ वर्षे

**वेतन – दरमहा** रु. ३५,४००/- अधिक इतर भत्ते

**५) ईसीजी टेक्निशियन** – २ पदे (खुला)

**पात्रता** – १२ वी (विज्ञान)/ विज्ञान विषयांतील पदवी उत्तीर्ण आणि ईसीजी लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी/ कार्डिऑलॉजी/ कार्डिऑलॉजी टेक्निशियन/ कार्डिऑलॉजी टेक्निकमधील किमान १ वर्ष कालावधीचा सर्टिफिकेट/ डिप्लोमा उत्तीर्ण.

**वयोमर्यादा** – दि. २८ एप्रिल २०२० रोजी १८ ते ३३ वर्षे.

**वेतन** – रु. २१,७००/- अधिक इतर भत्ते.

**६) सीएमपी – जीडीएमओ** – १३ पदे (अजा-२, इमाव-३, ईडब्ल्यूएस-१, खुला-७)

**पात्रता** – एमबीबीएस आणि क्रिटिकल केअर मेडिसिनमधील पदव्युत्तर पदवी/ पदविका

**वयोमर्यादा** – ५३ वर्षेपर्यंत.

**वेतन** – दरमहा रु. ७५,०००/-

**७) सीएमपी – इंटेसिव्हिस्ट** – २ पदे; फिजिशियन - ३ पदे; अ‍ॅनेस्थेस्टिस्ट -  ६ पदे. (अज-१, इमाव-२, ईडब्ल्यूएस-१, खुला-७)

**पात्रता** – एमबीबीएस आणि मेडिसिन/ पॅल्मॉनॉलॉजीमधील पदव्युत्तर पदवी/पदविका.

**वयोमर्यादा** – ५३ वर्षेपर्यंत

**वेतन** – दरमहा रु. ९५,०००/-

**सर्व पदांसाठी कमाल वयोमर्यादेत सूट** – इमाव - ३ वर्षेपर्यंत, अजा/अज -  ५ वर्षेपर्यंत.

**निवड पद्धदती** – शॉर्टलिस्टेड उमेदवारांची व्हॉट्सअ‍ॅप/ टेलिफोनिक कॉलद्वारे मुलाखत घेऊन अंतिम निवड केली जाईल. निवडलेल्या उमेदवारांची निवड यादी बनविली जाईल व त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले जाईल.

व्हॉट्सअ‍ॅप/ टेलिफोनिक कॉलद्वारे होणाऱ्या मुलाखती दि. १ मे २०२० पासून सुरू होतील.

**अर्जाचा नमुना** –

www.wr.indianrailway.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (News, Updates & Recruitment)

### अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) जन्मतारखेचा दाखला किंवा १० वीचे बोर्ड सर्टिफिकेट
२) जातीचा दाखला (इमाव उमेदवारांसाठी नॉनक्रिमी लेटरचा दाखला)
३) नोकरी करत असल्यास ना हरकत प्रमाणपत्र (NOC)
४) अनुभव असल्यास सर्टिफिकेट
५) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र आणि गुणपत्रक
६) आधारकार्ड
७) कॉन्सिल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट

निवडलेल्या उमेदवारांना कामावर हजर करून घेताना त्यांची कागदपत्रे तपासणी केली  जाईल.

#### विस्तृत माहिती

www.wr.indianrailway.gov.in (under News and Recruitment section)  आणि http: // 203. 153.40.19/bct (ekarmik) वर उपलब्ध आहेत.

#### ऑनलाइन अर्ज

http://203.153.40.19/bct

ही लिंक ओपन करून दि. ३० एप्रिल २०२० पर्यंत करावेत.

(पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.)

## शब्दकोडे - १०२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ■ | ६ | ७ | |
| ८ | | | | ■ | ९ | १० | | | ■ |
| ११ | | ■ | १२ | १३ | ■ | १४ | | ■ | १५ |
| | ■ | १६ | ■ | १७ | | | ■ | १८ | |
| १९ | २० | | | | ■ | २१ | २२ | | |
| ■ | २३ | | ■ | २४ | | ■ | २५ | | ■ |
| २६ | | ■ | २७ | | ■ | २८ | ■ | २९ | ३० |
| | ■ | ३१ | | ■ | ३२ | | ३३ | ■ | |
| ३४ | ३५ | | | ३६ | ■ | ३७ | | ३८ | |
| ■ | | ■ | ३९ | | | | ■ | | ■ |

**आडवी विधाने :**
(१) हकालपट्टी
(६) जाणे, हलणे
(८) दैना, दुर्दशा
(९) जीभ, रसना
(११) रोखलेली नजर, एकाग्र दृष्टी
(१२) समुद्रांच्या लाटांचा आवाज
(१४) अंक, माडाच्या पोईपासून काढलेले मद्य
(१७) तेल ज्या पदार्थापासून निघते असे पदार्थ
(१८) शेवट, अखेर
(१९) संसाररूपी समुद्र
(२१) रफू करणारा
(२३) औषध
(२४) तोटा, नुकसान
(२५) पावसाची झड
(२६) लोक, प्रजा
(२७) कंबर (२९) दया, करुणा
(३१) दैव, नशीब
(३२) हेतू, उद्देश, मनसुबा
(३४) गोडीगुलाबीने समजावण्याचा प्रकार
(३७) ज्या नाण्यावर शिक्का आहे असे नाणे
(३९) रीतीला अनुसरून, सशास्त्र

**उभी विधाने :**
(१) उडाणटप्पू, हक्क नसतानाही अधिकाराच्या पदावर येऊन बसणारा
(२) आयुर्वेदावर ग्रंथ रचणारा ऋषी, उसाचा रस काढण्याचे यंत्र  (३) अंगावरील बारीक मऊ केस, एक वृक्ष वा त्याचे फळ
(४) खोगीराचा किंवा मुठीचा पाठीवरून बांधावयाचा पट्टा (५) अंकुर, कोंब (६) घरांच्या भिंतींचे बांधकाम करणारा
(७) बुद्धी, अक्कल (१०) सारख्या अंतरावरचा
(१३) जगाची राहणी वा वागण्याची पद्धत
(१५) कैची, कात्री (१६) विश्रांती, आराम
(१८) कृष्णपक्षात मंगळवारी येणारी चतुर्थी
(२०) तोंड, मुख (२२) आतून दिलेले उत्तेजन
(२६) गाण्या-बजावण्याची मैफील
(२७) नोकर, कामगार
(२८) सूर्य, प्रभाकर (३०) गोदाम, कोठार
(३१) प्याला, 'बशी'चा जोडीदार
(३३) टोच, बोचणी (३५) आनंद, हर्ष
(३६) मग्न, लीन, गुंग
(३८) पत्नी, बायको

**– सरोज ताठरे**

## सुडोकू - १०२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | | | | | | १ | |
| ४ | | | ७ | | | | | ५ |
| | | ६ | | | ९ | ७ | | |
| | | ९ | | ४ | | | ७ | |
| | | | ५ | ६ | ३ | | | |
| | ६ | | | ७ | | ५ | | |
| | | ४ | ८ | | | ३ | | |
| ३ | | | | | २ | | | ९ |
| | ९ | | | | | | २ | |


## सुडोकू - १०१चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ५ | २ | ८ | ४ | ६ | ७ | ३ |
| ४ | २ | ३ | ९ | ६ | ७ | ५ | १ | ८ |
| ७ | ८ | ६ | ५ | ३ | १ | ४ | ९ | २ |
| ६ | ७ | १ | ४ | ५ | ३ | २ | ८ | ९ |
| ५ | ३ | ९ | ८ | २ | ६ | १ | ४ | ७ |
| ८ | ४ | २ | १ | ७ | ९ | ३ | ५ | ६ |
| ९ | ५ | ८ | ३ | ४ | २ | ७ | ६ | १ |
| ३ | १ | ७ | ६ | ९ | ५ | ८ | २ | ४ |
| २ | ६ | ४ | ७ | १ | ८ | ९ | ३ | ५ |

## शब्दकोडे क्र. १०१चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | भू | तो | न | भ | वि | ष्य | ति | ■ | पु |
| मा | क | ड | ■ | र | मा | ■ | र | ज | नी |
| ज | ■ | गा | ढ | व | ■ | वा | स | ला | त |
| ■ | मु | ■ | क | सा | ब | ■ | ट | व | ■ |
| रो | ज | नि | शी | ■ | हि | म | ■ | त | प |
| ख | रा | रा | ■ | का | रा | ■ | न | र | द |
| पा | ■ | क | मा | न | ■ | रां | ज | ण | ■ |
| ल | ह | र | ■ | स | न | ग | र | ■ | नी |
| ■ | व | ण | वा | ■ | थ | ■ | कै | वा | र |
| सू | न | ■ | सा | द | ■ | म | द | त | ■ |

STOP CORONA VIRUS



# आपल्याला ही साखळी तोडायची आहे..

सरकारनं सांगितलेल्या
नियमांचं पालन कित्येकांनी
केलं नाही..
खबरदारी घेतली नाही ..
अनेकांनी आपला जीव
धोक्यात घातला..
कित्येकांना आपला जीव
गमवावा लागला.

आता तरी शहाणे होऊया..
नियमांचे पालन करुन
ही **साखळी तोडूया...**

**STAY AT HOME**

- मास्कचा वापर न चुकता करा.
- ताप, खोकला, सर्दीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- शिंकताना रुमालाचा वापर करा.
- वारंवार हात साबणाने धुवा.
- आपल्या घरीच रहा बाहेर पडू नका.
- सर्वां बरोबर सुरक्षित अंतर ठेवा.
- होम क्वारनटाईनचा नियम पाळा.
- कोरोना बाधित व्यक्तिचा संपर्क टाळा.
- हस्तांदोलन करु नका.

**Supported by**

PRATIBHA GROUP OF INSTITUTES
Chinchwad, Pune-19

YCI COLLEGE

ABHINAV EDUCATION SOCIETY
PUNE

PUNE IAT
Why Run ? .....You Can Fly !

"येथे बहुतांचे हित"

आपलं घरात राहणं खूप काही गोष्टी साध्य करेल!
आपली सुरक्षितता
सामाजिक सुरक्षितता
देशहिताचे समाधान
सोशल डिस्टंसिंगचे तत्व पाळूया... कोरोनाची लढाई घरात राहून जिंकूया...
साडयांच रेशमी नातं...
विमलसन्स
काळेवाडी
8459728824 / 9021392106
9021327401 / 7620326759

DNYANMUDRA TUTORIALS®
Pune's Best Institute
XI | XII | NEET (UG) | JEE (Main) | JEE (Adv) | MHT-CET | NATA

AISSMS®
ALL INDIA SHRI SHIVAJI MEMORIAL SOCIETY
PREMIER HERITAGE GROUP OF INSTITUTES



| सेन्सेक्स | | निफ्टी ५० | | डॉलर | | तेल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२,७२०.१६ | ६०५.६४ | ९,५५३.३५ | १७२.४५ | ७५.६६ | ०.५२ | २१.३० | ४.१० |

**लक्षणीय समभाग** स्ट्राईड्स फार्मा सायन्स : रु.४४९ १०. (+२०.००%) : कोविड-१९वरील औषध तयार करण्याच्या प्रक्रियेला यश मिळाल्यानंतर...

# गुंतवणूकदारांची वायदापूर्तीपूर्वीही खरेदी

## सेन्सेक्स, निफ्टी निर्देशांकात वाढ

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** भांडवली बाजारातील निर्देशांक तेजी बुधवारीही कायम राहिली. परिणामी महिन्यातील वायदापूर्तीच्या अखेरच्या सत्रापूर्वी सेन्सेक्स व निफ्टीने सलग तिसऱ्या व्यवहारातील तेजी नोंदविली. दोन्ही प्रमुख निर्देशांक हे आता त्यांच्या गेल्या दिड महिन्याच्या वरच्या टप्प्यावर स्थिरावले आहेत.

व्यवहारात जवळपास ८०० अंशांपर्यंत झेप घेणारा मुंबई निर्देशांक सत्रअखेर मंगळवारच्या तुलनेत ६०५.६४ अंशांनी वाढून ३२,७२०.१६ पर्यंत पोहोचला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टी निर्देशांकात १७२.४५ अंश वाढीसह ९,५५३.३५ वर स्थिरावला. जागतिक भांडवली बाजारातील तेजीच्या आशेवर येथेही गुंतवणूकदारांमध्ये खरेदी उत्साह दिसून आला.



## रुपयाचा महिन्याचा उच्चांक

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य बुधवारी थेट ५२ पैशांनी उंचावत ७५.६६ पर्यंत पोहोचले. परिणामी स्थानिक चलन आता गेल्या चार आठवड्यांच्या वरच्या टप्प्यावर स्थिरावला आहे.

जागतिक भांडवली बाजारातील तेजी आणि स्थानिक भांडवली बाजारातील गुंतवणूकदारांचा निधी ओघ याचा हा परिणाम होता. प्रमुख निर्देशांकांप्रमाणे रुपयातही सलग तिसऱ्या व्यवहारात तेजी नोंदविली गेली. बुधवारच्या सत्रात स्थानिक चलनाचा वरचा प्रवास ७५.६० पर्यंत ठरला.

अमेरिकेच्या बुधवारी उशिरा जाहीर होणाऱ्या फेडरल रिझर्व्ह तसेच युरोपीयन मध्यवर्ती बँकेच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर डॉलरवर दबाव निर्माण झाला.

## मॅक्स लाइफ इन्शुरन्समध्ये ॲक्सिस बँकेचा हिस्सा

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** ॲक्सिस बँक, मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसेस आणि मॅक्स लाइफ यांच्या संचालक मंडळांनी त्यांच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत ॲक्सिस बँकेच्या मॅक्स लाइफ इन्शुरन्समध्ये २९ टक्के हिस्सा खरेदीस मान्यता दिली.

ॲक्सिस बँकेने, मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजाराला पाठविलेल्या पत्रात ही माहिती देण्यात आली आहे. या तीन कंपन्यांनी २० फेब्रुवारी २०२० रोजी एका गोपनीयतेच्या करावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या.

सध्या मॅक्स लाइफची मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसेसकडे ७२.५ टक्के, मित्सुई सुमीटोमो इन्शुरन्स कंपनीकडे २५.५ टक्के आणि ॲक्सिस बँकेची २ टक्के मालकी आहे.

एका करारानुसार, मित्सुई सुमीटोमो इन्शुरन्स कंपनीला त्यांच्या मॅक्स लाइफ इन्शुरन्समधील २०.६ टक्के मालकीच्या बदल्यात मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसेस २१.०९ टाके समभाग मिळतील. मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसे मॅक्स लाइफ चे ४.९ टक्के समभाग खरेदी करेल आणि ॲक्सिस बँक ही मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसेसकडून मॅक्स लाइफ इन्शुरन्सचा हिस्सा खरेदी करेल.

या व्यवहाराच्या पूर्ततेनंतर मॅक्स लाइफ इन्शुरन्स ही मॅक्स फायनान्शियल सर्व्हिसेस आणि ॲक्सिस बँकेची अनुक्रमे ७० आणि ३० टक्के मालकी असलेली कंपनी असेल.

रिझर्व्ह बँक आणि विमा नियमन आणि विकास प्राधिकरण आणि भारतीय स्पर्धा आयोगाच्या मान्यतेनंतर या कराराची पूर्तता होणार आहे.

या पूर्ततेनंतर मॅक्स लाइफ इन्शुरन्सच्या नावात ॲक्सिस बँकेची नाममुद्रा जोडली जाईल.

सध्या मॅक्स लाइफ इन्शुरन्स ही देशातील चौथ्या क्रमांकाची विमा कंपनी आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या कर्मचाऱ्यांची एक कोटी रुपयांची देणगी

**मुंबई :** बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये कार्यरत सर्व कर्मचारी, अधिकाऱ्यांतर्फे महाराष्ट्र मुख्यमंत्री सहायता निधी कोविड-१९ मध्ये करोना संक्रमणाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी एक कोटी रुपयांच्या मदतीचा धनादेश देण्यात आला.

बँकेचे मुंबई क्षेत्रीय कार्यालयाचे सरव्यवस्थापक विजय कांबळे यांनी मुख्यमंत्री कार्यालयातील उप सचिव मयेकर यांना धनादेश सुपूर्द केला. यापूर्वी बँकेच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी पंतप्रधान निधीसाठी पाच कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र ही कोविड-१९ विरोधात पुकारलेल्या या युद्धामध्ये अग्रस्थानी असून बँकेच्या १,८००पेक्षा अधिक शाखा तसेच १,८५० एटीएमच्या माध्यमातून अखंडित वित्तीय सेवा पुरवीत आहे. याशिवाय बँकेचे बँक-मित्र/बँकिंग-प्रतिनिधी (बँकिंग करस्पॉन्डन्स) देशामध्ये ३,००० विविध ठिकाणी वित्तीय सेवा पुरवत असल्याचे सांगण्यात आले.

## अजय महाजन केअर रेटिंग्जचे मुख्य कार्यकारी अधिकारी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** पतमानांकन संस्था केअर रेटिंग्जच्या संचालक मंडळाच्या बैठकीत कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालकपदी अजय महाजन यांची नुकतीच पाच वर्षांसाठी नेमणूक करण्यात आली.

अजय महाजन यांना बँकिंग क्षेत्राचा ३० वर्षांचा अनुभव आहे. केअरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालकपदी नेमणूक होण्याआधी महाजन आयडीएफसी बँकेत होते.

महाजन यांनी त्यांच्या बँकिंग कारकीर्दीची सुरुवात बँक ऑफ अमेरिकेत १९९० मध्ये करून ते २००४ ते २००८ दरम्यान येस बँकेच्या संस्थापकीय व्यवस्थापकांपैकी एक होते.

व्यवस्थांपनाच्या संघकार्य, संगणक प्रणाली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान या विषयातील ते तज्ज्ञ समजले जातात.



'बिट्स पिलानी'मधून विद्युत अभियांत्रिकीत पदवी घेतल्यानंतर त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या एफएमएसमधून पदव्युत्तर व्यवस्थापनाची पदव्युत्तर पदवी मिळवली आहे.

अमेरिकेच्या सीएफए इन्स्टिट्यूटचे अजय महाजन हे सीएफए सनदधारक आहेत.

संचालक मंडळाच्या त्यांच्या नेमणूकीच्या ठरावास समभागधारकांच्या सभेत लवकरच मंजुरी घेतली जाईल, अशी माहिती केअर रेटींग्जने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

## सुला विनयार्डस्‌कडून २० लाखांची मदत

**मुंबई :** भारतातील सर्वात मोठी वाईनरी असलेल्या सुला विनयार्डस्‌तर्फे कोविड-१९ विरुद्धच्या लढ्याला बळ देण्यासाठी २० लाख रुपयांची मदत केली आहे.

यापैकी ८ लाख रुपये पीएम केअर व ८ लाख रुपये महाराष्ट्र स्टेट डिजास्टर मॅनेजमेंट ऑथोरिटी (एमएसडीएमए) यांना मदत म्हणून पाठविले आहे. तर उर्वरित रक्कम नाशिक परिसरातील विविध सामाजिक कामांसाठी उपलब्ध करून दिली आहे.

कोविड-१९ साठीच्या या आर्थिक मदतीसोबतच सुलाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वैयक्तिक क्षमतांप्रमाणे वेगवेगळ्या सहायता निधीना सहाय्य रक्कम उपलब्ध करून दिली आहे.

काहींकडून मास्क व गरजूंना भोजन उपलब्ध करून देण्याच्या कार्यात हातभार लावण्यात आला आहे. सुलाच्या कंपनी सामाजिक दायित्व निधीतून केलेली मदत कोविड-१९ च्या उच्चाटनासाठी उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## अर्थ - संक्षिप्त

### डोंबिवली सहकारी बँकेच्या कर्जयोजना

**मुंबई :** डोंबिवली नागरी सहकारी बँकेने किमान व्याजदराच्या विविध कर्ज योजना सादर केल्या आहेत. करोना संकटात खातेदार, कर्जदार, उद्योजकांना दिलासा देण्याचा याद्वारे प्रयत्न करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. उद्योजकांसाठी डीएनएसबी केअर्स एमएसएमई या योजनेद्वारे एक कोटी रुपयेपर्यंतचे कर्ज वार्षिक ९ टक्के दराने व सहा महिने ते एक वर्ष हप्ता सवलतीसह देऊ करण्यात आले आहे. तर सोने तारण कर्जावरील व्याजदर ९ टक्के निश्चित करण्यात आला असून प्रक्रियादी शुल्क रद्द करण्यात आले आहे.

### डीएमके जावली बँकेचे अर्थसाहाय्य

**मुंबई :** दत्तात्रय महाराज कळंबे (डीएमके) जावली सहकारी बँकेने कोविड-१९ मुख्यमंत्री सहाय्य निधीला ११ लाख रुपयांच्या धनादेश दिला आहे. राज्यात उद्‌भवलेल्या आपत्तीकरिता सामाजिक बांधिलकी व मानवतेच्या दृष्टिकोनातून बँकेच्या वतीने हे अर्थसहाय्य करण्यात येत असल्याचे बँकेचे अध्यक्ष चंद्रकांत गावडे यांनी स्पष्ट केले आहे.

### जळगाव पीपल्स बँकेचे यश

**मुंबई :** गेल्या दोन ते तीन वर्षांपासून असलेल्या वाढत्या अनुत्पादित मालमत्ता संकटावर जळगाव पीपल्स बँकेने अखेर मात केली आहे. वित्त वर्ष २०१९-२० मध्ये १२.४० कोटी रुपये करपश्चात नफा कमाविणाऱ्या या बँकेच्या निव्वळ अनुत्पादित मालमत्ता प्रमाण १.६६ टक्के व ढोबळ अनुत्पादित मालमत्ता प्रमाण २.३३ टक्क्यांपर्यंत आले आहे. बँकेच्या भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२.८५ टक्के नोंदले गेले आहे. तर बँक खात्यांची संख्या ३,५१,९३१ झाली आहे.

### टाटा ट्रस्टची आरोग्य मोहीम २१ लाख लोकांपर्यंत

**मुंबई :** टाटा ट्रस्ट्सने संपूर्ण राज्यभरात एक आरोग्य मोहीम सुरू केली आहे. कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी भारत सरकारने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरोग्य उपाययोजनांची अंमलबजावणी केली जावी यासाठी संपूर्ण समाजाला प्रोत्साहन देणे हे या मोहिमेचा उद्देश आहे. ३१ मार्चपासून सुरू झालेली ही मोहीम राज्यभरातील २१ लाख लोकांपर्यंत पोहोचले असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### 'ला ट्रोब युनिव्हर्सिटी'चे १२ दशलक्ष डॉलरचे साहाय्य

**मुंबई :** ऑस्ट्रेलियास्थित 'ला ट्रोब युनिव्हर्सिटी' विद्यापीठाने कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी १२ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर खर्च केले आहेत. दरवेळी दिले जाणाऱ्या शिष्यवृत्तीशिवाय 'ला ट्रोब'ने ही मदत दिली आहे. विद्यार्थ्यांना नव्या या शैक्षणिक वर्षात अभ्यास सुरू करण्यासाठी 'ला ट्रोब'ने ऑनलाईन पर्याय दाखल केले असून अभ्यासक्रम सुरू करण्याच्या तारखाही शिथील केल्या आहेत.

### बिंगच्या कोविड-१९ ट्रॅकरतर्फे नवीन वैशिष्ट्ये सादर

**मुंबई :** मायक्रोसॉफ्टने भारतीयांना करोना संदर्भातील नवीन माहितीसह अद्ययावत राहण्यामध्ये मदत करण्यासाठी बिंग कोविड-१९ ट्रॅकरमध्ये भर करण्यात आलेल्या नवीन वैशिष्ट्यांची घोषणा केली. यामध्ये स्वयं मूल्यांकनासाठी अपोलो हॉस्पिटल्स बोटचे एकीकरण आणि प्रतिष्ठित आरोग्यनिगा संस्थांकडून टेलिमेडिसीन सहकार्यासाठी केंद्र यांचा समावेश आहे. ट्रॅकर देशभरातील लोकांना त्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये साथी संदर्भात महत्त्वाची माहिती देण्यासाठी नऊ भारतीय भाषांमध्ये मजकूर सादर करेल.

**क्रीडा**

# जागतिक बॉक्सिंगचे यजमानपद भारताने गमावले

## घाईत निर्णय घेतल्याची भारतीय बॉक्सिंग महासंघाची आंतरराष्ट्रीय संघटनेवर टीका

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारताने २०२१**मध्ये होणाऱ्या पुरुषांच्या जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद गमावले आहे. आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग संघटनेकडून (एआयबीए) घेतलेल्या या निर्णयावर भारतीय बॉक्सिंग महासंघाने (बीएफआय) टीका केली आहे.

भारताला २०१७मध्ये पुरुषांच्या जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद देण्यात आले होते, मात्र आता ते सर्बियाची राजधानी बेलग्रेडला देण्यात आले आहे. दिलेल्या मुदतीत शहराच्या यजमानपदाचे शुल्क जमा न केल्याने 'एआयबीए'कडून ही कारवाई करण्यात आली आहे. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे पैसे जमा करता आले नव्हते, असे स्पष्टीकरण 'बीएफआय'ने दिले आहे. गेल्या वर्षी २ डिसेंबरला चार लाख डॉलर्स जमा करायचे होते. ''नवी दिल्ली येथे ही स्पर्धा होणार होती. यजमान शहराच्या करारानुसार ठरलेली रक्कम वेळेत जमा करण्याचा नियम आहे. या कारणास्तव 'एआयबीए'ने करार रद्द केला. करार रद्द केल्याने भारताला ५०० डॉलरचा दंडदेखील ठोठावण्यात आला आहे,'' असे 'एआयबीए'ने स्पष्ट केले. भारतात प्रथमच ही स्पर्धा होणार होती.



> एआयबीएचे स्वित्झर्लंडमधील लुसाने येथील खाते गोठवण्यात आले आहे. यजमान शहराच्या करारानुसार 'एआयबीए'चा स्वित्झर्लंडमधील जो खाते क्रमांक देण्यात आला होता तोदेखील सद्य:स्थितीत चालू नसल्याचे दिसले. त्यातच सर्बियामध्ये एआयबीएचे एक खाते आहे. मात्र भारताच्या बँकांना सर्बियाच्या बँकांमध्ये पैसे थेट जमा करता येत नाहीत. मात्र त्यावर एआयबीए तोडगा काढू शकली नाही,"
>
> – **अजय सिंग**, भारतीय बॉक्सिंग महासंघाचे प्रमुख

'बीएफआय'चे प्रमुख अजय सिंग यांनी मात्र 'एआयबीए'चा आरोप फेटाळून लावला आहे. ''ठरलेली रक्कम नेमकी कुठे जमा करायची, हेच आम्हाला आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग संघटनेकडून सांगण्यात आले नाही. पैसे भरण्याच्या अखेरच्या दिवशी नव्याने यजमानपदासाठीची प्रक्रिया एआयबीएने घाईने सुरू केली. वास्तविक हा निर्णय घेण्याच्या आधी आमच्याशी चर्चा करायला हवी होती. यजमानपद तर भारताने गमावलेच पण जोडीला दंडदेखील आमच्यावर ठोठावण्यात आला आहे. हा दंड धक्कादायक आहे. हा दंड रद्द करण्याची आमची मागणी आहे तसेच भविष्यात भारताला जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेचे यजमानपद मिळेल अशी अपेक्षा आहे,'' असे 'बीएफआय'कडून अजय सिंग यांनी स्पष्ट केले.

'एआयबीए'ने याआधीच चुकीचे आर्थिक गैरव्यवस्थापन केल्याचा ठपका ठेवत आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) त्यांचे निलंबन केले होते. या खेळाची ऑलिम्पिक स्तरावरील स्पर्धा घेण्यासही 'आयओसी'कडून 'एआयबीए'ला बंदी घालण्यात आली आहे. भारतात याआधी २०१८ मध्ये महिलांची जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा झाली होती.

''नवीन यजमान सर्बियासोबत तारखांची निश्चिती लवकरच करण्यात येईल. कारण पुढील वर्ष आता ऑलिम्पिकचे आहे. करोना आटोक्यात येईल आणि ही जागतिक स्पर्धा होईल,'' असे 'एआयबीए'चे हंगामी अध्यक्ष मोहम्मद मुस्तासेन यांनी सांगितले.

## पुन्हा ऑलिम्पिक लांबल्यास लक्षावधी डॉलर्सचा फटका - थॉमस बाख

**पीटीआय, लुसाने**




**टोक्यो ऑलिम्पिक** क्रीडा स्पर्धा २०२१मध्ये पुन्हा लांबणीवर टाकल्यास लक्षावधी डॉलर्सचा फटका आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीला (आयओसी) बसेल, असे अध्यक्ष थॉमस बाख यांनी सांगितले.

''ऑलिम्पिक सध्याच्यास्थितीत लांबणीवर टाकण्यात आल्याने याआधीच लाखो डॉलर्सचा फटका बसला आहे. ऑलिम्पिक लांबल्याने जो वाढीव खर्च आहे त्याचा भार आयओसीवरदेखील पडत आहेच,'' याकडेही बाख यांनी लक्ष वेधले. ''करोनातून बाहेर पडल्यानंतर कशी परिस्थिती असेल याचा कोणालाच अंदाज नाही. मात्र ऑलिम्पिक खेळाडूंसाठी सुरक्षित आणि चांगल्या आरोग्यदायी वातावरणात पडेल ही जबाबदारी आमची आहे,'' असे बाख यांनी सांगितले.

'आयओसी'चे सदस्य जॉन कोएट्स यांनी ऑलिम्पिक होण्यासाठी करोनावर लस सापडणे गरजेचे आहे हा शास्त्रज्ञांचा दावा खोडून काढला आहे. ''जागतिक आरोग्य संघटनेकडून ऑलिम्पिकची जी पुढील वर्षाची तारीख आम्ही ठरवली आहे त्यादृष्टीने तयारी करण्यास सांगण्यात आले आहे. करोनावर लस सापडणे ही चांगली बाब असेल. मात्र लस संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेकडून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत,'' असे कोएट्स यांनी सांगितले.

## जैन यांच्या मुदतवाढीचा संभ्रम कायम

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट** नियामक मंडळाचे लवाद अधिकारी डी. के. जैन यांना मुदतवाढ द्यावी की नाही, याविषयी अद्याप 'बीसीसीआय'ने निर्णय घेतलेला नाही. जैन यांचा कार्यकाळ फेब्रुवारीमध्ये समाप्त झाला आहे.

न्यायमूर्ती जैन यांची फेब्रुवारी २०१९ मध्ये लवाद अधिकारीपदी निवड करण्यात आली. त्यामुळे आता सौरव गांगुलीच्या अध्यक्षतेखाली 'बीसीसीआय'ला लवकरच निर्णय घ्यावा लागणार आहे. ''काही महिन्यांपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल जोहरी यांनी मला मुदतवाढीवविषयी विचारणा केली होती. त्या वेळी मी त्यांना होकार दर्शवला होता,'' याकडे जैन यांनी लक्ष वेधले.

## सेहवागपेक्षा नाझिर अधिक प्रतिभावान!

### पाकिस्तानच्या शोएब अख्तरचा दावा

**पीटीआय, कराची**

**पाकिस्तानचा माजी** सलामीवीर इम्रान नाझिर हा भारताच्या वीरेंद्र सेहवागपेक्षा अधिक प्रतिभावान होता, अशी प्रतिक्रिया माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने बुधवारी व्यक्त केली. परंतु सेहवागप्रमाणे स्वतःच्या कौशल्याचा योग्य वापर करण्याइतपत बुद्धी नाझिरकडे नसल्याने त्याची कारकीर्द ढासळली, असा खुलासाही अख्तरने केला.

३८ वर्षीय नाझिरने आठ कसोटी, ७९ एकदिवसीय आणि २५ ट्वेन्टी-२० सामन्यांत पाकिस्तानचे प्रतिनिधित्व केले. परंतु १३ वर्षांच्या कारकीर्दीत त्याला संघातील स्थान सातत्याने टिकवता आले नाही. त्याउलट ४१ वर्षीय सेहवागने मात्र तिन्ही प्रकारांत छाप पाडताना भारतासाठी १०४ कसोटी, २५१ एकदिवसीय सामने खेळले. परंतु अख्तरला मात्र कौशल्याच्या तुलनेत नाझिर उजवा वाटतो.

''नाझिर सेहवागपेक्षा फार कौशल्यवान होता. त्याच्याकडे सेहवागपेक्षाही अधिक आक्रमकरीत्या फलंदाजी करण्याची क्षमता होती. त्यामुळे कौशल्याच्या तुलनेत नाझिर नेहमीच वरचढ ठरेल. परंतु सेहवागप्रमाणे मेंदूचा योग्य वापर करणे त्याला जमले नाही. त्याशिवाय देशातील क्रिकेट प्रशासनानेसुद्धा नाझिरला फारसा पाठिंबा दिला नाही,'' असे ४४ वर्षीय अख्तर म्हणाला.

''पाकिस्तानमधील अनेक गुणवान खेळाडूंच्या कारकीर्दीला प्रशासनामुळेच उतरती कळा लागली. ज्या वेळी नाझिरने भारताविरुद्ध तुफानी शतक झळकावले, त्या वेळीच संघसहकाऱ्यांनी प्रशासनाकडे त्याला सातत्याने संधी देण्याची विनंती केली होती. परंतु नाझिरला अंतर्गत राजकारणाचा बळी बनवण्यात आले. त्यामुळेच पाकिस्तानला किंबहुना विश्वाला नाझिरच्या फलंदाजीचा अधिक आनंद लुटता आला नाही,'' असेही अख्तरने सांगितले.



''माजी फलंदाज जावेद मियाँदाद यांनी नाझिरला घडवण्यात मोलाची भूमिका बजावली. त्याने झळकावलेल्या प्रत्येक शतकाचे श्रेय मियाँदाद यांना द्यावे लागेल. त्याशिवाय तो चपळ क्षेत्ररक्षकही होता, मात्र संघातील स्थान गमावल्यानंतर त्याचा आत्मविश्वास संपला,'' याकडे लक्ष वेधले.

## चुकीची माहिती दिल्याचा विजय देशपांडेंवर आरोप

**पीटीआय, चेन्नई**

**अखिल भारतीय** बुद्धिबळ महासंघाच्या (एआयसीएफ) पाच सदस्यीस समितीने सचिव विजय देशपांडे यांच्यावर चुकीची माहिती पसरवत असल्याचा आरोप केला आहे. विजय देशपांडे हे राष्ट्रीय संघटनेचे लेटरहेडदेखील परवानगी नसताना वापरत आहेत, असा ठपकाही 'एआयसीएफ'कडून त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

सचिव आणि संयोजक नरेश शर्मा यांनी देशपांडे यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले की, ''कोणालाच 'एआयसीएफ'चे लेटरहेड वापरायला परवानगी नाही. त्या लेटरहेडवर अध्यक्ष म्हणून पी. आर. वेंकटेश राजा, देशपांडे आणि किशोर बांदेकर यांची नावे आहेत. मात्र देशपांडे यांनी लेटरहेड वापरून आणि स्वतः सचिव असल्याचे दाखवून संघटनेची चुकीची माहिती पसरवली.''

## २०२८च्या ऑलिम्पिकमध्ये भारत अव्वल १० देशांत!

**पीटीआय, नवी दिल्ली**

**२०२८च्या ऑलिम्पिक** क्रीडा स्पर्धेत भारताला अव्वल १० देशांत स्थान मिळवणे नक्कीच शक्य आहे, अशी प्रतिक्रिया क्रीडा मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी व्यक्त केली. या ध्येयाच्या दिशेने शासनाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे, असेही त्यांनी सांगितले.



**क्रीडा मंत्री रिजिजू यांचा विश्वास**

''ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा कोणत्याही खेळाडूच्या आयुष्यात फार महत्त्वाच्या असतात. गेल्या काही वर्षांत भारताला अनेक युवा आणि कौशल्यवान क्रीडापटू गवसले असून २०२८च्या ऑलिम्पिकमध्ये आपण नक्कीच अव्वल १० देशांत स्थान मिळवू शकतो, असे मला वाटते. त्यादृष्टीने क्रीडा खात्यासह शासनानेही आतापासूनच प्रयत्न सुरू केले आहेत,'' असे रिजिजू म्हणाले.

''२०२८च्या ऑलिम्पिकसाठी अद्याप आमच्याकडे आठ वर्षांचा कालावधी असल्याने खेळाडूंच्या शोधमोहिमेची अंतिम रुपरेषा कशी असावी, याविषयी आम्ही सध्या चर्चा करत आहोत. त्याचप्रमाणे २०२१च्या ऑलिम्पिकसाठी खेळाडू कसे तयारी करत आहेत, याकडेही आमचे लक्ष आहे,'' असे रिजिजू यांनी नमूद केले.

## थॉमस आणि उबर चषक बॅडमिंटन स्पर्धा पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली :** करोनाच्या पार्श्वभूमीवर थॉमस आणि उबर चषक बॅडमिंटन स्पर्धा आता ऑगस्टऐवजी ऑक्टोबर महिन्यात खेळवण्यात येईल, असे जागतिक बॅडमिंटन महासंघाने (बीडब्ल्यूएफ) बुधवारी जाहीर केले. मे महिन्यात रंगणारी ही स्पर्धा यापूर्वी ऑगस्ट महिन्यापर्यंत लांबणीवर ढकलण्यात आली होती. ''डेन्मार्क येथील प्रशासनाने ऑगस्ट महिन्यापर्यंत टाळेबंदी वाढवण्याचा निर्णय घेतल्यामुळे थॉमस आणि उबर चषक बॅडमिंटन स्पर्धा आता १५ ते २३ ऑगस्टऐवजी ३ ते ११ ऑक्टोबरदरम्यान खेळवण्यात येईल,'' असे जागतिक बॅडमिंटन महासंघाकडून स्पष्ट करण्यात आले.

हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव – द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स – ६७२४११४७ ● लोकसत्ता कार्यालय : एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स –२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९१४.

■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

epaper.loksatta.com